आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ मार्च २०११ | वर्ष २७ | अंक २४

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक ₹ १०



"भारतात कशाप्रकारची 'अन्नसुरक्षा' साधता येईल?

-शरद जोशी

## स्व.भा.प. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी सज्ज!!



स्वतंत्र भारत पक्ष राज्य कार्यकारिणी बैठक, चिखलदरा.







शेतकरी संघटक
२७ वा वर्धापन दिन
दि. ६ एप्रिल २०११

प्रमुख पाहुणे : निशीकांत भालेराव, वक्ते : विनोद शिरसाठ, राम जगताप

स्थळ : कलश मंगल कार्यालय, उस्मानपुरा, औरंगाबाद. वेळ : सायं. ६.३०

शेतकरी
# संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २७ । अंक २४ । २१ मार्च २०११

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

मुखपृष्ठावरील छायाचित्र
**श्रीकृष्ण उमरीकर**

अंक मांडणी
**श्रीकांत झाडे, जनशक्ती वाचक चळवळ**

**वार्षिक वर्गणी : रु. २००/- फक्त.**
(द्वैवार्षिक, त्रैवार्षिक, आजीव आदी प्रकार नसल्यामुळे फक्त वार्षिक वर्गणीच स्वीकारली जाईल.)
वर्गणी **'शेतकरी संघटक'** या नावाने खालील पत्त्यावर पाठवावी.

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :**
कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक,
जनशक्ती वाचक चळवळ,
२४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१,
फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक मोहन बिहारीलाल परदेशी, संपादक, मुद्रक, प्रकाशक सुरेशचंद्र म्हात्रे यांनी उदय एंटरप्राईजेस, सिडको-औरंगाबाद येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, पिनाक, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

शरदऋतू
**भारतात कशाप्रकारची 'अन्नसुरक्षा' साधता येईल?**
शरद जोशी । ३

डायरी अध्यक्षांची
**कांदा निर्यातबंदी हटविण्याचा गड आला पण...**
रवि देवांग । ५

जागरण
**मागे वळून पाहताना**
श्रीकृष्ण उमरीकर । ७

मुद्दा
**२जी ते ३जी काय केले हो राजाजी?**
विश्वास प्र. पिटके । ११

आजकाल
**वेळ येऊन ठेपलीय पर्यायी ऊर्जास्त्रोत शोधण्याची**
ज्ञानेश्वर शेलार । १४

विचार
**कृषीक्षेत्रासंबंधीच्या 'व्हिजन'चा अभाव**
डॉ. एम.एस. स्वामीनाथन । १६

'भारत' की जुबानी
**इस्लामी शून्य ब्याज व्यवस्था और बाजारवाद**
ॲड. दिनेश शर्मा । १७

वाङ्मय शेती
**कृषी विद्यापीठांना अनुदान कशाला हवे**
गंगाधर मुटे । २१

विचार
**मायक्रो फायनान्स : शेतकरी आत्महत्यांसाठी नवा गळफास**
सुधाकर जाधव । २३

(उ)संतवाणी
**बाबूरावांचा भूकंपशोध**
शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर । २५

अभिजात वाङ्मय
**गोदान**
मूळ लेखक : मुन्शी प्रेमचंद, अनु. अनंत उमरीकर । २७

**शेतकरी संघटना वृत्त । ३१**

# हे होईल का?

कांद्याची निर्यातबंदी उठल्यानंतर बरा भाव मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कापसाच्या बाबतीत निर्यातबंदी उठविल्याचे फायदे प्रत्यक्षपणे भाव वाढून दिसत आहेत. प्रश्न असा निर्माण होतो, शासनाने शेतीमालाच्या व्यापारामध्ये ढवळाढवळ करू नये यासाठी सर्वसामान्य शेतकरी तीव्रपणे प्रतिक्रिया व्यक्त करेल काय? एक तर अतिशय स्वच्छपणे दिसत आहे, शहरी व्यवस्थेत आणि शेतीशिवायच्या इतर सर्व व्यवसायांत माणसं सामावून घ्यायची क्षमता कमी आहे. गेली साठ वर्षे इतका प्रयत्न करूनही या व्यवस्थेमध्ये ३० टक्क्यांपेक्षा जास्त माणसे आम्ही सामावून घेऊ शकलेलो नाही. जागतिकीकरणावर प्रत्येक गोष्टीचं खापर फोडणारे हे लपवून ठेवतात. १९९१ पूर्वीसुद्धा 'इंडिया'मध्ये ज्यांची सोय लागली. अशांची संख्या २५ टक्क्यांपेक्षा कमीच होते.

कापसाच्या निमित्ताने आज पहिल्यांदा मराठवाडा आणि विदर्भाच्या काही पट्ट्यांत पैसा खेळताना दिसत आहे. त्याचं सकारात्मक चित्र म्हणजे जमीन विक्रीचा ओघ कमी झाला आहे. स्वाभाविकच शहरी व्यवस्थेत उपेक्षित राहिलेले किंवा ज्यांना शहरी व्यवस्थेने सामावून घेतले नाही, असा तरुणवर्ग पुन्हा गावात दिसू लागला आहे. तरुण वर्गाला दिशाभूल करून शहराचा रस्ता दाखवणे चुकीचे आहे, हे अजूनही लक्षात घेतले जात नाही. शहरी समाजजीवन दिवसेंदिवस बकाल होत चालले आहे. नोकरीचे आमीष दाखवणारे स्वतःचा स्वार्थ फक्त बघतात; पण हे कबूल करत नाहीत- मोठ्या प्रमाणात ग्रामीण तरुणांना सामावून घेण्याची ताकद शहरी व्यवस्थेत नाही. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न शहरांमध्ये गंभीर बनत चालला आहे. मागच्या वर्षी पाऊस जास्त पडला आणि सगळ्यांनी हा प्रश्न वाऱ्यावर सोडून दिला. आता उन्हाचे चटके बसायला लागले आहेत, तसतशी या प्रश्नाची दाहकता जाणवायला लागली आहे. खेड्यामध्ये तर काही विचारूच  नका. त्यामुळे एक साधी गोष्ट लक्षात घ्यायला हवी- आपण जर तरुणांना शहरी व्यवस्थेत सामावून घेत नसून तर त्यांना किमान आहे त्याच व्यवस्थेत रोजगार मिळवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. शेतकरी चळवळीने याहीपुढे जाऊन अतिशय वेगळी अशी मांडणी केली आहे. ग्रामीण भागासाठी जे काही करणं चालू आहे, ते सगळं पूर्णपणे थांबवा. शेतकरी स्वतःचा विकास चांगल्या पद्धतीने साधू शकतो. शेतकऱ्याच्या छातीवरून सरकारने उठायला पाहिजे, ही मागणी स्वातंत्र्यानंतर इतक्या वर्षांनीही करावी लागते, हेच लाजीरवाणे आहे.

माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट होत असलेल्या आजच्या काळात फक्त कृषीक्षेत्र का म्हणून नियंत्रणात ठेवल्या जातंय. खुलेपणाचा वारा या क्षेत्राला जाणीवपूर्वक लागू दिला जात नाही. याचे परिणाम सर्वच समाजावर होताना दिसतात. कापसाला भाव मिळाला किंवा कापसाला भाव मिळू नये म्हणून करण्यात येणाऱ्या लांड्यालबाड्या थांबल्या तरी खूप झालं. याचा सरळ परिणाम दिसतो - तरुणांचा शहराकडचा ओढा त्या भागातला कमी होतो. इतर छोटेमोठे उद्योग ग्रामीण भागात उभारी घेतात. ज्या शेतकऱ्यावर पूर्ण गावगाड्याची व्यवस्था उभी असते. जो शेतकरी या व्यवस्थेच्या नुसता केंद्रभागीच असतो असं नाही, तर त्याच्यामुळेच ही व्यवस्था चालू असते त्याच्या हाती थोडाफार पैसा आला, की लगेच आजूबाजूचं चित्र पालटल्याचं दिसतं. इतर कुठल्याही घटकांपेक्षा प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या हातात पैसा येणे म्हणजेच त्याच्या मालाला किमान भाव मिळणे. याला दुसरा कुठलाही पर्याय आजच्या आधुनिक काळातही दिसत नाही. शेतीवरून लोक विस्थापीत होऊ लागले, तर त्यांना दुसरीकडे कुठे नेऊन आम्ही बसवणार आहोत. आजच 'इंडिया'चा तोल बिघडत चाललेला आहे. मग या भारतातल्यांना काय न्याय देता येणार? इतक्या वर्षांनंतरसुद्धा 'इंडिया' आणि भारत यांच्यातील दरी स्पष्ट आहे, हे लाजीरवाणं आहे.

'नर्मदा बचाव' आंदोलनाच्या संदर्भात जी फाटाफूट मेधा पाटकर आणि प्रतिभा शिंदे यांच्या निमित्ताने झाली, त्यावर टिप्पणी करताना 'लोकसत्ता'सारख्या प्रतिष्ठित वृत्तपत्रानेही शरद जोशी यांनी केलेल्या 'इंडिया'-भारत या मांडणीचा आधार घेतला. ग्रामीण भागातून ज्या सर्व चळवळी गेल्या कित्येक वर्षांत चालू होत्या. त्या सर्वांचा आजचा चेहरा पाहता ३० वर्षांपूर्वी शेतकरी चळवळीने केलेली मागणी किती योग्य होती, हेच दिसून येते. कांदा प्रश्नी तर ठसठशीतपणे शासकीय हस्तक्षेप आणि माध्यमांचा उठवळपणा आणि त्या निमित्ताने शहरी मानसिकता सगळं स्पष्टपणे सामोरं आलं आहे. या सगळ्यांतून निदान आतातरी आम्हाला हे शिकायला पाहिजे- 'भारता'ची उपेक्षा करून 'इंडिया'चं कुठलंही भलं होणार नाही. उलट असं करण्याचे प्रयत्न दिवसेंदिवस अंगलट येत जातील.

जपानमध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्तीने पुन्हा एकदा बिघडलेल्या पर्यावरणाची जाणीव स्पष्टपणे अनुभवास येत आहे. स्वाभाविकच यामुळे शेतीवरदेखील परिणाम होणार आहे. वातावरणातील बदल मोठ्या प्रमाणात शेतीला मारक ठरत आहे. यातून सावरण्यासाठी बियाण्यांमध्ये संशोधन मोठ्या प्रमाणात होण्याची गरज आहे. इतकंच नाही, शेतीला विशेष बाब म्हणून संरक्षणही द्यावे लागणार आहे. हे करण्यासाठी फक्त निधीचीच गरज आहे असं नाही, तर विशेषतः आपल्या देशात आढळणारी, शेतीविरोधी मानसिकता बदलण्याची गरज आहे. जोपर्यंत हे होणार नाही. तोपर्यंत आपण नवीन समस्यांना तोंड देऊ शकणार नाहीत.

जगभरात शेतीमालासंदर्भामध्ये विशेष बाब म्हणून धोरणं आखली गेली पाहिजेत. पाकिस्तानमध्ये आलेला महापूर, आता जपानवरची त्सुनामी या सगळ्यांमुळे जागतिक पातळीवर अन्नधान्याची म्हणून वेगळी समस्या उभी राहू शकते. जगभरातल्या लोकांना पुरेसं अन्न मिळावं यासाठी शेतकऱ्यांनी आतापर्यंत जीवापाड श्रम केले. धान्याची कोठारं शिगोशिग भरली; पण व्यवस्थेच्या करंटेपणामुळे भुकेल्या पोटांपर्यंत अन्न पोहोचलं नाही. आता तर सुलतानीसोबत अस्मानी संकटही इंगा दाखवत आहेत. त्यामुळे जुनी सगळी धोरणं बाजूला ठेवून स्वच्छ मनाने शेतीसंदर्भात जागतिक पातळीवरती काही एक निर्णय घ्यावे लागतील. शेतीप्रधान देश म्हणून भारत यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. प्रश्न इतकाच आहे, पारंपरिक शेतीविरोधी मानसिकतेलेल्या सध्याच्या भारतीय नेतृत्वाकडून हे होईल का?

**कार्यकारी संपादक**

# भारतात कशा प्रकारची ‘अन्नसुरक्षा’ साधता येईल?

**रेशनिंग बंद करण्याचा आग्रह धरण्यामागील तर्कशास्त्र निर्विवाद बरोबर होते. रेशनिंगची व्यवस्था चालू ठेवायची तर दुहेरी किमतींची यंत्रणा अपरिहार्यपणे तयार होते. अशी यंत्रणा एकात्मिक बाजारपेठेच्या कल्पनेला छेद देणारी असते. दुसरे म्हणजे, रेशनिंग व्यवस्था अगदी काटेकोरपणे राबवली गेली तर बाजारातील जवळजवळ ७० टक्के अन्नधान्य तीच यंत्रणा हडप करते. ही ‘सार्वजनिक वितरण व्यवस्था’ म्हणजे धान्यबाजारपेठेवर न पेलणारे ओझे लादणारा पांढरा हत्तीच होता.**



**शरद जोशी**

‘अन्नसुरक्षे’च्या प्रश्नावर राष्ट्रीय सल्लागार मंडळ आणि पंतप्रधानांची तज्ज्ञ समिती यांच्यातील मतभेद ही तशी जुनी गोष्ट झाली. महाराज्ञी सोनिया गांधींच्या बौद्धिक वर्चस्वाला आव्हान देण्याचे धारिष्ट्य कोणी दाखवले याबद्दल थोडेफार कुतूहल निर्माण झाले होते. ते अल्पावधीतच लुप्त झाले. ‘अन्नसुरक्षे’साठी अन्नधान्याचा पुरवठा आणि अनुदानाची पातळी या मुद्द्यांवर मतभेदाच्या दोन्ही पक्षांमध्ये समझोत्यासारखे काहीतरी होऊन वादावर पडदा टाकण्यात आला. ‘अन्नसुरक्षे’साठी सध्याच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर (रेशनिंग व्यवस्थेवर) विसंबून राहता येईल का यासारख्या कळीच्या प्रश्नांवर सार्वजनिक उघड चर्चा घडवून आणण्यात खरोखरीच कोणालाही खुमखुमी नव्हती, त्या मानाने वाद मिटविण्यासाठी समझोत्याच्या रूपात दोन पावले मागेपुढे घेणे ही किंमत तशी कमीच.

जनहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांवर खुली चर्चा घडवून आणण्याचे टाळून, ते प्रश्न सोडविण्याच्या संधी भारताने अनेक वेळा गमावल्या आहेत. चार दशके ज्या नेहरूप्रणीत समाजवादाचे भोग भोगायचे दुर्दैव आपल्या वाट्याला आले, त्या नेहरूप्रणीत समाजवादावरही खुली चर्चा करण्याचे आपण टाळले आणि आजही त्याचा लेखाजोखा मांडण्याची आमची तयारी नाही.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेसंबंधी निकराचे वाद होण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. रफी अहमद किडवाई हे पंडित नेहरूंचे अगदी निकटचे सहकारी होते. ते नेहरूंच्या मंत्रिमंडळात काही काळ अन्नमंत्री होते. त्यांच्या मंत्रिपदाच्या काळात पहिल्यांदा ‘सार्वजनिक वितरण व्यवस्था’ हा मोठ्या वादाचा विषय झाला होता. एका बाजूला अन्नधान्य खाते आणि दुसऱ्या बाजूला कृषि खाते व भारतीय अन्न महामंडळ यांच्यात हा वाद झडला. ‘रेशनिंग चालू ठेवावे का नाही’ हा या वादाचा मुख्य मुद्दा होता आणि रेशनिंग व्यवस्था पूर्णपणे बंद करून टाकावी असा किडवाईंचा ठाम आग्रह होता. कृषि खाते आणि ‘सार्वजनिक वितरण व्यवस्था’ यांनी त्याला कडाडून विरोध केला. अखेरी, भारतीय अन्न महामंडळाने किडवाईंवर मात केली आणि अन्नधान्य वितरणासंबंधी व्यवस्था ‘जैसे थे’ अशी अबाधित ठेवून रेशनिंगची यंत्रणा तिच्या अन्नधान्याच्या सरकारी सक्तीच्या खरेदी यंत्रणेतील सर्व लवाजम्यासह चालू ठेवण्यात यश मिळवले.

रेशनिंग बंद करण्याचा आग्रह धरण्यामागील तर्कशास्त्र निर्विवाद बरोबर होते. रेशनिंगची व्यवस्था चालू ठेवायची तर दुहेरी किमतींची यंत्रणा अपरिहार्यपणे तयार होते. अशी यंत्रणा एकात्मिक बाजारपेठेच्या कल्पनेला छेद देणारी असते. दुसरे म्हणजे, रेशनिंग व्यवस्था अगदी काटेकोरपणे राबवली गेली तर बाजारातील जवळजवळ ७० टक्के अन्नधान्य तीच यंत्रणा हडप करते. ही ‘सार्वजनिक वितरण व्यवस्था’ म्हणजे धान्यबाजारपेठेवर न पेलणारे ओझे लादणारा पांढरा हत्तीच होता. ती बंद करण्याचा आग्रह धरणाऱ्या पक्षाची ही भूमिका होती. आजच्या परिस्थितीत तर, अशा प्रकारची दुहेरी किमतींची व्यवस्था जागतिक व्यापार संस्थेला मान्यच होणारी नाही.

कागदोपत्री ‘सार्वजनिक वितरण व्यवस्था’ म्हटले जात असले तरी ती ‘रेशनिंग व्यवस्था’ म्हणूनच सर्रास ओळखली जाते. ही रेशनिंगची व्यवस्था फारा काळापासून चालत आली आहे. अनेक पातळ्यांवर तपासण्या आणि नियंत्रणे यांवर आधारित नियंत्रित ‘सार्वजनिक वितरण व्यवस्था’ चांगली चालते का खुल्या बाजारपेठेची व्यवस्था चांगली चालेल यासंबंधी वादविवाद सतत चालत आले आहेत. अलीकडेच प्रकाशात आलेल्या, लेफ्टनंट कर्नल सहानी








यांच्या प्रकरणानेतर अगदी लष्करी नियमांच्या कडक नियंत्रणाखालीही सुसंचालित रेशनिंग व्यवस्था अशक्य असल्याचे सिद्ध झाले आहे.

राष्ट्रीय सल्लागार समिती आणि पंतप्रधान कार्यालयाची तज्ज्ञ समिती यांच्यामधील 'अन्नसुरक्षे'च्या प्रश्नावरील मतभेदाची बातमी आता शिळी झाली आहे. आजकाल भारतीय अर्थव्यवस्थेत भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांचे जे पेव फुटले आहे ते पाहता, काणाडोळा करावे इतपतच चोऱ्या होणारी 'सार्वजनिक वितरण व्यवस्था' प्रत्यक्षात आणण्याचे कोणतेही प्रयास सफल होणे सुतराम शक्य नाही हे स्पष्ट आहे. अन्नधान्यांच्या चोऱ्यांना मोकळे रान उपलब्ध करून देणे हेच 'सार्वजनिक वितरण व्यवस्थे'चे स्वाभाविक स्वरूप आहे. पंतप्रधान कार्यालयाने 'अन्नसुरक्षा' साधण्यासाठी रेशनिंग व्यवस्थाच वापरण्याचा आग्रह कायम ठेवला आणि 'सार्वजनिक वितरण व्यवस्थे'च्या क्षेत्रात एखादा जरी करोडोंचा घोटाळा निर्माण झाला तर त्या कार्यालयाला आपली स्वच्छ प्रतिमा टिकवून ठेवणे अवघड होऊन जाईल. 'सार्वजनिक वितरण व्यवस्था' दुरुस्तीच्या बाहेर बिघडली आहे, तिच्या आधाराने 'अन्नसुरक्षे'ची हमी निर्माण करण्याची कोणतीही योजना म्हणजे देशावरील मोठे अरिष्टच ठरणार आहे. 'सार्वजनिक वितरण व्यवस्था' चालू ठेवण्याचा आग्रह, ज्या भागांत या योजनेतील चोऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे त्या भागांकडूनच धरला जात आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

भारतातील शेतीमालाची विद्यमान बाजारपेठ यंत्रणा तीन स्तंभांवर उभी आहे. पहिला स्तंभ आहे 'कृषि उत्पादनखर्च व मूल्य आयोगा'चा. हा आयोग शेतकऱ्यांच्या पदरी शेतीखर्चापोटी किती रक्कम पडावी यासाठी शेतीखर्चाचे काही ढोबळ अंदाज देतो. खरे म्हणजे हे अंदाज मागील तीन वर्षांत संबंधित शेतीमालाला मिळालेल्या किमतींच्या सरासरीच्या जवळपास असतात असा एका तज्ज्ञ समितीचा अहवाल आहे.

विद्यमान बाजरपेठ यंत्रणेचा दुसरा स्तंभ म्हणजे 'भारतीय अन्न महामंडळ'. हे मंडळ त्याने खरेदी केलेल्या धान्यांच्या किमतींना नाममात्र जबाबदार असतो. या मंडळाचे प्रमुख काम कृषि उत्पादनखर्च व मूल्य आयोगाने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने सरकारने निर्धारित केलेल्या किमतीने सक्तीने व मक्तेदारीने धान्याची खरेदी करणे आणि ते रेशनिंग व्यवस्थेच्या घशात ओतणे एवढेच असते. खरे तर, 'कृषि उत्पादनखर्च व मूल्य आयोग' आता कालबाह्य व अनावश्यक झाला आहे कारण आता वायदे बाजारात शेतकऱ्यांना आपल्या शेतीमालाला सुगीच्या काळात किती किंमत मिळवता येऊ शकेल याचे अधिक चांगले अंदाज पेरणीलावणीच्याच वेळी बांधता येतात.

विद्यमान बाजारपेठ यंत्रणेचा तिसरा स्तंभ आहे 'रेशनिंग यंत्रणा'. या यंत्रणेत असलेल्या अंगभूत भगदाडांमुळे ती नेहमीच टीकेचा विषय राहिली आहे. रेशनिंग यंत्रणेच्या साऱ्या दोषांवर गरजूंसाठी 'अन्नकूपनांची योजना' लागू करून मात करता येईल; शिवाय या 'अन्नकूपन योजने'ला 'अनन्य राष्ट्रीय ओळख संकेतांका'ची (Unique National Identity Code) जोड दिल्यास ती अधिक परिणामकारक व दोषरहीत होईल.

'अन्नसुरक्षे'च्या संबंधाने चालू असलेल्या वादविवादाने शेतीला आणि भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या सर्वच विषयांवर सांगोपांग सार्वजनिक चर्चा घडवून आणण्याची एक नामी संधी आपल्या समोर पुन्हा चालून आली आहे. दुर्दैवाने, ही मोठी संधीही आपण वाया घालवणार आहोत असे दिसते आहे.

(२१ फेब्रुवारी २०११)

**शरद जोशी**
'अंगारमळा', अंबेठाण, ता. खेड, जि. पुणे.
sharadjoshi.mah@gmail.com

■■

# कांदा निर्यात बंदी हटविण्याचा गड आला पण निर्यात शुल्कवाढीमुळे भावाचा सिंह गेला

**शेतीमालाचा व्यापारावर अनेक प्रकारची बंधने लादून भाव पाडण्याचा उद्योग पंडित नेहरूंपासून मनमोहनसिंगपर्यंत अव्याहतपणे सुरू आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्येच शेतमाल विकण्याची सक्ती, प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक यावरील बंधने, एकाधिकार, राज्यबंदी, निर्यात बंदी यामुळे कष्ट करूनही कर्जबाजारीपण, आत्महत्याग्रस्तता हा शेतकरी बहुजन समाजाला लागलेला शाप आहे आणि याला सत्ताधारी राज्यकर्तेच जबाबदार आहे...**



**रवि देवांग**

शेतीमालाचा व्यापारावर अनेक प्रकारची बंधने लादून भाव पाडण्याचा उद्योग पंडित नेहरूंपासून मनमोहनसिंगपर्यंत अव्याहतपणे सुरू आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्येच शेतमाल विकण्याची सक्ती, प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक यावरील बंधने, एकाधिकार, राज्यबंदी, निर्यात बंदी यामुळे कष्ट करूनही कर्जबाजारीपण, आत्महत्याग्रस्तता हा शेतकरी बहुजन समाजाला लागलेला शाप आहे आणि याला सत्ताधारी राज्यकर्तेच जबाबदार आहे...

अवकाळी पावसामुळे कांद्याचे ८५ टक्के पीक वाया गेले. ही नैसर्गिक आपत्ती होती. मागणी जास्त पुरवठा कमी साहजिकच भाव वाढले. सत्तर रु. किलो झाले. एकच बोंबाबोंब, सगळ्या दूरचित्रावहिन्या ग्राहक राजाच्या नावाने गळा काढू लागल्या. गळयात कांदे मिरवणाऱ्यांचे चलतचित्र दाखविले गेले. चीनने भारतावर आक्रमण केले अशा थाटात कांदा भाव वाढीचा अपप्रचार केला गेला. शेतकरी जीवानिशी जळत होता. टीआरपीची चिंता करणारे वातड म्हणून नाक मुरडत होते. सत्याला सामोरे जाण्याची हिंमत मनमोहन सिंगांनी दाखविली नाही. व्यापाऱ्यांवर धाडी टाकण्याचं नाटक केलं गेलं. शहरी पब्लिक खुश. कांद्याच्या चोऱ्या पोलिस स्टेशनमध्ये दर्ज झाल्या. शासनाने निर्यातबंदी लावली. कांदा आडातच नव्हता, पोहऱ्यात कुठून येणार. यामुळे एक झालं, शरद जोशी एकदम राष्ट्रीय दूरचित्रवाणीवर! त्यांनी त्यांना शोभणाऱ्या स्टाईलीत १००रु. किलो भावाचं समर्थन केलं. निखिल वागळे लावू द्या; पण गुणवंत पाटील हंगर्गेकरांच्या मोलकरणीही चाटच पडल्या. ग्राहकांच्या सेंटीमेंटस विचित्र असतात. ही तात्पुरती अवस्था आहे. रांगडा कांदा बाजारात २०-२५ दिवसांनी येईल तोपर्यंत धीर धरा असं कुणी म्हणायला धजावत नव्हतं. भाजपा नेतृत्वानं दुटप्पीपणा दाखवला. यांनी शहरातले दाखवायचे दात वेगळे, ग्रामीण भागातले खायचे दात वेगळे दाखविले. रांगडा बाजारात येऊ लागला. अर्जुनतात्या, शंकर पुरकर, संतु पाटील यांनी पिंपळगावी बैठक घेतली. लासलगावला सभा ठरली. मला हाक मारली. सभा जंक्शन झाली. आंदोलन ठरले. पिंपळगावला वामनराव, अनिल, देविदास आण्णा, रामचंद्र बापू आदींनी हायवे सर केला. पान फुल आंदोलनाची आठवण व्हावी असा येणाऱ्या-जाणाऱ्यांना फुकट कांदा वाटप सुरू केले. वृत्तपत्रवाल्यांनी 'गांधीगिरी' म्हटलं. एक हजारापेक्षा जास्त नासिक जिल्ह्यातले नवे कोरे लाल बिल्ले लावलेले कायकर्ते रस्त्यांच्या एका बाजूला किमान दीड कि.मी. रस्ता व्यापून ओळीने उभे. दिप्ती राऊत-लोकमत ने चांगलं कव्हरेज दिलं. २ तासांनी आंदोलन समाप्तीची घोषणा. कार्यकर्ते स्फुरण होऊन घरी गेले. त्याच्या आधी एक दिवस मुहूर्त साधून खासदार राजू शेट्टींनी स्वाभिमान जागवत नासिककरांना हाक दिली. एकाच आडनावाचे ५-७ तरूण पोरे हाकेसरशी धावली. गळयात कांदा घेऊन खा. राजू शेट्टींसह चालू लागली. स्टार माझाने सकाळी बातमी दिली 'राजु शेट्टी यांच्या आंदोलनाच्या फज्जा' इन मीन पाचसात पोरं. मला वाईट वाटलं. ताकद नसेल तर आंदोलन करू नये. याने शेतकरी आंदोलनाची हानी होते. गावपातळीवर संपर्क राहिला नाही तर छापछूप नेतृत्व टिकाव धरणार नाही. केवळ प्रेस मीडिया, इलेक्ट्रॅनिक्स मीडिया मॅनेज करत व ग्रासरुटवर काम नसलं तर फुगा फुटायला वेळ लागत नाही. असो.

शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते फॉर्मात होते. अडावद जि. जळगावला कडूआप्पा पाटील, प्रकाश पाटील यांनी मार्केट बंद पाडले. धुळ्याला शिवसेनेच्या आमदाराने साथ दिली, शांतू पटेल, आत्माराम पाटील, प्रकाश पाटील यांनी जिलाव बंद पाडले. सोलापूरला तळेकर, दरेकर, थिटेमामा

आपटे आण्णांनी १५० कार्यकर्त्यांसह गिरफ्तारी दिली. अनिल घनवटांनी नगर पॅक केलं. संजय कोलेंनी व्यापाऱ्यांच्या साथीनं सांगली बाजार बंद केला. प्रसार माध्यमं दुजाभाव करीत होती, सर्वत्र शेतकरी आंदोलन करीत आहे. संघटनेचं नाव घ्यायला, श्रेय द्यायला कुणी तयार नव्हतं. ठीक आहे यह भी बदल जायगा! लासलगाव पॉकेट अस्वस्थ. आंदोलन किंवा निदान परिषद व्हावी असं कार्यकर्त्यांना वाटू लांगल. मला वामनरावांचा फोन आपली मंडळी 'एकत्रीत' आंदोलन करायचं म्हणतात. तुम्ही जा असं म्हणाले. रामचंद्र बापूचाही फोन. माझी शुगर वाढलेली. अर्जुन तात्या म्हणाले, फार तर डिझेलचे पैसे देतो पण या... मी तयार झालो. ॲग्रावनमध्ये बातमी झळकळी. संयोजक सगळे लाल बिल्लेधारी पाहुणे मात्र राजू शेट्टी, बबनराव काळे, पाशा पटेल, रघुनाथ दादा, माझं नावचं नाही. यात काही आश्चर्य नाही पण निदान संघटनचं तरी यावं.... मी आवंढा गिळला. मनात म्हणालो, अशी चावट बातमी कुणी दिली. मी आनंद गाडे संपादक ॲग्रोवन यांना फटकारणारा एसेमेस केला...



पिंपळगावला मार्केट यार्डात सुमारे ४०० कार्यकर्ते हजर. मी पहिल्यांदाच चिडलो. देवीदास अण्णांकडे नाराजी व्यक्त केली. त्यांनी संयमाने परिस्थिती हाताळली. आपली स्वतंत्र सभा सुरू झाली. संतू पाटलांनी सभा स्थिर केली.

पाशा, राजू, सदा, तुपकर आले. पब्लिक तयार आयतीच. पाशा म्हणाला, मी भाषण करून निघून जातो. मी त्याला थांबायला आदेश दिला. राजू म्हणाले, हे लोक रस्त्यावर येतील कां? मी हो म्हणालो. आंदोलन टेरीफिक झाले. हर्षबर्धन पाटील, राधाकृष्ण विखे पाटील यांनी संपर्क साधला. निर्यातबंदी उठवण्याचे आश्वासन दिले. आम्ही १९ फेब्रुवारीपर्यत मुदत देऊन आंदोलन जयजकारात संपले. राजू शेट्टींनी रस्त्यावच हजार कार्यकर्त्यांना शपथ दिली संघटनेची. मला समाधान. सदा म्हणाला शरद जोशी 'बाप' माणूस. पाशा म्हणाला संघटना आमची 'आई' आहे. रवि देवांग अध्यक्ष राहो. माझा नकार. पशाने १९ तारखेपासून तो व राजू आमरण उपोषणाची धमकी दिली . त्यात मी दुरुस्ती केली. माझंही नाव ॲड केलं.संघटनेने आरंदोलन केलं. आंदोलनाला दिशा दिली . दोघालोकप्रतिनिधीमुळे आंदोलनाला शोभा आली. समाधानाने सगळे घरी. वेळेवर जेवण मिळाले नव्हते. घाईगर्दीत डिसेलचे पैसे घ्यायला विसरलो. चॅनेलवर पट्ट्या झळकल्या. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन चारशे अटकेत. स्पॉटवर स्वाभिमानीचा बिल्ला लावलेले चारजणसुध्दा नव्हते! याला म्हणतात आईजीच्या जिवावर बाईजी उदार. इथं उदार का उधार याचा उलगडा मला अजून झालेला नाही. दुसऱ्या दिवशी ॲग्रोवन उघडला शेतकरी संघटनेचं नाव कुठचं नव्हतं. 'मेहनत करे सुभान अंडा खाये फकीर' मी पाशाला एसेमेस केला. किंमत चुकवावी लागले. हे सगळं कुणी घडवून आणलं असं मला वाटत नाही. हा थोडाफार परिस्थितीचा रेटा थोडफार मॅनेजमेंटचा प्रकार... असो. इथं राज्या ठोकळेंचा अदृश्य हात मला जाणवला. असो एका वृत्तपत्रात वाचले या निमित्ताने सर्व शेतकरी संघटना एकत्र आल्या. हे बरं झालं.

पाशांच्या ॲजर्लीमुळे रघुनाथदादा आदल्या दिवशीच निघून गेले. काही कार्यकर्ते नाराज. युतीमध्ये रघुनाथदादा दिसले नाही. मुळात ही युती नव्हती. वाट चुकलेले एका लग्नात एकत्र आलेले होते इतकेच. वधुपिता कोण माहित नाही. कार्यकर्त्यांमध्ये अजून मॅचुरीटीचा अभाव आहे हेच खरे. निर्यातबंदी उठवण्याची घोषणा. ६०० डॉलर प्रतीटन निर्यात किंमत निर्धारीत. हे निर्यात शुल्क आहे का? सरासरी २८ रु. प्रतिकिलो भरते ते. वाहतूक वेगळी पॅकींग वेगळे. आंतरराष्ट्रीय बाजारात ४० रु. किलो कांदा. आपल्या मार्केट कमिटीतला भाव सरासरी १० रु. किलो सरकारने निर्यात अशक्य करून टाकली.

सरकारी डाव यशस्वी कोल्हापूरला एक दिवस मार्केट बंद. निर्यातबंदी उठवण्याचा गड आला होता; पण निर्यात शुल्कामुळे भावाचा सिंह गेला. शेतकरी नावाच्या वाघाला निर्यातबंदी उठवण्याचं पिंजऱ्याचं दार उघडलं गेले; पण निर्यातशुल्काची ठासून भरलेली बंदूकधारी शिकारी उभा करून ठेवला. नासिकचे वाघ पिंजऱ्यातच जायबंदी. उठतील का पुन्हा. बघू भाव तर द्या. सदाचा फोन. खासदार वाणीज्य मंत्र्यांना भेटणार. मी म्हणालो, 'भेटा.' मला म्हणाला पुढे काय? मी गुरुमंत्र दिला. अंमलबजावणी सोपी नाही. प्रयत्न करू म्हणाला. मी म्हणालो 'आव मेरे पिछे.'


**- रवि देवांग**

अध्यक्ष, शेतकरी संघटना, महाराष्ट्र राज्य.

मो. ९४२२२९६३५८. ravi.metta@gmail.com


■■


## शेतकरी संघटक पाक्षिकाच्या मालकीसंबंधी
### फॉर्म नं. ४ रुल नं.८ अन्वये निवेदन

| | | |
|---|---|---|
| **१. प्रकाशन स्थळ** | : | पिनाक, २४४-समर्थनगर, औरंगाबाद ४३१००१ |
| **२. प्रकाशन काळ** | : | पाक्षिक |
| **३. संपादक, प्रकाशक** | : | नाव - सुरेशचंद्र पांडुरंग म्हात्रे<br>राष्ट्रीयत्व - भारतीय<br>पत्ता-अंगारमळा, मु. पो. अंबेठाण, ता. खेड, जि. पुणे. |
| **४. मुद्रक** | : | उदय एंटरप्राईजेस, सिडको, औरंगाबाद. |
| **४. वृत्तपत्राची मालकी व भांडवलात १% पेक्षा अधिक भागी असणारांची नावे व पत्ते** | : | सुषमा मोहनलाल परदेशी,<br>(कै.) मोहन बिहारीलाल परदेशी<br>मु. पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे. |
| **५. रजि. क्रमांक** | : | RN 39926/83 |

मी जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे.

अंबेठाण — **सुरेशचंद्र म्हात्रे**

२१ मार्च २०११ — प्रकाशक

# मागे वळून पाहताना

**शेतकरी संघटकसाठी लिहिण्याच्या निमित्ताने गेले वर्षभर मी वेगवेगळ्या ठिकाणी फिरलो, वेगवेगळ्या लोकांना भेटलो, आधी न वाचलेल्या बातम्या आणि लेख वाचले, अभ्यासले आणि त्यावरून शेती आणि शेतीचे प्रश्न नावाचा हा जो हत्ती आहे त्याला हत्ती आणि आंधळे या कथेतल्या आंधळ्याप्रमाणे चाचपडत जो आकार हाताला जाणवला तो आपल्या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला. माझ्यासारख्या शहरात वाढलेल्या, शेती न केलेल्या माणसासाठी हा अनुभव फारच वेगळा होता.**

**श्रीकृष्ण उमरीकर**

शेतकरी संघटकसाठी लिहिण्याच्या निमित्ताने गेले वर्षभर मी वेगवेगळ्या ठिकाणी फिरलो, वेगवेगळ्या लोकांना भेटलो, आधी न वाचलेल्या बातम्या आणि लेख वाचले, अभ्यासले आणि त्यावरून शेती आणि शेतीचे प्रश्न नावाचा हा जो हत्ती आहे त्याला हत्ती आणि आंधळे या कथेतल्या आंधळ्याप्रमाणे चाचपडत जो आकार हाताला जाणवला तो आपल्या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला. माझ्यासारख्या शहरात वाढलेल्या, शेती न केलेल्या माणसासाठी हा अनुभव फारच वेगळा होता.

'एलिस ईन वंडरलँड' नावाची एक प्रसिद्ध इंग्रजी परिकथा आहे. एलिस नावाची एक मुलगी पऱ्यांच्या राज्यात जाते. तिथे तिला जे जे अनुभव येतात त्याची ती कथा आहे. आधी कधीही न पाहिलेल्या गोष्टी ती बघते, न घेतलेले अनुभव ती घेते, आधी ज्यांची कल्पनाही केली नव्हती अशा लोकांना ती भेटते. सगळेच अद्‌भुत. शेवटी परिकथाच ती. आजही मुलांमध्ये ती अत्यंत लोकप्रिय आहे. आवडीने वाचल्या जाते. संघटकच्या निमित्ताने मला आलेला अनुभव असाच कल्पनेपेक्षाही वेगळा आधी कधीच न घेतलेला. माझ्या आणि एलिसच्या अनुभवातील साम्य एवढेच. एलिसची परिकथा आहे तर माझी कथा करुण आहे, शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाची आहे, शासनाने त्याच्या केलेल्या लुटीची आहे आणि हे सगळे कळूनसुध्दा त्याविरुध्द आवाज उठवण्यास एक न झालेल्या दुर्दैवी शेतकऱ्याची आहे.

एप्रिलमध्ये मी निपाणी भागाचा दौरा केला. आंदोलनात जे शेतकरी हुतात्मा झाले होते त्यांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी मी गेलो होतो. त्यांची परिस्थिती समजून घ्यायला गेलो होतो. अर्थातच परिस्थिती खूप वाईट आहे. शेतकरी हलाखीचे जीवन जगत आहेत. तंबाखूचे व्यापारी त्यांना लुटत आहेत आणि सरकारचे डोळे बंद आहेत.

त्यानंतर सरकारच्या शिक्षण धोरणाचा आढावा घेतला. ज्यावरून हेच स्पष्ट झाले की सरकारला काही करण्यापेक्षा काही केले असे केवळ दाखवायचे आहे. शिक्षणक्षेत्राची परिस्थिती वाईट आहे. ग्रामीण भागात तर ती दयनीय आहे. केवळ कायदा करून काही होणार नाही तर जोपर्यंत सरकारी शिक्षक आपल्या पगाराला जागून आपले कर्तव्य पूर्ण करणार नाहीत तोपर्यंत ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावणार नाही आणि जर ते होऊ शकत नसेल तर ग्रामीण भारताची परिस्थिती अजूनही खालावत जाईल हे नक्की.

त्याच सुमारास अरुंधती रॉय यांनी दंतेवाडा भागात नक्सलींसोबत दौरा केला आणि त्याविषयी नक्सलींची बाजू घेऊन लिहिले. सहनशक्तीची सीमा संपल्यावर माणूस काय करू शकतो हे नक्सलींच्या उदाहरणापासून स्पष्ट दिसते आणि नंतर फुबगाव येथे बाबूजी किटुकले आणि त्यांच्या सहकाऱ्यांना भेटल्यावर सहनशक्तीची सीमा जरी पार झाली तरी कल्पकतेने अहिंसात्मक मार्ग वापरून आंदोलन कसे करता येते याचे जिवंत उदाहरण मी अनुभवले. या गावातल्या ४०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आम्हाला आत्महत्येची परवानगी द्या म्हणून राष्ट्रपतींकडे अर्ज केला आहे! कोरडवाहू कापूस करणारा तेथील शेतकरी पार खचला आहे. जमिनीचे मालक आता नोकर झाले आहेत, भूमिहीन झाले आहेत. जे थोडके टिकून आहेत त्यांच्या हिमतीला दाद द्यायला हवी. एकूण काय- कापूस पिकवणारा शेतकरी फारसा सुखात नाही. चालू हंगामात बरे भाव जरी मळाले तरी उतारा घटल्यामुळे शेतकऱ्यास आपली गुंतवणूक कदाचित परत मिळाली. नफा वगैरेची बात सोडा; पण त्याच्या मनात आशेची पालवी जरूर फुटली आहे. खुल्या बाजारामुळे, शेतीमालाच्या निर्यातीमुळे आपल्याला सुखाचे दिवस पाहायला मिळू शकतात हा विश्वास त्याच्या मनात पुन्हा मूळ धरू लागला आहे. जोशी



साहेबांनी जे सांगितले त्याचा अनुभव त्याला आला आहे. ही बाब निश्चितपणे आशादायी म्हणावी लागेल.

त्यानंतर आम्ही सरकारच्या 'आधार' योजनेचा आढावा घेतला. प्रत्येक भारतीयाला त्याची 'बायोमेट्रिक ओळख' आणि एक बारा अंकी क्रमांक देणारी ही सरकारची योजना आहे. तिचे प्रमुख नंदन निलेकणी, जे एक यशस्वी संगणक उद्योजक आहेत. म्हणून ही योजना भ्रष्टाचारापासून मुक्त राहिली आहे. तीत सरकारी कर्मचाऱ्यांचे प्रमाण नगण्य आहे. निलेकणी यांनी आपल्याला हवी ती माणसे महत्त्वाच्या जागांवर निवडलेली आहेत आणि म्हणूनच हा भारताचा आधार ठरू शकतो असे आम्हाला वाटते. आधारचा उपयोग अनुदान थेट देण्यास कसा होऊ शकतो याविषयी आम्ही गेल्या वर्षी मे महिन्यातच कल्पना मांडली होती. योगायोगाने त्याच कल्पनेची मिळतीजुळती योजना सरकारने चालू अर्थसंकल्पात मांडली. खते आणि रॉकेल-स्वयंपाकाचा गॅस यावरील अनुदान थेटपणे कसे द्यायचे याचा विचार करण्यासाठी नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करून तीस आपला अहवाल ४ महिन्यात देण्यात सांगण्यात आले आहे. निदान या वाटपातील भ्रष्टाचार तरी संपुष्टात येईल अशी आशा आहे.

शेतीमध्ये नवे तंत्रज्ञान येणे आवश्यक आहे. शेतमालास जर योग्य भाव मिळत नसेल तर निदान एकरी उत्पादन तरी वाढावे म्हणजे त्यामुळे शेतकऱ्यांचे जगणे सुसह्य होईल; पण कीटकनाशकांच्या व्यापारात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा लोकांनी जीएम तंत्रज्ञानाला विरोध केला. सरकारनेही त्यांच्या पुढे नमते घेत बीटी वांग्याला परवानगी नाकारली. या पार्श्वभूमीवर आम्ही जीएम तंत्रज्ञानाचा आढावा घेतला. जगात कोठेही त्याचे दुष्परिणाम झाल्याचे आढळून आलेले नाहीत. एवढेच काय पण काहीप्रसंगी जीएम विरोधकांनी खोटाच प्रचार केल्याचे निदर्शनात आले आणि बीटी बियाणे -ठिबक सिंचन वापरून एकरी २५ क्विंटलपेक्षा जास्त उत्पादन करणाऱ्या औरंगाबाद जिल्ह्यातील जरंडी गावच्या शेतकयांची कथा आम्ही प्रसिद्ध केली.

पावसाळ्यात पाऊस नियमितपणे होवो अथवा न होवो खत वाटपात सरकारी यंत्रणा गडबड करणार हे नक्की. सरकारच्या खत वाटपाच्या धोरणातल्या त्रुटी, शेतकऱ्यांचे झालेले हाल याचाही सविस्तर अभ्यास आम्ही केला. त्यानंतर वीज कंपनीच्या कारभारातली गडबड, कर्ज वाटपातली गडबड यास आम्ही प्रसिध्दी दिली. नंतर द्राक्ष उत्पादक, कांदा उत्पादक, कर्नाटकातील तूर उत्पादक आणि तामिळनाडूतील धान उत्पादक यांच्या प्रश्नांचाही आम्ही ऊहापोह केला.

डिसेंबरच्या महिन्यात आम्ही सुरेगावच्या हुतात्म्यांच्या कुटुंबीयांच्या भेटी घेतल्या. एवढ्या वर्षांनंतर परिस्थिती जराही बदलेली नाही हे खेदाने नमूद करावे लागते.

हे सर्व पुन्हा खास उल्लेख करून समोर आणण्यामागे एक खास कारणही आहे. शेतकऱ्यांच्या जीवनावर दूरगामी परिणाम करणाऱ्या सरकारी धोरणाची दिशा यामुळे स्पष्ट होते आणि सरकारचे धोरण शेतकऱ्याला मारत आहे हे कळूनही शेतकरी पुन्हा पुन्हा तीच भ्रष्ट सरकारे, तीच भ्रष्ट माणसे निवडून देत आहे. बुडत्याचा पाय खोलात

दुसरे काय?

### शेतीला सोन्याचे दिवस येणार हे नक्की

भारतातल्या तीन राज्यातल्या बऱ्याच शेतकऱ्यांना भेटून, त्यांच्या अडचणी समजावून घेऊन, त्यांच्या खेड्यांची अवस्था बघून, वर्तमानपत्रातील बरेच लेख वाचून, शेतकरी संघटनेचं साहित्य विशेषतः शरद जोशींचं लिखाण वाचल्यावर आणि थोडा विचार केल्यावर आम्हाला झालेला हा साक्षात्कार आहे.

### इंडियाच्या कटाची त्रिसूत्री पुढीलप्रमाणे आहे.

### १. शेतकऱ्याची लूट करणे

शेतकऱ्याने त्याचा शेतमाल सरकारने ठरविलेल्या भावात विकावा म्हणजे इंडियात राहणाऱ्यांना तो स्वस्तात खायला मिळेल असा सरकारचा कट आहे. शहरी लोक, पगारी नोकर, कामगार, सरकारी कर्मचारी हे संघटित आहेत. शहरातले कामगार, मजूर, व्यापारी इतर सर्वच व्यावसायिक संघटित आहेत. या संघटित वर्गाला नाराज करणे सरकारला परवडणारे नाही. मग त्यांना परवडावे म्हणून सरकार भारताची लूट करते आणि इंडियाचे पोट भरते. कापसाचेच उदाहरण पाहा. आज आंतरराष्ट्रीय पातळीवर कापसाचा भाव रु. ९००० प्रतिक्विंटलपेक्षा जास्त आहे; पण देशातल्या शेतकऱ्याने किती कापूस निर्यात करावा यावर सरकारची बंधने आहेत. याचे एक कारण असे की जर हा कच्चा माल निर्यात झाला तर देशातल्या अकार्यक्षम कापड उद्योगाला कच्चामाल मिळणार नाही. कापड उद्योगातील कामगार-मालक संघटित आहेत. तामिळनाडूमधल्या बऱ्याच राजकारण्यांचे हितसंबंध कापड उद्योगात गुंतलेले आहेत. युतीच्या राजकारणात युतीमधल्या एखाद्या घटकाला नाराज करणे सरकारला परवडणारे नाही. म्हणून कापसाची निर्यात खुली केल्यास देशातल्या कापूस शेतकऱ्यांचा मोठा फायदा होऊ शकतो याची जाणीव असूनदेखील कापड उद्योगाचे रक्षण करण्यासाठी सरकार तसे होऊ देणार नाही. वर वर दाखवण्यासाठी भले ते कामगारांची बाजू घेईल; पण सरकारचा अंतस्थ हेतू स्पष्ट आहे. इतर शेतीमालाच्या बाबतीत परिस्थिती वेगळी नाही. कांद्याचेच बघा. त्याचे भाव वाढू नयेत म्हणून (वाढलेच तर इंडिया नाराज होईल!) सरकारने तातडीने निर्यात बंदी केली; पण आज कांद्याचे भाव मातीमोल झाले असताना सरकारने काहीही केले नाही. कारण शेतकरी संघटित नाही. सरकारला त्यांची काळजी नाही.

तसे पाहिले तर द्राक्षाच्या उत्पादनविक्रीमध्ये सरकारची जाचक बंधने नाहीत; पण व्यापारी जी फसवणूक करतात त्यापासून संरक्षण देणारी कोणतीही व्यवस्था सरकारने अथवा कायद्याने केलेली नाही. दरवर्षी एखादा व्यापारी द्राक्ष उत्पादकांची देणी बुडवून 'गायब' होत असतो. अशा एखाद्याला पकडून शासन झाल्याचे कधीही घडले नाही. इंडियातल्या ग्राहकांसाठी मात्र सरकारचा 'ग्राहक संरक्षण कायदा' आहे. (अर्थात हा कायदा भारतातल्या ग्राहकालाही लागू होतो; पण त्याच्याकडे क्रयशक्तीचा अभाव असल्यामुळे त्याचा काही उपयोग होत नाही.) पंजाबमधला गहू उत्पादक शेतकरी असो वा तामिळनाडूमधला धान उत्पादक, महाराष्ट्रातला कापूस उत्पादक असो वा कर्नाटकातला तूर उत्पादक- शेतकरी हा तोट्यातच आहे, शेती सोडून जायची संधी शोधत आहे.

### २. खेडी अविकसित ठेवणे

आपल्या देशात ग्रामीण भागात आरोग्य सेवा, बारमाही चांगले रस्ते, पिण्यास योग्य पाणी खात्रीचा वीज पुरवठा याचा अभाव आहे. (काही प्रमाणात गुजरात आणि बिहारचा अपवाद वगळता.) त्याच सोबत खेड्यात चांगले शिक्षणही मिळत नाही. शाळा नाहीत, असल्याच तर तिथे पुरेसे शिक्षक नाहीत आणि जे काही शिक्षक आहेत ते चांगले शिकवित नाहीत. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा काळजी करण्याइतका खालावलेला आहे. म्हणून ग्रामीण भागात शिक्षण घेतलेल्या व्यक्तीस त्याचे शिक्षण निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे खालच्या दर्जाचीच नोकरी मिळू शकते. कित्येकांना तर हमाली-मजुरी अशी श्रमाची कामे करावी लागतात. जर भारतात इंडियासारख्या शाळा असल्या असत्या तर भारतीयांना बऱ्या नोकऱ्या मिळाल्या असत्या. १९९१ पासून सरकारने टप्प्याटप्प्यातून ग्रामीण भागावर होणाऱ्या खर्चात कपात केली आहे. एवढेच नाही तर जायकवाडीसारख्या धरणांचे पाणी आज शहरांची गरज भागवण्यासाठी वापरली जात आहे. खरे तर या धरणांची उभारणी सिंचनासाठी म्हणून करण्यात आली होती. सरकारचे सल्लागार अर्थ तज्ज्ञ श्री. रघू राम यांनी असे सुचविले आहे की शेतीक्षेत्राकडून जीडीपीमध्ये जास्त भर पडत नाही. म्हणून शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांचे प्रमाण कमी करून त्यांना उद्योगसेवा क्षेत्रात सामावून घ्यावे. या उलट कोणी असे का नाही म्हणत की देशातील अर्ध्यापेक्षा जास्त जनता शेतीवर अवलंबून आहे. त्यांना शेती करण्याचे कसब आणि ज्ञान प्राप्त आहे. म्हणून शेतीक्षेत्राचा जर विकास करण्यात आला, शेतीमाल प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यात आली आणि शेतीचे उत्पादन वाढवून शेतीमालाची निर्यात जर मोठ्या प्रमाणावर सुरू केली तर जास्तीत जास्त लोकांना रोजगार तर मिळेलच सोबत देशाचीही भरभराट होईल. इंडियावाले असे म्हणणार नाहीत कारण जर तसे झाले तर शेतकरी समृध्द होईल. आज शहरातले आयुष्य सुखाचे आहे तसे खेड्यातले आयुष्य होईल. इंडियातल्या माणसाला शेती करता येत नाही आणि त्याची अंगमेहनत करण्याची तयारी नाही. म्हणून तसे झाले तर इंडियाला परवडणारे नाही.

या सर्वांचा अडचणींचा एकत्रित परिणाम असा झाला की, खेड्यात राहणे दिवसेंदिवस दुरापास्त होत गेले. याच सुमारास आर्थिक सुधारणांमुळे, ज्या केवळ उद्योग आणि सेवाक्षेत्रात लागू करण्यात आल्या होत्या, शहराकडे पैशाचा ओघ सुरू झाला. सरकारी नोकरांचे पगार भरमसाट प्रमाणात वाढल्यामुळे त्यांच्या हातात जास्त पैसा खुळखुळू लागला. पैशाच्या या खुळखुळाटाकडे सर्वांत पहिले आकर्षित झाला तो ग्रामीण भागातील भूमिहीन मजूर. खेडे सोडून शहरात गेल्यावर त्याला राहायला एखादी झोपडी उभी करता येत होती. बऱ्यापैकी रोजगारही मिळत होता. इतकेच काय तर ज्या सोयीसवलती खेड्यात नव्हत्या, म्हणजे शाळा, सरकारी दवाखाने, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, नळाला पाणी इ.इ. त्या त्याला शहरात उपभोगायला मिळू लागल्या. खेड्यात त्याला काम देणारे मोजकेच होते. त्याचसोबत ग्रामीण समाजव्यवस्थेत मजुराचे स्थान खालचे असल्यामुळे त्याला तेवढे महत्त्वही नव्हते. शहरात मात्र परिस्थिती वेगळी होती. रोजगाराच्या जास्त संधी मजुराला मिळत होत्या. खेड्यातल्यापेक्षा जास्त सामाजिक प्रतिष्ठाही त्याला मिळत होती. त्याला बऱ्यापैकी पैसा आणि थोडेफार मानसिक समाधान मिळू लागल्यामुळे भूमीहीन मजुरांचे खेड्यातून शहराकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. याचा विपरीत परिणाम शेतीवर झाला. आधीच



सरकारी धोरणामुळे शेतीचे कंबरडे मोडले होते. त्यात शेतमजुरांचा प्रश्न असा गंभीर बनला. आज अशी परिस्थिती आहे की शहरातून, तालुक्याच्या गावातून वाहने भरभरून मजूर खेड्याकडे जातात शेतात काम करायला. या गाड्यांचा खर्च शेतकरी करतो. काम झाल्यावर या मजुरांना पुन्हा त्याच गाड्या त्यांच्या गावात नेऊन सोडतात. याचा वाईट परिणाम शेतीवर होत आहे. आधीच शेती परवडत नाही. त्यात खर्च वाढत गेल्यामुळे शेतकरी पार खचून गेला आहे. बँकातून कर्ज मिळणे अवघड आहे. सावकाराकडून कर्ज घ्यावे तर व्याजाचा फास गळ्याला लागतो अशी भीती शेतकऱ्याला असते.

### ३. शेती आपल्या ताब्यात घेणे

शेतकऱ्याला शेती परवडत नाही म्हणून तो हळूहळू कर्जबाजारी होत जाईल आणि शेवटी कंटाळून आपली शेती विकेल ही अटकळ इंडियाने बांधली होती. तसेच होत आहे. भारताचे शोषण करून इंडियाचा फायदा केल्यामुळे इंडियाची भरभराट झाली. १९९१ मध्ये सरकारने मुक्त अर्थव्यवस्था अर्धवट प्रमाणात का होईना स्वीकारली. या सुधारणा जरी अर्धवट होत्या, सरकारची अंमलबजावणी जरी भ्रष्टाचारात बरबटलेली होती, तरीही मुक्त अर्थव्यवस्थेची केवळ झलक अनुभवल्यामुळे इंडियाच्या मध्यमवर्गाचे उखळ पांढरे झाले. इंडियाने कर रूपाने जो पैसा सरकारकडे जमा केला त्यामुळे सरकारची झोळी भरून जाऊ लागली. सरकारनेही मग मागे पुढे न पाहता जनतेचा हा पैसा मुक्त हस्ते उधळायला सुरुवात केली. या उधळपट्टीतून देशाचा जेवढा विकास झाला त्यापेक्षा कितीतरी जास्त पट 'विकास' योजना राबविणाऱ्या सरकारी अधिकारी-राजकारणी-कंत्राटदार यांच्या अभद्र युतीचा झाला आणि त्यातून मोठ्या प्रमाणावर काळा पैसा निर्माण झाला. ग्लोबल फायनांशियल इंटिग्रीटी या संस्थेने आपल्या देशातल्या काळ्या पैशाचा अभ्यास करून एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले ते असे, 'जगभरात काळ्या पैशाची निर्मिती हत्यारे किंवा मादक पदार्थांच्या अवैध व्यापारातून होत असते. भारतात मात्र सरकारने विविध योजनांवर खर्च केलेल्या पैशांतून काळा पैसा निर्माण होत असतो!' हे निरीक्षण केवढे अचूक आहे याची प्रचिती आपण रोज घेत आहोत. दारिद्र्य रेषेखालील लोकांना अन्नवाटप असो वा रॉकेल वाटप, आदिवासींसाठी योजना असो वा स्पेक्ट्रम वाटप, सरकारी भूखंड विक्री असो वा क्रीडा स्पर्धांचे आयोजन यातल्या प्रत्येक कामातून सरकारी अधिकारी-राजकारणी-कंत्राटदार यांनी प्रचंड पैसा कमावला. हा काळा पैसा त्यांनी जमिनीच्या व्यवहारात गुंतवला आहे. आमच्याकडे पूर्ण आकडे नाहीत; पण आपल्या गावात झालेल्या, आपल्याला माहीत असलेल्या जमीन खरेदी-विक्री व्यवहारांवर नजर टाकली असता असे स्पष्ट होते की, गरजू शेतकरी असहायपणे आपली शेतजमीन विकत आहे. ही जमीन विकत घेणारे जास्त करून ज्यांच्याकडे काळा पैसा आहे असे इंडियातले लोक आहेत. नांदेड जिल्ह्यातल्या तामसा या छोट्या गावी मुंबईतल्या, बेंगळूरूमधल्या सरकारी नोकरदारांनी जमिनी विकत घेतल्या आहेत. मुख्य म्हणजे त्यांचा तामशाशी तर सोडाच नांदेड जिल्ह्याशीही काही संबंध नसताना! हे केवळ एक उदाहरण आहे. अशी कित्येक उदाहरणे वाचकांना माहीत असतील. या शिवाय राजरोस मार्गाने विविध प्रकल्प जसे, नवी मुंबई विमानतळ, एसईझेड वगैरेसाठी सरकारच्या आशीर्वादाने काही उद्योजकांनी जमिनी लाटण्याचे प्रयत्न केले. काही यशस्वी झाले तर काही फसले. यावरून हेच स्पष्ट होते की भारतातल्या शेतकऱ्यांकडून त्यांच्या शेतजमिनी ताब्यात घेण्याची प्रक्रिया इंडियातल्या काळ्या पैसेवाल्यांनी सुरू केली आहे. आकडेवारी जर उपलब्ध झाली तर हे आरशासारखे स्पष्ट होईल.

### शेतीला सोन्याचे दिवस येतील

इंडियाच्या कटाचाच हा शेवटचा भाग आहे. आज शेती तोट्याची आहे आणि खेड्यात जगणे दुष्कर आहे म्हणून शेतकरी शेती विकत आहे. एकदा ही शेती इंडियाच्या हातात गेली की इंडियाचे सरकार शेतीवरील सर्व बंधने काढून टाकेल. आज उणे सबसडी आहे. तेव्हा शेतकऱ्यास सरकार पगार देईल. निर्यात खुली करून त्यावर अनुदान देईल. तेव्हा शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञान आणले जाईल. थोडक्यात काय तर आज शेतकरी संघटना ज्या मागण्या करत आहे त्या साऱ्या पूर्ण केल्या जातीलच सोबत जे आज मागितले नाही ते पण दिल्या जाईल. फरक एवढाच की तेव्हा शेतीची मालकी भारतातल्या शेतकऱ्याकडे न राहता इंडियातल्या काळ्या पैसेवाल्यांची असेल. इंडियाचा हा कट भारतातल्या शेतकऱ्याने ओळखावा आणि वेळीच सावध व्हावे. पाणी नाकापर्यंत आलेले आहे. आता वेळीच एकी दाखवून काही केले नाही तर इंडियाच्या हाती मरणे भाग पडणार आहे.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानल पेठ, परभणी-४३१४०१.
मो. ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

■■

# २जी ते ३जी काय केले हो राजाजी !

**कपिल सिब्बलसारखा वकील निर्लज्जपणे राजांची बाजू घेत होता, कारण स्पेक्ट्रम तयार करण्यास काहीही खर्च येत नसल्यामुळे त्याची नक्की किंमत किती असावी हे ठरवता येत नाही. साहजिकच राजांनी स्पेक्ट्रम जरी कमी किमतीस विकले तरी तो घोटाळा नसून फार फार तर त्यांना 'व्यवहार ज्ञान' नसल्याचे लक्षण आहे व त्यामुळे हा घोटाळा होत नाही, अशी मखलाशी कपिल सिब्बल करीत होते; पण महालेखापालांचे अधिकार, बाजारात प्रत्यक्षात घडलेले व्यवहार व प्रत्यक्षात विकलेले परवाने बघता न्याय व्यवस्थेने योग्य निर्णय घेतला आहे व कपिल सिब्बल या दीडशहाण्या वकिलाच्या नाकावर टिच्चून राजांना गजाआड केले आहे.**



**विश्वास प्र. पिटके**

भारतात मोबाईल कंपन्यांचे बस्तान चांगलेच बसलेले आहे व दूरध्वनी ही अत्यावश्यक सेवा झालेली आहे. आपण कल्पनासुद्धा करू शकणार नाही अशा प्रकारच्या सेवा ग्राहकाला केवळ मोबाईल फोनवर घरी बसल्या मिळणार आहेत. त्यामुळे भारतासारख्या विस्तीर्ण व भरपूर लोकसंख्येच्या देशात दूरध्वनी सेवा देणाऱ्या कंपन्यांना प्रचंड स्वारस्य आहे. या सर्व कंपन्या गबर व मोठ्या आहेत. साहजिकच सरकारी यंत्रणा व अशा मतलबी कंपन्या जर एकत्र आल्या तर नक्की किती व कसा गैरकारभार होऊ शकतो त्याचेच उदाहरण म्हणजे सध्या चालू असलेला २जी / ३जी घोटाळा.

मात्र नक्की काय झाले हे जर समजून घ्यायचे असेल तर सर्वप्रथम आपण या क्षेत्रातील तांत्रिक संज्ञा समजावून घेऊ.

आपल्यास परिचित असणारे घरगुती फोन जे दूरसंचार विभागातर्फे देशभर पसरवलेल्या तारेच्या जाळ्याने ऐकमेकांस जोडलेले असतात. त्यांना १जी म्हणजेच पहिल्या पिढीचे फोन म्हणतात. हेच ते फर्स्ट जनरेशन म्हणजेच १जी तंत्रज्ञान या फोनद्वारे आपण फक्त एकमेकांशी बोलू शकत होतो.

त्यानंतर आलेले तंत्रज्ञान यालाच आपण २जी म्हणजेच सेकंड जनरेशन म्हणतो. यात मोबाईल फोनचा समावेश होतो. २जी चे वैशिष्ट्य म्हणजे हे तंत्रज्ञान बिनतारी संदेशवहन करते व याद्वारे आपण लिखित संदेश पाठवू शकतो. ज्याला आपण एसएमएस म्हणतो. याद्वारे आपण फोटो अथवा चित्रही पाठवू शकतो. सध्या आपल्या हातात असणारे सर्व मोबाईल फोन हे २जी तंत्रज्ञानावर आधरित आहे.

३जी म्हणजेच थर्ड जनरेशन. मोबाईल फोनद्वारे मात्र आपण सतत चालू असणारी घटना म्हणजेच एखादा चित्रपट किंवा दूरचित्रवाणीवरचा एखादा कार्यक्रमसुद्धा पाठवू शकतो. याचे फायदे इतके प्रचंड आहेत, की याद्वारे धंद्याची गणितेच बदलून जाणार आहेत. ३जी तंत्रज्ञानावर आधारित मोबाईल फोनचा उपयोग चक्क दूरचित्रवाणीसारखा, तसेच संगणकासारखा होणार आहे. यातून इंटरनेटचा प्रचंड विस्तार अपेक्षित आहे. या फोनद्वारे एकमेकांशी बोलणारी माणसे प्रत्यक्ष एकमेकांना बघू शकतील. एकाच वेळी अनेक लोक एकमेकांना चक्क बघत बघत सर्वांशी बोलतील. शेअरबाजारातील चढउतार क्षणाक्षणाला जाणू शकतील, याच फोनवरून आपण गाड्यांची आरक्षणे, वैद्यकीय सल्ले व दूरस्थ शिक्षणासारखे कार्यक्रमही राबवू शकतो. वृत्तपत्र वाहिन्यांना तर असे तंत्रज्ञान म्हणजे सोन्याची खाणच आहे. साहजिकच सर्व मोबाईल कंपन्या २जी पासून ३जी कडे स्थलांतर करू पाहत आहेत. असे स्थलांतर फक्त दूरसंचार मंत्रालयाच्या हातात असते व त्यामुळेच मंत्रिमहोदय राजाजी या सर्वांच्या केंद्रस्थानी आहेत.

## स्पेक्ट्रम म्हणजे काय?

हे समजून घेण्यासाठी आपण आपल्या घरातील साधा रेडिओ कसा चालतो हे समजावून घेऊ.

रेडिओ स्टेशनवर ध्वनिमुद्रित अथवा ध्वनिचित्रित केलेले कार्यक्रम प्रथम तीव्र कंपनाच्या रेडिओ संदेशामध्ये तयार करून रेडिओ अँटेनाद्वारे वातावरणात मुक्तपणे पाठवले जातात. उदाहरणार्थ - रेडिओ मिर्ची या रेडिओ स्टेशनचे सर्व कार्यक्रम ९८.२ मेगा हर्टझ (म्हणजे ९८,२००,००० कंपने प्रति सेकंद) या कंपनामध्ये बदलले जातात व अँटेनाद्वारे हवेत पाठवतात. ज्या वेळेस आपण 'स्टेशन' निवडण्याचा काटा पट्टीवरील ९८.२ एमएचझेड या ठिकाणी आणतो. त्यावेळेस आतील यंत्रणेमुळे रेडिओ फक्त त्याच कंपनांना स्वीकारू शकेल अशा अवस्थेत

जातो. यालाच आपण रेडिओ ९८.२ एमएचझेडला ‘ट्यून’ झाला असे म्हणतो व आपल्याला हवेतून येणारे फक्त ९८.२ एमएचझेड कंपनांचे संदेशच कार्यक्रमाच्या स्वरूपात ऐकू येतात. या यंत्रणेत आपण फक्त पाठविलेले संदेश ऐकू शकतो; पण आपले बोलणे वा संदेश रेडिओ स्टेशनला पाठवू शकत नाही. हे संदेशवहन फक्त ९८.२ एमएचझेड या स्टेशनवरून आपल्याकडे असे एकांगीच असते. यालाच सिंप्लेक्स प्रणाली म्हणतात. यामध्ये फक्त एकच कंपनसंख्या असली तरी चालते. दूरध्वनीमध्ये मात्र बोलणे अथवा संदेशवहन दोन्ही बाजूने असणे आवश्यक असते. साहजिकच एक व्यक्ती आपले संदेश समजा १०० एमएचझेड या कंपनाद्वारे दुसऱ्याला पाठवत असेल तर दुसऱ्या व्यक्तीकडे १०० एमएचझेडला ‘ट्यून’ होईल असा फोन हवा. त्याचवेळी जर दुसऱ्या व्यक्तीला पहिल्या व्यक्तीशी बोलायचे असेल तर दुसरी व्यक्ती आपला संदेश १०० एमएचझेड या कंपनाद्वारे पाठवू शकणार नाही, कारण यंत्रणेला हा संदेश नक्की कोठून पाठवायचा आहे हेच न समजून गोंधळ उडेल. म्हणून दुसऱ्या व्यक्तीच्या हातातील मोबाईल त्याचा संदेश वेगळ्याच म्हणजे ११० एमएचझेड कंपनांद्वारे प्रथम व्यक्तीस पाठवतो. पहिल्या व्यक्तीच्या हातातील फोनमध्ये ११० एमएचझेड या कंपनांना ‘ट्यून’ करण्याची यंत्रणा असते. त्यामुळे प्रथम व्यक्ती दुसऱ्याचे बोलणे ऐकू शकतो व दोघांचे संभाषण होते. या दोन्ही कंपनसंख्या एकमेकांपासून फार जवळ असता कामा नयेत. नाहीतर दोन्ही संदेश एकमेकांत मिसळून गोंधळ उडेल. म्हणून या दोन्ही कंपनांमध्ये बऱ्यापैकी अंतर ठेवतात. साहजिकच दोन व्यक्तींच्या संभाषणासाठी मोबाईल कंपनीच्या ताब्यात वरील उदाहरणातील १०० एमएचझेड व ११० एमएचझेड या दोन्ही कंपनसंख्या असाव्या लागतात. जर अशी हजारो व्यक्तींची संभाषणे घडवून आणायची असतील तर प्रत्येक संभाषणास नव्या दोन कंपनसंख्या असाव्याच लागतात. म्हणजे जर एखाद्या मोबाईल कंपनीला १०० एमएचझेड ते १३० एमएचझेड अशा सर्व कंपनांचा एक पट्टाच (एकूण ३० एमएचझेड) बहाल केला तर ती कंपनी त्यातील कोणत्याही २ स्वतंत्र कंपनांद्वारे कितीतरी ग्राहकांची बोलणी व संदेशवहन घडवून आणू शकते. हा कंपनपट्टा, म्हणजेच एकूण ३० एमएचझेडचा पट्टा यालाच ‘स्पेक्ट्रम’ असे म्हणतात.

२जी तंत्रज्ञानात फक्त संदेशवहनच होत असल्याने साधारणतः ३० केएचझेड (३०,००० एचझेड) जाडीचा स्पेक्ट्रम पुरेसा असतो. फार फार तर २०० केएचझेड (२००,००० एचझेड) जाडीचा स्पेक्ट्रम म्हणजे २जी ला पर्वणीच. आज, सर्व मोबाईल कंपन्यांकडे जवळपास २०० केएचझेड रुंदीचा स्पेक्ट्रम आहे व याद्वारे लाखो मोबाईल ग्राहक त्यांनी जमा केले आहेत.

३जी तंत्रज्ञानात मात्र नुसतेच संदेशवहन नसते तर प्रचंड प्रमाणात माहिती, चित्रे व अनेक गोष्टी पण बिनतारी पाठवायच्या असल्यामुळे २जी मधील २०० केएचझेड एवढा मोठा स्पेक्ट्रम पण पुरत नाही. ३जीला कमीत कमी १५ एमएचझेड किंवा २० एमएचझेड (१५,०००,००० एचझेड किंवा २०,०००,००० एचझेड) एवढ्या रुंदीचा स्पेक्ट्रम लागतो. म्हणजेच २जी पेक्षा ५०० ते १००० पट एवढा स्पेक्ट्रम लागतो. साहजिकच सर्व मोबाईल कंपन्या जास्तीत जास्त रुंद स्पेक्ट्रम मिळवण्याच्या मागे आहेत. थोडक्यात सांगायचे झाल्यास महामार्गाची रुंदी जितकी जास्त तितकी वाहने त्या मार्गावरून वेगाने व अपघात न होता सुरळीतपणे जाऊ शकतात व प्रचंड प्रमाणात वाहतूक होते. त्याचप्रमाणे स्पेक्ट्रम जितका रुंद तितके जास्तीत जास्त ग्राहकांना जास्तीत जास्त संदेश वहन कमीत कमी वेळात करता येते व प्रचंड मोठा धंदा व फायदा मिळतो हे त्यामागचे गणित आहे.

आता आपण रेडिओ तरंगाच्या स्पेक्ट्रमची विभागणी कशी केली आहे ते बघू.

AM रेडिओ - ५३५ KHZ ते १७०० KHZ (११६५ KHZ रुंद स्पेक्ट्रम)
SW रेडिओ- ५.९ KHZ ते २६.१ KHZ (२०.२ KHZ रुंद स्पेक्ट्रम)
CB रेडिओ - २६.९३ MHZ ते २७.४१ MHZ (०.४५ MHZ रुंद स्पेक्ट्रम)
दूरदर्शन (१) - ५४ MHZ ते ८८ MHZ (३४ MHZ रुंद स्पेक्ट्रम)
FM रेडिओ - ८८ MHZ ते १०८ MHZ (२० MHZ रुंद स्पेक्ट्रम)
दूरदर्शन (२) - १७४ MHZ ते २२० MHZ (४६ MHZ रुंद स्पेक्ट्रम)

मोबाईल सेवेसाठी भारतात तीन वेगवेगळे स्पेक्ट्रम आहेत. ४५० MHZ, ८०० MHZ व २१०० MHZ चा स्पेक्ट्रम. एका मोबाईल कंपनीस एक याप्रमाणे एकूण २० MHZ रुंदीचे असे बरेच स्पेक्ट्रम विक्रीस काढले गेले व वेगवेगळ्या कंपन्यांना विकले.

## ज्याच्या हाती स्पेक्ट्रम तोच राजा!

जगभरात स्पेक्ट्रम हे विक्री योग्य वस्तू मानले जाते; पण स्पेक्ट्रम निर्मितीस कसलाही खर्च येत नसल्यामुळे याची नक्की अशी किंमत ठरवता येत नाही. साहजिकच स्पेक्ट्रम विकत घेतल्यावर मोबाईल कंपनीस त्यातून किती फायदा होणार त्या प्रमाणात स्पेक्ट्रम विक्रीची किंमत ठरविली जाते. यासाठी बाजारपेठेचा अभ्यास करणे आवश्यक असते. भारताच्या महालेखापालांचा (Comptroller General & Auditor) असा अभ्यास होता. मंत्री या नात्याने श्री. राजांनीपण असा अभ्यास करणे आवश्यक होते; पण त्यांनी तो सोयीस्कररीत्या केला नाही. प्रत्यक्ष बाजारभावापेक्षा फारच कमी किमतीत या स्पेक्ट्रम त्यांनी मोबाईल कंपन्यांना विकल्या. प्रत्यक्ष बाजारभाव व श्री. राजांनी आणलेली किंमत यामधील प्रचंड तफावत म्हणजेच सरकारचे झालेले नुकसान असे महालेखापालांचे म्हणणे आहे, असे सरकारी नुकसान त्यांच्या मते सुमारे १,७६,७०० कोटी एवढे आहे. हाच तो प्रत्यक्ष स्पेक्ट्रम घोटाळा.

## राजांनी नक्की काय केले?

१. बरखा दत्त या एनडीटीव्हीच्या वार्ताहराने श्री. राजा यांनाच मंत्रिपद मिळावे यासाठी सरकारशी रदबदली केली. इतकेच नव्हे तर बरखा दत्त व हिंदुस्थान टाइम्सच्या वीर संघवी या पत्रकारांनी घोटाळा होत आहे हे माहीत असूनही मुद्दाम बातम्या दाबून टाकल्या.

२. नीरा राडिया या ‘स्वयंघोषित कार्यकर्ती’ने टाटा समूहासाठी जे जे केले ते मुद्दामच दडपण्याचे काम वीर संघवी करत होते.

३. पंतप्रधानांचा सल्ला न मानता राजांनी कसलीही पारदर्शिता न ठेवता जे प्रथम येतील त्यांनाच परवाने देण्याची घोषणा केली. इतकेच नव्हे तर परवान्यासाठी अर्ज करण्याची शेवटची मुदत ०१ ऑक्टोबर २०१० असतानासुद्धा, अचानक २५ सप्टेंबर २०१० अशी जाहीर करून बऱ्याच कंपन्यांना जाणूनबुजून बाजूला सारले.

४. परवाना मिळवण्यासाठी लागणारे कोणतेही निकष ज्या कंपन्यांकडे नव्हते अशा कंपन्यांना परवाने विकले व तेही फार कमी किमतीला.



५. वित्त मंत्रालयाशी विचारविनिमय करूनच परवान्याची किंमत ठरवणे आवश्यक होते. मात्र तसे मुद्दाम केले नाही.

६. २जी स्पेक्ट्रमसाठी एकूण १२२ परवाने विकले व त्यातले ८५ परवाने अशा कंपन्यांना विकले ज्या कोणत्याही निकषात पात्र नव्हत्या व दूरसंचार अथवा मोबाईल क्षेत्राशी कसलाही संबंध नसणाऱ्या होत्या.

७. ५७५ अर्जदार कंपन्यांपैकी अचानक ३४३ अर्जदार कंपन्यांना बाद ठरविण्यात आले, कारण अशा कंपन्यांना काढून टाकण्यासाठी अचानक निवडीचे निकष बदलले.

८. मे २००७ मध्ये राजा यांना दूरसंचार मंत्रालयाचे मंत्रिपद मिळाले. जानेवारी २००८ मध्ये त्यांनी ४.४ एमएचझेड रुंदीचे स्पेक्ट्रम ६ नव्या कपन्यांना, जो प्रथम येईल त्यास, या तत्त्वावर विकले. यातील प्रत्येक स्पेक्ट्रम सरासरी १६५० कोटी रु. या किमतीला राजांनी विकला.

९. स्वान टेलिकॉम या कंपनीस श्री. राजांनी स्पेक्ट्रम रु. १५३७ कोटींना विकले. प्रत्यक्षात या कंपनीत रिलायन्स कम्युनिकेशन या कंपनीचे १०.७१ टक्के भांडवल होते. नियमानुसार एक टेलिकॉम कंपनी दुसऱ्या टेलिकॉम कंपनीमध्ये १० टक्केपेक्षा जास्त गुंतवणूक करू शकत नाही व केल्यास निदान त्याच क्षेत्रात परवाना मिळवू शकत नाही. नाहीतर त्या क्षेत्रात मक्तेदारी निर्माण होऊ शकते व ग्राहकांना सुयोग्य सेवा मिळू शकत नाही. मात्र तरीही स्वानला परवाना मिळाला. असे लक्षात येते आहे की स्वान ही कंपनी अशाच छुप्या पद्धतीने रिलायन्स या कंपनीसाठी परवाने गोळा करीत आहे.

१०. परवाने मिळताच स्वानने आपले ४५ टक्के भाग इटिसलट या दुबईस्थित परदेशी कंपनीस रु. ४२०० कोटी रुपयांस विकून टाकले. जर ४५ टक्के म्हणजे रु. ४२०० कोटी तर १०० टक्के म्हणजे रु. ९३३३ कोटी असे साधे त्रैराशिक आहे. याचाच अर्थ असा की स्वानच्या रु. १५७३ कोटींच्या परवान्याची खरी किंमत रु. ९३३३ कोटी आहे.

११. युनिटेक समूह, जो बांधकाम क्षेत्रात अग्रगण्य आहे व दूरसंचार क्षेत्राशी ज्यांचा दूर दूरचासुद्धा संबंध नाही अशा कंपनीस २जी चा परवाना रु. १६६१ कोटीस विकला गेला. तात्काळ युनिटेकने आपला ६० टक्के हिस्सा टेलिनॉर या नॉर्वेस्थित परदेशी कंपनीस रु. ६२०० कोटींस विकला. वरील त्रैराशिकानुसार या परवान्याचे बाजारमूल्य कमीत कमी रु. १०३३३ कोटी होते.

१२. अशाच तऱ्हेने टाटा टेलिसर्व्हिसेसनेही आपला सुमारे रु. १४४० कोटींचा परवाना जपानच्या डोकोमो कंपनीस रु. १३२३० कोटींला विकला तोही आपला फक्त २६ टक्के हिस्सा विकून. बाजारभावानुसार या परवान्याचे मूल्य सुमारे रु. ५०८८३ कोटी होते.

१३. अशा तऱ्हेने श्री. राजांनी एकूण विकलेल्या २जी स्पेक्ट्रम परवान्यांची किंमत रु. १०७७२ कोटी होते. मात्र त्याचे बाजारमूल्य रु. १७६७०० कोटी होते. अशा तऱ्हेने राजांनी मुद्दाम कमी किमतीस परवाने विकून सर्व परवानेधारकांना तेच परवाने इतरांना जवळपास १५ ते १६ पट किमतीत विकण्याची संधी प्राप्त करून दिली व सरकारचे उत्पन्न बुडविले. हाच तो स्पेक्ट्रम घोटाळा.

१४. आपल्यास मिळालेल्या फायद्यातून अशा सर्व मोबाईल कंपन्यांनी श्री. राजांना कमीत कमी रु. ३००० कोटी दिलेले असावेत असे नुकतेच जाहीर झालेले आहे. साहजिकच हे प्रकरण फक्त 'चुकीचे मूल्यमापन' या एकाच प्रकारात न येता प्रचंड मोठा भ्रष्टाचार या सदराखाली येते.

कपिल सिब्बलसारखा वकील निर्लज्जपणे राजांची बाजू घेत होता, कारण स्पेक्ट्रम तयार करण्यास काहीही खर्च येत नसल्यामुळे त्याची नक्की किंमत किती असावी हे ठरवता येत नाही. साहजिकच राजांनी स्पेक्ट्रम जरी कमी किमतीस विकले तरी तो घोटाळा नसून फार फार तर त्यांना 'व्यवहार ज्ञान' नसल्याचे लक्षण आहे व त्यामुळे हा घोटाळा होत नाही, अशी मखलाशी कपिल सिब्बल करीत होते; पण महालेखापालांचे अधिकार, बाजारात प्रत्यक्षात घडलेले व्यवहार व प्रत्यक्षात विकलेले परवाने बघता न्याय व्यवस्थेने योग्य निर्णय घेतला आहे व कपिल सिब्बल या दीडशहाण्या वकिलाच्या नाकावर टिच्चून राजांना गजाआड केले आहे.

सर्वसामान्यांच्या भाषेत सांगायचे झाल्यास या घोटाळ्याचे वर्णन असे करता येईल. आपल्या घरातील जुना टी.व्ही. वडिलांनी मुलांस विकण्यास सांगितले. वडिलांची सुयोग्य अपेक्षा होती, की हा टी.व्ही. बाजारात १०,००० रु. ला विकला जावा. मुलाने तो टी.व्ही. मुद्दामच आपल्या खास मित्राला जाणूनबुजून फक्त रु. २००० ला विकला. तात्काळ त्या मित्राने तोच टीव्ही बाजारात जाऊन रु. १०,००० ला विकला व रु. ८,००० नफा मिळवला. दोन्ही मित्रांनी हा नफा आपसात वाटून घेतला. अशा तऱ्हेने वडिलांचे व त्यायोगे कुटुंबाचे रु. ८००० चे नुकसान झाले. मुलगा मात्र स्वार्थीपणे आपल्या हिश्श्यावर मजा करत होता. अशा मुलाला कुटुंबीयांनी कठोर शिक्षाच केली पाहिजे.

*(महाराष्ट्राचे उद्योगविश्व फेब्रुवारी २०११ मधून साभार... लेखक ऊर्जा क्षेत्रातील व तंत्रज्ञान विकास आणि प्रकल्प व्यवस्थापन क्षेत्र व विपणन क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत.)*

**विश्वास प्र. पिटके**
मो. ९०११०९२७८१, ९८५०९९५९६८
vishwas.pitke@gmail.com

# वेळ येऊन ठेपलीय पर्यायी ऊर्जास्त्रोत शोधण्याची

**भारताला सुमारे ८०% तेलाची आयात करावी लागते. त्यामुळे ऊर्जेच्या प्रश्नाचे गांभीर्य व परावलंबित्व या दोन्हीही गोष्टी फार कळीच्या ठरत आहेत. भारत हा विकसनशील देश आहे व पुढील २० वर्षांत देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न बघितले जात आहे. या स्वप्नाला मूलभूत सुविधांचा म्हणजे रस्ते, वीज, पाणी, भांडवल व कुशल मनुष्यबळ यांचा भक्कम आधार उभा केल्याशिवाय हे स्वप्न साकार होणे शक्य नाही. वरील सर्वच मूलभूत सुविधांचा विचार केला असता कोणतीच सुविधा पूर्णपणे आणि येत्या २० वर्षांचा विचार करून उभारली जात आहे असे दिसत नाही.**



**ज्ञानेश्वर शेलार**

भारतातील ऊर्जा समस्या गंभीर होत आहेत. त्यातून मार्ग काढण्यासाठी जलविद्युत, औष्णिक विद्युत आणि आण्विक विद्युत प्रकल्प उभारण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सौरऊर्जा, समुद्राच्या लाटांपासून, जैविक कचऱ्यापासून ऊर्जा मिळविणे व इथेनॉलचा वापर करणे यांचाही विचार व्हायला हवा. गेल्या दहा वर्षांपासून म्हणजे सरदार सरोवर या नर्मदा नदीवरील प्रकल्पाच्या उभारणीपासून काही प्रश्न सातत्याने चर्चेत आहेत. त्यातील पर्यावरणाचा प्रश्न व जमीन अधिग्रहणाचा प्रश्न हे कोणत्याही नवीन प्रकल्पाच्या वेळी गंभीर रूप धारण करतात असे दिसून येते.

भारताला सुमारे ८०% तेलाची आयात करावी लागते. त्यामुळे ऊर्जेच्या प्रश्नाचे गांभीर्य व परावलंबित्व या दोन्हीही गोष्टी फार कळीच्या ठरत आहेत. भारत हा विकसनशील देश आहे व पुढील २० वर्षांत देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न बघितले जात आहे. या स्वप्नाला मूलभूत सुविधांचा म्हणजे रस्ते, वीज, पाणी, भांडवल व कुशल मनुष्यबळ यांचा भक्कम आधार उभा केल्याशिवाय हे स्वप्न साकार होणे शक्य नाही. वरील सर्वच मूलभूत सुविधांचा विचार केला असता कोणतीच सुविधा पूर्णपणे आणि येत्या २० वर्षांचा विचार करून उभारली जात आहे असे दिसत नाही. विजेच्या बाबतीत तर २००८, २०१० आणि आता २०१२ अशी आश्वासने दिली जातात व देश स्वयंपूर्ण होईल असे सांगितले जाते. आता सर्वांनाच असे वाटते, की २०१२ साली फक्त साल बदलेल. २०१४ साली आपण स्वयंपूर्ण होऊ असे सांगितले जाईल हे आताच वाटायला लागले आहे.

विजेच्या निर्मितीत जगभर विशेषतः विकसित देशांमध्ये अणुऊर्जेचा मोठा वापर केल्या जातो. जापानमध्ये आलेल्या त्सुनामीने मात्र अणुऊर्जेवर आणि पर्यायाने रत्नागिरीजवळ होणाऱ्या जैतापूर येथील अणुवीज प्रकल्पावरही प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. जैतापूरबद्दल पर्यावरण व जमीन अधिग्रहण हे दोन प्रश्न जपानच्या उदाहरणाने आणखीनच गंभीर बनले आहेत. जपानमध्ये त्सुनामी नंतर कुलिंग सिस्टिम बंद पडल्याने २ रिॲक्टर्सचा स्फोट होऊन वीस किलोमीटरपर्यंत किरणोत्साराचा धोका पसरला आहे. पाच रिॲक्टर्सपैकी शिल्लक तीन रिॲक्टर्सही सुरक्षित आहेत, असे आजच म्हणता येणार नाही. जपान दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्बचा मारा झाल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीला पुन्हा एकदा तोंड देत आहे. जैतापूर येथे होऊ घातलेला प्रकल्प अत्यंत सुरक्षित आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री, प्रधानमंत्री, अणुऊर्जा आयोगाचे मुख्य काकोडकर हे सर्वच वारंवार देत असले तरी विरोधकांच्या हाती प्रकल्प बंद पाडण्यासाठी आयतेच कोलीत मिळाले आहे. अपघातानंतर किरणोत्साराचा, पर्यावरणाच्या विनाशाचा धोका हे एक मोठे कारण आहे. या अगोदरही प्रकल्पातून निघणारे उष्ण पाणी समुद्रात सोडल्यामुळे समुद्राच्या पाण्याचे तापमान बदलणे व तेथील मासे व इतर जीवांवर होणारे परिणाम, मासेमारीवर होणारे परिणाम, वनस्पतींवर होणारे परिणाम इत्यादी पर्यावरणाचे प्रश्न सतत चर्चेत आहेत. त्याचबरोबर प्रकल्पातून निघालेल्या अणुकचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाईल व परिसरातील शेती, आंबा आणि काजूच्या बागा यांच्यावर काय परिणाम होईल? असे प्रश्न निर्माण करून प्रकल्पाला सतत विरोध होत आहे.

दुसरा प्रश्न म्हणजे जमीन अधिग्रहणाचा! जैतापूर येथील ज्यांची जमीन प्रकल्पात गेली ते जमिनीची किंमत कमी मिळते यासाठी भांडत आहेत. आपल्या विरोधाला धार यावी यासाठी पर्यावरणाचा प्रश्नही शेतकरी उपस्थित

करीत आहेत. कोणत्याही प्रकल्पासाठी रस्ते, निवासी वापरासाठी जमीन अधिग्रहण होते तेव्हा त्याला शेतकरी तीव्र विरोध करतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना दिली जाणारी जमिनीची किंमत ही बाजारभावापेक्षा दहा ते वीस पट कमी असते. जवळजवळ ४०% शेतकऱ्यांना शेती परवडत नाही म्हणून शेतीतून बाहेर पडायचे आहे. बाहेर पडण्याचा योग्य मार्ग सापडत नाही किंवा त्यानंतर काय करायचे? हाही मोठा गंभीर प्रश्न असतो. त्यामुळे शेती द्यायची इच्छा असली तरीसुद्धा ही आमची काळी आई आहे, आम्ही तिच्यावर पोट भरतो, आमच्या वडिलोपार्जित शेतीतून आम्हाला उठवले जात आहे. गाव सोडून जावे लागेल, याचे दुःख आहे. कमी शेती असल्यामुळे तीच शेती जर प्रकल्पात गेली तर आम्ही भूमिहीन होऊन जाऊ, अशी कारणे सांगितली जातात; पण जेव्हा बाजारभावाप्रमाणे किंमत मिळण्याची शक्यता तयार होते, तेव्हामात्र शेतकरी शेती देण्यास तयार होतात. याचाच अर्थ असा, की त्यांच्या मालमत्तेची योग्य किंमत केली जात नाही आणि ती केली गेल्यास शेतकरी कुठल्याही प्रकल्पाला किंवा इतर कोणत्याही कारणासाठी जमीन अधिग्रहण होत असेल तर विरोध करणार नाहीत. यातील मोठा अडसर हा १८९४चा ब्रिटिश कालीन जमीन अधिग्रहण कायदा आहे. सर्व विरोधी पक्ष वेळोवेळी केवळ विरोधासाठी विरोध अशीच भूमिका घेताना दिसतात. विधानसभेत आणि लोकसभेत निवडून गेलेले लोकप्रतिनिधीही जैतापूरला जाऊन किंवा ज्या ठिकाणी प्रकल्प होणार असेल, त्या ठिकाणी जाऊन शेतकऱ्यांना जमा करतात व जमीन अधिग्रहण करणे आणि तुम्हाला देशोधडीला लावणे हे सरकारचे धोरण आहे, त्यामुळे त्याला विरोध झाला पाहिजे अशी भूमिका घेतात किंवा प्रकल्प व्हावा असे वाटत असेल, तर गप्प बसतात. लोकप्रतिनिधीगृहात १८९४च्या कायद्यात बदल झाला पाहिजे व कालानुरूप त्यामध्ये योग्य त्या सुधारणा करून जमीन अधिग्रहण हे कुणावरही भार टाकणारे किंवा अन्यायकारक राहणार नाही, असा कायदा करावा, असा आग्रह धरीत नाहीत. त्यांना फक्त विरोधासाठी विरोधच करायचा असतो. कायदे बदलण्यासाठी लोकप्रतिनिधीगृहात चर्चा झाली पाहिजे, असा आग्रह न धरता आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जातो.

जैतापूरबाबतही सर्वच विरोधक एकत्र येऊन हा प्रकल्प कदापिही होऊ दिला जाणार नाही, अशा गर्जना करीत आहेत. शिवसेनेने यासाठी आपण आंदोलन उभारू असा इशारा दिला आहे. भाजप मात्र गप्प आहे. इतर छोटे-मोठे पक्षही पर्यावरणाच्या कारणासाठी किंवा कोकणचा विनाश टाळायचा आहे म्हणून हा प्रकल्प होऊ नये असा आग्रह धरीत आहेत. जमीन अधिग्रहणाच्या बाबत मात्र फक्त किंमत वाढवून द्यावी एवढेच म्हटले जाते. कायद्यातील बदलाविषयी कोणीही ब्र शब्द काढायला तयार नाही. कदाचित सत्ताधारी उद्या विरोधक होतील आणि पुन्हा विरोधक हे सत्ताधारी होतील. सत्ताधाऱ्यांना असे प्रकल्प उभे करायचे असतात आणि लोकभावना म्हणून विरोधकांनी त्याला विरोध करायचा असतो, असे समीकरण तयार झाले आहे. हा पर्यावरणाचा व जमीन अधिग्रहणाचा प्रश्न कायमसाठी निदान काही अंशी सोडवला जाऊ शकतो. तसे न करता विरोधासाठी विरोध करायचा, कारण कोठेही प्रकल्प उभा राहिला की त्याला विरोध करून लोकांचा पाठिंबा मिळवायचा आणि आपण सत्तेत गेलो की पुन्हा तेच करायचे. कदाचित सत्तेची स्वप्ने पाहणाऱ्यांना असा एखादा कायदा बदलून विरोध करण्याची जागा कायमची गमावून बसण्याची इच्छा नाही. त्यामुळे पर्यावरण व जमीन अधिग्रहणाबाबत वेगवेगळ्या बाजूंनी विचार करायला कोणीही तयार नाहीत.

अणुऊर्जा जर अणुबॉम्बसारखीच स्फोटक असे आणि तिची प्रचिती जपानमध्ये झालेल्या प्रलयंकारी त्सुनामी दिली असेल, तर इतर ऊर्जा स्रोतांचा विचार आपण कधी करणार आहोत? यामध्ये सौर ऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. आपल्या देशात पावसाळ्याचे चार महिने सोडले तर सूर्यप्रकाश मोठ्या प्रमाणावर संग्रहित करणे शक्य आहे. त्यासाठी जागा मोठ्या प्रमाणावर लागते, असे कारण सांगितले जाते. आपल्या देशात जवळजवळ १२% जमीन पडीत किंवा नापीक आहे जेथे जंगल, झाडे, झुडपेसुद्धा नाहीत अशा डोंगराळ, खडकाळ, नापीक जमिनीवर ऊर्जेचे पीक घेणे शक्य आहे. सौर ऊर्जेत संशोधनाची गरज आहे; परंतु हे सर्व संशोधन जर्मनी, नॉर्वे, स्वीडन, अमेरिका अशा देशांत होते. भरपूर सूर्यप्रकाश मिळणाऱ्या भारतात मात्र सौरऊर्जा संयंत्रे व तंत्रज्ञान ज्या ठिकाणी अत्यंत कमी सूर्यप्रकाश मिळतो अशा देशांकडून घेतले जाते. अर्थात अणुऊर्जा तंत्रज्ञानही आपल्याला अमेरिकेकडून मिळाले आहे. फ्रान्स अणुभट्ट्या उभारीत आहे. आपण ऊर्जेच्या बाबतीत एवढेच नव्हे तर त्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाच्याबाबतीत आणि तेलाच्या बाबतीतही परावलंबीच आहोत.

शेतीतून मिळणाऱ्या इथेनॉलचा पेट्रोलबरोबर वापर वाढवून किंवा पूर्णपणे इथेनॉलवर चालणाऱ्या मोटारी वापरणे सहज शक्य आहे. इथेनॉल ५% वापरायचे की १०% वापरायचे याचा वाद गेल्या पंधरा वर्षांपासून चालू आहे. उसाचे भरघोस उत्पन्न झाल्यामुळे ८०० कोटी रुपयांची साखर पडून आहे. येत्या गळीत हंगामात तयार केलेली साखर आणखी शिल्लक पडेल. आता साखरेचे काय करावे, असा प्रश्न साखर कारखान्यांसमोर उभा राहिला आहे. अशातच निर्यातीला बंदी असल्यामुळे निर्यात करणेही शक्य नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून उसाची साखर करण्याऐवजी उसाचे डायरेक्ट इथेनॉल तयार करण्याचे प्रकल्प सुरू करणे आवश्यक आहे. असे प्रकल्प सुरू करायला परवानगी मिळत नाही आणि इथेनॉलच्या वापरालाही परवानगी मिळत नाही. शेतकऱ्यांचे आणि देशाचे मौल्यवान असे इंधन वाया गेल्यामुळे किंवा त्याचा योग्य न केल्याने दोघांचेही प्रचंड नुकसान होत आहे. इथेनॉल वापरायला परवानगी मिळाल्यास अतिरिक्त उसाचा पडून असलेल्या साखरेचा आणि उसाच्या आणि साखरेच्या बाजारभावाचा प्रश्न निकालात निघू शकतो. ज्याप्रमाणे ब्रिटिश कालीन १८९४चा कायदा बदलावा अशी इच्छा राजकारण्यांच्या मनात नाही, तशीच इथेनॉल वापराला परवानगी देऊन शेतकऱ्यांचे आणि देशाचेही काही भले करावे, असे त्यांच्या मनात असावे असे वाटत नाही.

**ज्ञानेश्वर शेलार**
औरंगाबाद.
मो. ९२२६७९७०१८

■■

# कृषी क्षेत्रासंबंधीच्या 'व्हिजन'चा अभाव

डॉ. एम. एस. स्वामीनाथन

ग्रामीण भागातील तरुणांना खेड्याकडे वळविण्यात अर्थसंकल्प २०११ अपयशी झाला. एकीकडे टोकाचे परिवर्तन झाल्यामुळे सारे जगच अन्नसंकटाचा सामना करीत आहे. महत्त्वाची धान्य उत्पादक राष्ट्रे-त्यात चीनचाही समावेश आहे- अन्न टंचाईला सामोरी जात आहेत. दुसरीकडे पश्चिम आशियातील पेट्रोलियम उत्पादक राष्ट्रांमध्ये लोकशाहीसाठी संघर्ष सुरू असल्यामुळे त्या राष्ट्रातील तेल उत्पादनावर विपरीत परिणाम झाल्यास पेट्रोल आणि पेट्रोलियम उत्पादने यांच्या किमतीत वाढ होत आहे. भरीसभर भारतातील सतत वाढणारे वस्तूंचे भाव आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर भारताचे अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी अर्थसंकल्प सादर केला आहे. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी पूर्व भारताच्या कृषी उत्पादनाकडे विशेष लक्ष पुरविले होते. शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज देण्यासाठी रु.७२,००० कोटींची तरतूद करण्यात आली होती; पण त्याचा लाभ बड्या शेतकऱ्यांनीच मोठ्या प्रमाणावर घेतला. जमिनीचे लहान तुकडे असणारे शेतकरी त्या लाभापासून वंचित राहिले होते. मागच्या वेळेचा अनुभव लक्षात घेऊन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी मध्यम व लहान शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्यास बँकांना सांगितले आहे. जे शेतकरी कर्जाची नियमितपणे फेड करतात, त्यांना व्याजदरात सवलत देण्यात येणार आहे. २००६ साली राष्ट्रीय कृषी आयोगाने यासंदर्भात सूचना केल्या होत्या. त्याची अंमलबजावणी यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. आता कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्यांना चार टक्के दरानेच कर्जाची परतफेड करता येणार आहे. ग्रामीण भागात धान्य साठवून ठेवण्यासाठी गोदामे नसतात. या गोदामांच्या उभारणीसाठी या अर्थसंकल्पात भरपूर तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे वाईट हवामानामुळे धान्य खराब होण्याचे प्रमाण बरेच कमी होईल. मोठे फूड पार्क उभारण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. गोदामांची व कोल्ड स्टोअरेजची उभारणी करण्यासाठी खासगी गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. ग्रामीण भागात, आदिवासी भागात कुपोषणाची समस्या भेडसावत असते. आरोग्याच्या चांगल्या सोयी उपलब्ध नसणे, पोषक अन्न न मिळणे, गर्भावस्थेच्या काळात गर्भवती स्त्रियांना पोषक आहार न मिळणे या कारणांमुळे कुपोषणाचे बळी वाढत असतात. हे टाळण्यासाठी अन्नसुरक्षा विधेयक सादर करण्याचा संकल्प वित्तमंत्र्यांनी केला आहे. शेतकऱ्यांना कमी किमतीत रॉकेल आणि रासायनिक खते उपलब्ध व्हावीत यासाठी सरकार या वस्तूंवर सबसिडी देत असते. पण या सबसिडीचा लाभ उपभोक्त्यांपर्यंत पोचतच नाही हे सरकारच्या लक्षात आले आहे. त्यामुळे ही सबसिडी सरळ उपभोक्त्यांच्या हाती देण्यात येणार आहे. त्याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा अशी अपेक्षा अर्थमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांकडून अलीकडे ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करण्यात येतो. त्यासाठी लागणारी उपकरणे महाग असतात. त्यामुळे त्यावरील अबकारी कर आता कमी करण्यात आला आहे. त्यामुळे ठिबक सिंचनाच्या पद्धतीचा वापर शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात केला जाईल व पाण्याची नासाडी टळून कमी पाण्यात पिकांचे सिंचन करता येईल अशी केंद्र सरकारची अपेक्षा आहे. स्वावलंबी महिलांचा गट निर्माण करण्यासाठी अर्थसंकल्पात रु.५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही योजना महिला किसान कार्यक्रमाशी जोडली तर त्याचा परिणाम ग्रामीण उत्पन्नावर होईल. तसेच ग्रामीण महिलांची आर्थिक स्थिती सुधारण्यास त्यामुळे मदत होईल.

एकूणच अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या दृष्टीने काही चांगल्या तरतुदी करण्यात आल्या असल्या तरी एकूण अर्थसंकल्पात शेतकऱ्यांविषयीची दृष्टी अभावानेच पाहायला मिळते. शेतकरी शेतीवर सतत काम करीत राहावा यासाठी कोणतेही उपाय अर्थसंकल्पात सुचविण्यात आलेले नाहीत. तसेच ग्रामीण युवक ग्रामीण भागातील शेतीत लक्ष घालतील या दृष्टीने ग्रामीण तरुणांसाठी कोणतीही प्रोत्साहनपर योजना एम.एस. अर्थसंकल्पात पाहावयास मिळत नाही, ही या अर्थसंकल्पातील मोठीच उणीव म्हणावी लागेल. ग्रामीण भागातील तरुणांना शेती करावीशी वाटत नाही, म्हणून ते शहराकडे नोकरी करण्यासाठी धाव घेतात. त्यामुळे शहरी भागात लोकसंख्या अधिक घनदाट होत आहे तर ती ग्रामीण भागात मात्र विरळ होत आहे. त्यादृष्टीने तरुणांना ग्रामीण भागातच आकर्षक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, त्यांची शेती किफायतशीर होईल यादृष्टीने नवीन कार्यक्रम, नव्या योजना अर्थसंकल्पात दिसायला हव्या होत्या; पण त्यांचा अभाव या अर्थसंकल्पात जाणवतो. देशाचे तरुण ही देशाची संपत्ती असते. या संपत्तीचा योग्य वापर करणे, त्यापासून राष्ट्राला कसा लाभ होईल याचा विचार करणे गरजेचे होते. या तरुणांपासून राष्ट्राने लाभ करून घेतला पाहिजे असे अर्थमंत्री सांगतात. पण त्यादृष्टीने कोणताच कार्यक्रम युवकांसाठी देत नाहीत ही फार मोठी उणीव आहे. ग्रामीण तरुण कृषी शिक्षण घेतात, कृषी विषयाची पदवी संपादन करतात; पण त्यांच्या ज्ञानाचा उपयोग त्यांच्या शेतीसाठी होत नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल. हे कृषी पदवीधर संघटित क्षेत्रात नोकरी मिळावी यासाठी धडपडताना दिसतात. पण शेतीकडे परत जाण्याचा विचारही त्यांच्या मनात येत नाही. कृषी पदवीधरांनी ग्रामीण भागातच काम करावे यासाठी प्रोत्साहनपर योजनांचा विचार एकूण अर्थसंकल्पातच केलेला दिसत नाही. नोव्हेंबर २००७ मध्ये संसदेत शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय धोरणाचा मसुदा सादर करण्यात आला होता. त्यातील दोन उद्दिष्टांकडे लक्ष पुरविण्यात आलेले नाही ही अर्थसंकल्पातील फार मोठी उणीव म्हणावी लागेल. कृषी उत्पादन वाढवे यासाठी आवश्यक कृती करणे आणि युवा किसानांना शेती हाच व्यवसाय करण्यासाठी प्रेरित करणे ही लक्ष्ये राष्ट्रीय कृषी धोरणात निश्चित करण्यात आली आहेत. पण त्यांच्या पूर्ततेसाठी अर्थसंकल्पात कोणतीही उपाययोजना सुचविण्यात आलेली नाही, ही या अर्थसंकल्पातील मोठीच उणीव आहे. यंदाचे वर्ष हे जागतिक अन्न संकटाचे वर्ष म्हणून उदयास येत असताना, भाववाढीला लगाम घालणे अशक्य झाले असताना, कृषी क्षेत्राच्या प्रगतीला चालना देत कृषी समृद्धी साधण्याची संधी या अर्थसंकल्पाने गमावली आहे असे म्हणावेसे वाटते. आता शेतकऱ्यांसाठी आशेचा एकच किरण आहे आणि तो म्हणजे संसदेत सादर होणारे अन्नसुरक्षा विधेयक. त्या विधेयकामुळे अन्न मिळण्याचा कायदेशीर अधिकार नागरिकांना प्राप्त होणार आहे. माहितीचा अधिकार हा फायलींच्या मदतीने अमलात येऊ शकतो; पण अन्नाचा अधिकार मिळविण्यासाठी शेतकऱ्यांचीच मदत घ्यावी लागणार आहे. त्यासाठी शेतकरी सामर्थ्यशाली कसा होईल याचाच विचार व्हायला हवा होता, ती व्हिजन या अर्थसंकल्पात आढळत नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल.

(शेतकऱ्यांसाठी असलेल्या राष्ट्रीय आयोगाचे एम.एस. स्वामीनाथन हे अध्यक्ष आहेत.)

*दै. लोकमत दि. २ मार्च २०१० मधून साभार*

■■

# इस्लामी शून्य ब्याज व्यवस्था और बाजारवाद

**ऊपर ऊपर से देखने पर यह ईस्लामी सिद्धांत काफी पिछड़ा हुआ विचार लग सकता है. किंतु यदि हम इस सिद्धांत की गहराई तक पहुँचने का थोड़ा भी कष्ट करें तो हमें मालूम पड़ जाएगा कि भारत की कृषि अर्थव्यवस्था की दुर्दशा और ओद्योगिक क्षेत्र में पायी जाने वाली उद्यमशीलता के अभाव का ईलाज इसी ईस्लामी सिद्धांत में छिपा है. केवल पैसे से पैसा कमाना, और वह भी मानवीय श्रम या प्रतिभा के बिना किसी योगदान के, मानो ईस्लाम को मंजूर नहीं है.**



अ‍ॅड. दिनेश शर्मा

उधार दी गई रकम पर किसी भी प्रकार का ब्याज लेना ईस्लाम के मजहबी सिंद्धातों के अंतर्गत हराम माना जाता है. अर्थात ऐसी कोई भी कमाई, जो उधार दिये गये धन पर ब्याज के रूप में प्राप्त होती है, अपवित्र होने के कारण किसी भी धार्मिक कार्य को पूरा करने में उपयोग में नहीं लायी जा सकती है. ना तो आप उस कमाई से हज जा सकते है ना कोई मस्जिद बना सकते है. इस धर्म को मानने वाले यह मानते है कि जिसतरह से थोड़ा सा ही दही आपके एक घड़े भर दूध को बर्बाद कर देता है, उसी तरह से ऐसी हराम की कमाई आपकी पूण्य की कमाई में मिलाने से, वह कमाई भी हराम की हो जाती है. इस एक कारण से भारत का मुस्लिम समाज अपने पैसे बैंकों में रखने को तैयार नहीं है और भारतीय शेअर बाजार की उन कंपनियों में पैसा लगाने को तैयार नहीं है जो वित्तीय व्यवहार करती है. केवल ईस्लामी सिंद्धांतों से चलने वाली कंपनियों के सूचकांक पर आधारित एक फंड नेशनल स्टॉक एक्सचेंज द्वारा बनाया गया है, जिसका नाम है, शरीयाबी.

ऊपर ऊपर से देखने पर यह ईस्लामी सिद्धांत काफी पिछड़ा हुआ विचार लग सकता है. किंतु यदि हम इस सिद्धांत की गहराई तक पहुँचने का थोड़ा भी कष्ट करें तो हमें मालूम पड़ जाएगा कि भारत की कृषि अर्थव्यवस्था की दुर्दशा और ओद्योगिक क्षेत्र में पायी जाने वाली उद्यमशीलता के अभाव का ईलाज इसी ईस्लामी सिद्धांत में छिपा है. केवल पैसे से पैसा कमाना, और वह भी मानवीय श्रम या प्रतिभा के बिना किसी योगदान के, मानो ईस्लाम को मंजूर नहीं है.

भारतीय कृषि की दुर्दशा का एक सदियों पुराना कारण, आस्मानी और सुलतानी संकट के साथ साथ, मँहगा वित्त भी रहा है. जमाना साहूकारों का रहा हो या सहकार का, खेतों में फसल सिर्फ और सिर्फ कर्ज की ही उगी है. कई कारणों से हमारे देश में युवा उद्यमशीलता भी कभी पनप नहीं पायी. हमारे यहाँ के उद्यमियों की उम्र लगभग ५५ वर्ष के पार है. कोई भी जोशिला युवा अपने नये सपने लेकर बाजार में उतरा हो और उसके उत्पाद ने बाजार की दिशा ही बदल दी हो, ऐसा अपवाद रूप में भी हुआ दिखाई नहीं देता है. असफलता और अनुकरण मानो हमारा राष्ट्रीय गुणधर्म बन चुका है. सफलता हमारे यहाँ प्रेरणा कम ईर्ष्या ज्यादा पैदा करती है. राष्ट्र की समूची व्यवसायिक चेतना, वैसे भी, नेताओं की औसत अस्मिता और छोटे सपनों के बोझ से दमित होकर निस्तेज होती जा रही है.

अर्थशास्त्र में उत्पादन के पाँच घटक माने जाते है, जमीन, श्रम, वित्त, उद्योजक तथा तकनीकि. इन पाँचो घटकों का अपना अपना प्रतिफल बाजार की माँग और पूर्ति के संतुलन से तय होता आया है. इनमें से प्रत्येक घटक की अपनी अपनी ताकत और कमजोरियाँ हैं. समाजवादी कल्याणकारी राज्य व्यवस्था ने इन पाँचों घटकों की किमतों में इतने ज्यादा हस्तक्षेप किये है कि समाज में उद्योजकता समाप्त होने के कगार पर पहुँच गई है और किसान आत्महत्या जैसे प्रश्न खड़े हो चुके है.

### जमीन

ऊत्पादन का यह एक ऐसा घटक है कि यदि उद्योजक नहीं हो तो जमीन का स्वतंत्र कोई मूल्य नहीं होता है. भारत की करूतुरी ग्लोबल नामक कंपनी ने इसी साल गुलाब और बासमती चावल की खेती के लिये इथियोपिया में तीन लाख हेक्टर जमीन महज पाँच सौ रूपये प्रति हेक्टर प्रति वर्ष की दर से ४५ साल के लिये किराये पर ली है. किंतु हमारे यहाँ जमीन के हस्तांतरण और लेनदेन पर इतने कायदे कानून बना दिये गये है कि समाज में जमीन का व्यापार केवल नेता और माफिया ही कर सकते है. आम

आदमी के लिये एक इंच का तुकड़ा भी रखना मुश्किल है और नेता और माफिया लॉबी हजारों एकड़ जमीन इस या उस ट्रस्ट के नाम पर दबा के बैठे दिखाई देते है. अपनी जमीन का आरक्षण रद्द कराना और दूसरे की जमीन को आरक्षित करा देना, मंत्रालय में चलने वाला सबसे परंपरागत देशी उद्योग है. किसी भी उद्योग के लिये जमीन हासील कर लेना और उस पर शांति से नियत समय में एक उद्योग खड़ा कर लेना, नोबल पुरस्कार जीत लेने से ज्यादा महान करतब हो चुका है. जो जमीन किसी के काम की नहीं है और जिस पर किसी की कभी नजर भी गयी न हो, उस पर यदि किसी उद्योगपति की नजर पड़ गयी तो स्वयंघोषित समाज सेवक, पर्यावरणवादी, सत्ता और विपक्ष के नेता उस जमीन को इसतरह से देखने या भेंट देने आते है मानो उस जमीन के नीचे कोई गुप्त सोना दबा हो और वे ही उसके असली वारीसदार हो.

एकतरफ किसान खेती की दुर्दशा के कारण दर दर की ठोकरें खा रहे है तो दूसरी तरफ उद्योगपति विवाद मुक्त जमीनों के लिये तरस रहे हैं. हमारे यहाँ कानून है कि आदिवासी अपनी जमीन नहीं बेच सकते. यदि उन्हें जमीन बेचना भी हो तो वह किसी आदिवासी को ही बेचनी पड़ेगी. यह कानून आदिवासियों के आर्थिक हितों को जड़मूल से नष्ट कर देता है. बाजार के बाकी वर्ग जितनी किंमत दे सकते है उतनी किंमत कोई दूसरा आदिवासी दे नहीं सकेगा. अर्थात एक ही जैसी भूमि होने की अवस्था में एक गैर आदिवासी की तुलना में आदिवासी को मिलने वाली किंमत निर्णायक रूप से कम ही रहेगी. यह अप्रत्यक्ष तरीके से आदिवासीयों को गाँव का गुलाम बनाए रखने की साजिश है. डॉ. अंबेडकर ने अनुसूचित जाति के लोगों से कहा था कि जितना जल्दी हो सके गाँव छोड़कर शहरों की तरफ बढे.चलो. आज देश के दलित तुलनात्मक रूप से सुधर गये है क्योंकि वे शहरों में स्थानांतरित हुए. किंतु आदिवासीयों को हमारी सरकार ने गाँवों में अटका कर बरबाद कर दिया है. उनके भले के नाम पर बनाए गये अदूरदर्शितापूर्ण कानूनो नें उनकी कमर ही तोड़ दी है.

हमारे यहाँ के पर्यावरणवादी हम सभी को मानो बस्तर और मेलघाट में ले जाकर ही चैन से बैठेंगे क्योंकि उन्हें आदिवासियों की गरीबी से ज्यादा चिंता उनकी जमीनों पर बनी लवासा सिटी से है, जिसने भारत के इतिहास में पहली बार सदियों से गुलाम रहे आदिवासियों को मुक्ति का द्वार दिखा दिया है. सारी दुनिया में जहाँ पर्यावरण के हिसाब से सबसे अनुकूल स्थानों पर शहर बसा कर जनता का जीवनमान सुधारने की होड़ लगी है, हमारे पर्यावरण कानून और पर्यावरण वादी ये सारे स्थान गैरनिवासी उद्देश्य हेतु आरक्षित करवाकर, जनता को आबादी के बोझ से चरमरा रहे बदबूदार शहरों में रहने के लिये मजबूर कर रहे है. उनका नारा बिल्कुल स्पष्ट है. जंगल, पहाड़, सागर और नदियों के किनारे, जानवर और भूतप्रेत तो रह सकते है, पर आदमी के बच्चे को हम वहाँ किसी हालत में घुसने नहीं देंगे. यह तो भला हो भगीरथ का जो हजारों साल पहले गंगा को जमीन पर उतार ले आया, वरना मेधा पाटकर जैसो के जमाने में, गंगा का, पहाडों, मैदानों और खेतों को लांघकर सागर में मिलना सबसे बड़ा अपराध माना जाता. भारत के प्रत्येक न्यायालय से इसके विरूद्ध स्थगन आदेश निकलते और गाँव गाँव में पर्यावरण वादी धरने देते. बेचारा भगीरथ अपनी योजना बीच में ही छोड़ कर भाग जाता. ना तो गंगा आती, ना दुनिया की सबसे से ज्यादा आबादी यहाँ आकर बसती, न कला का जन्म होता ना धर्म पनपते.

भारत के लगभग सभी शहरों में लागु किराया नियंत्रण कानूनो ने हमारे शहरों को दुनिया के सबसे नारकीय शहरों में तब्दील करके रख दिया है. मौके की कितनी ही किमती जमीनें न्यायालयीन मुकदमों में अटकी हुई पड़ी है. इसलिये शहरों में जमीनों के भाव आसमान छू रहे है. किसी भी नये उद्यम या व्यापार के लिये शहरों में जगह हासील करना सबसे मुश्किल मामला बन चुका है.

**श्रम**

श्रम यह ऊत्पादन का सबसे नश्वर घटक है. अर्थात यदि आप अपने श्रम या बुद्धि का आज उपयोग नहीं करेंगे तो वह उसी क्षण नष्ट हो जाएगी. यह अभी नहीं तो कभी नहीं वाला मामला है. किंतु हमारे देश में श्रम के संबंध में बने तमाम कानूनों ने मानो श्रम को शाश्वत मूल्य वाला मान लिया है. हमने श्रमिकों को मालिक और उद्योजकों को उनका नौकर बना दिया है. आप कंपनी के चेअरमैन को तो हटा सकते है पर चौकीदार को नहीं. श्रमिकों और उद्योजकों ने मिलकर देश को समृद्ध करना तो दूर की बात, एक दूसरे को बरबाद कर देने का मानो अभियान ही शुरू कर दिया है. एक बार जो आदमी नौकरी पर लग जाता है वह या तो सेवानिवृत होकर अथवा नैसर्गिक रूप से दुनिया छोड़कर ही अपने नियोक्ता का पीछा छोड़ता है. कोई नया ज्ञान या प्रतिभा सीखने की उसकी ईच्छा नौकरी पर लगते ही समाप्त हो जाती है. नतीजतन श्रमिक और ज्यादा पारंगत होकर आधुनिक यंत्रों को चलाना सीखने को तैयार नहीं है. देश के कारखाने नयी टेक्नालॉजी का उपयोग करने में असमर्थ है क्योंकि श्रमिक संघ इसके खिलाफ है. नतीजा बेहद भयानक है. पुराने श्रमिक काम नहीं करके या उच्च स्तर की पारंगतता हासिल नहीं करके अपना नाश कर रहे है तो नये श्रमिकों को हम काम नहीं दे पाते और उनका श्रम भी नष्ट कर दे रहे है. परिणाम यह होता है कि उद्योजक पुराने कारखाने को उसकी अपनी नैसर्गिक मौत मरने के लिये छोड़ देते है और दूसरे स्थान पर नया कारखाना लगा लेते है. कई क्षेत्रों में तो उद्योगपतियों ने श्रम संघठनों के नेताओं के साथ साँठगाँठ करके अपने कारखानो की मँहगी जमीने बेचने के लिये अपने कारखाने में हड़ताल करवा कर उसे अपने आप बंद होने दिया है. ऐसे बंद हो चुके कारखाने उस शहर या गाँव की किस्मत को ही जंग लगा देते है. दशकों तक इन कारखानों की जमीन पर कोई नया विकास नहीं हो पाता है. भारत के कई शहर आज ऐसे मृत हो चुके कारखानों के बोझ से मरने के कगार पर है. आदमी मरते ही उसका मृत्यु प्रमाणपत्र लेकर चौबीस घंटे में अंतिम संस्कार करने की तो व्यवस्था है किंतु कोई कारखाना या उद्योग मर चुका है, इस बात का प्रमाणपत्र देनेवाली व्यवस्था का जन्म होना अभी शेष है. श्रमिक उद्योजक के लिये पैसे कमा रहा है या उद्योजक उसके लिये पैसा कमा रहा है, एक जाँच का विषय है.

दूसरी ओर गाँवों में लोगो को मुफ्त का अनाज देकर या रोजगार गॅरंटी योजना में पैसे के बदले सस्ता अनाज देकर सरकारों ने अपने वोट बैंक भले ही मजबूत कर लिये हो किंतु ग्रामीण अर्थव्यवस्था की नैतिक परंपरा को नेस्तनाबूद कर दिया है. आज सारा ग्रामीण भारत आलस्य से भरा है और काम करने की उसकी ईच्छा शक्ति नष्ट होती जा रही है. जिसतरह अंतिम पेशवा बाजीराव के जमाने में जनता का विद्रोह दबाने के लिये राज्य के सभी मंदिरों में लंगर चलाए गये, कुछ

ऐसा ही काम हमारी मौजूदा सरकार कर रही है. पेशवा को उस मूर्खता की सजा अपना राजपाठ विदेशियों के सामने १८१७ की संधी में त्यागकर भुगतनी पड़ी थी. अपनी ही जनता को अकर्मण्य बनाने वाली यह मौजूदा अनैतिक अवधारणा इस देश को कहाँ ले जाएगी, इस प्रश्न का उत्तर केवल भगवान ही जानता है.

### उद्योजक

उद्योजक उत्पादन का एक ऐसा घटक है जो बाकी सभी घटकों की किंमत बढ़ाता है. जिस देश में उद्योजक कुशल और दूरदृष्टि वाले हो वहाँ उत्पादन के प्रत्येक घटक को उसका पूरा दाम मिलता है. नये रोजगार जन्म लेते है, नयी जमीनों का विकास होता है, नयी तकनीकि को उपयोग में लाकर श्रमिक अपनी कुशलता बढाते है. समृद्धि का ढेर लगाकर ये उद्योजक वित्त भी सस्ता कर देते है. लायसेंस, कोटा, परमिट और इंस्पेक्टर राज में किसी महान उद्योगपति का हमारे देश में जन्म लेना तो संभव था नहीं और ना ही किसी सचिव स्तर के अफसर का उद्योग चलाना संभव था, नतीजा यह हुआ कि उस दौर में भारत की सारी प्रतिभा विदेशों की ओर पलायन कर गई. हमारे स्कूल कालेज राजनीति के अड्डे बन गये, जहाँ से लालू प्रसाद या पासवान टाईप के नेता जन्मे. आज भी उद्योग के विकास में सरकार सहायक कम, एक दलाली खाने वाले एजेंट से ज्यादा की भूमिका अदा नहीं करती. परिणामस्वरूप उद्योगपतियों की एक नयी नस्ल देश में जन्म ले चुकी है जो भूतपूर्व टेलीकॉम मंत्री ए राजा या झारखंड के मुख्यमंत्री मधु कोड़ा जैसे भष्ट्र नेताओं के सहयोग से अपना साम्राज्य खड़ा कर चुकी है. ये उद्योगपति सरकारे बदलने की ताकत रखते है और हर सरकार के विरूद्ध, फिर वह ग्राम पंचायत की हो या केंद्र की, पेश किये गये अविश्वास प्रस्ताव के समय सुरा, सुंदरी या संपत्ति का महापूर बहा देने की क्षमता रखते है. पुरस्कार के रूप में इन सरकारों के सारे बांधकाम के टेंडर मनमाने भाव पर इन माफिया या उद्योगपतियों को मिलते रहते है.

**उत्पादक को ज्यादा से ज्यादा फायदा चाहिये तो उपभोक्ता को कम से कम किंमत में माल चाहिये. इन दोनों की ईच्छा को तकनीकि पूरा करती है. वह उत्पादन की किमतें कम करती है, नये नये विकल्प बाजार में प्रस्तुत करके बाजार को लबालब भर देती है जिससे उपभोक्ता को उसके पैसे की पूरी संतुष्टि मिलती है. दुनिया के सभी विकसीत देश टेक्नालॉजी की इसी ताकत के बल पर आज हम पर राज कर रहे है. किंतु हमारे यहाँ का दृश्य बिल्कुल अलग है. देश मे यत्र तत्र सर्वत्र बिखरे समाजवादियों, स्वदेशी वालों और पर्यावरण वादियों के कारण किसी भी नयी टेक्नालॉजी का सबसे पहले हमारे यहाँ प्रयोग में आना लगभग असंभव मान ली गई बात है. नतीजा कुल इतना है कि एक सौ सोलह करोड़ की आबादी वाला यह देश आजादी के बाद आज तक ना तो कोई पेटेंट अपने नाम पर करवा सका है, ना ही नयी सोच का ऐसा कोई विख्यात व्यक्ति दुनिया को दे सका है, जो क्षेत्र और काल की सीमा पार करके विश्व वंदनीय बना हो. जो टेक्नालॉजी पश्चिम के विकसीत देश उपयोग में लाकर छोड़ देते है, हम उसे उठाने लगते है.**



राष्ट्रीय श्रम और पूँजी की तबाही का एक नंगा नाच हर प्रशासकीय कार्यालय में मानो भारत के राष्ट्रीय खेल की तरह चलता रहता है.

### तकनीकि

उत्पादन का यह घटक हमारे दौर में सबसे महत्पवूर्ण स्थान हासिल कर चुका है. उत्पादक को ज्यादा से ज्यादा फायदा चाहिये तो उपभोक्ता को कम से कम किंमत में माल चाहिये. इन दोनों की ईच्छा को तकनीकि पूरा करती है. वह उत्पादन की किमतें कम करती है, नये नये विकल्प बाजार में प्रस्तुत करके बाजार को लबालब भर देती है जिससे उपभोक्ता को उसके पैसे की पूरी संतुष्टि मिलती है. दुनिया के सभी विकसीत देश टेक्नालॉजी की इसी ताकत के बल पर आज हम पर राज कर रहे है. किंतु हमारे यहाँ का दृश्य बिल्कुल अलग है. देश मे यत्र तत्र सर्वत्र बिखरे समाजवादियों, स्वदेशी वालों और पर्यावरण वादियों के कारण किसी भी नयी टेक्नालॉजी का सबसे पहले हमारे यहाँ प्रयोग में आना लगभग असंभव मान ली गई बात है. नतीजा कुल इतना है कि एक सौ सोलह करोड़ की आबादी वाला यह देश आजादी के बाद आज तक ना तो कोई पेटेंट अपने नाम पर करवा सका है, ना ही नयी सोच का ऐसा कोई विख्यात व्यक्ति दुनिया को दे सका है, जो क्षेत्र और काल की सीमा पार करके विश्व वंदनीय बना हो. जो टेक्नालॉजी पश्चिम के विकसीत देश उपयोग में लाकर छोड़ देते है, हम उसे उठाने लगते है.

ये ही पर्यावरणवादियों के गिरोह कृषीक्षेत्र में नयी तकनीकि के आगमन पर बवाल मचाते है. बीटी कॉटन के समय देश में नये नये झूठों से आसमान सर पर उठा लेने वाले ये पर्यावरणवादी आज बीटी टेक्नालॉजी की भारतीय भूमि पर हो चुकी महानतन जीत के बाद भी कोई सबक सीखने को तैयार नहीं है. अब ये लोग जापान के भूकंप से उपजे सवालों से देश के लोगों को डराते रहेंगे. इन लोगों के पास किसी समस्या का कोई विकल्प नहीं है. ये लोग बस एक ही व्यापार करते है, भय और चिंताओं का. क्या कोई इनसे पूछेगा कि जब विज्ञान का कहीं नामोनिशान भी नहीं था, पर्यावरण बेहद साफसुथरा और मानवीय हस्तक्षेप से परे था, आदमी पेड़ों, पहाड़ों, ग्रहों नक्षत्रों की पूजा

करता था, तब भूकंप क्यों आते थे और आबादी का बड़ा हिस्सा हर साल महामारीयों का शिकार होकर समाप्त क्यों हो जाता था? भूखमरी हमारी नियति क्यों थी? लोग पानी की तलाश में गाँव कस्बे तो क्या, अपने देश और महाद्वीप छोड़कर क्यों निकल पड़े थे?

**वित्त**

रहा सवाल उत्पादन के सबसे महत्वपूर्ण घटक पूंजी का! तो इसका प्रतिफल होता है ब्याज. उत्पादन के सभी घटकों में यही एक ऐसा घटक है जो ना तो कभी सोता है न ही कभी बीमार या कमजोर पड़ता है. जैसे ही आपने रकम उधार ली, इसका वसुली मिटर दिन दूनी रात चौगुनी रफ्तार से शुरू हो जाता है. आपका व्यापार चले न चले, आपके सपनों के दुश्मन आपको काम करने दे या न दें, या आपके व्यापार के साथ धोखा हो जाए, पूंजी देनेवालों को इस बात से कोई मतलब नहीं है. वे तो आपकी छाती पर बैठकर, आपकी इज्जत की बारात निकालकर या आपके घर पर गुंडे बदमाश या हिजड़ें भेजकर अपना ब्याज माँगेंगे ही! फिर वे पुराने जमाने के साहूकार हो या आज की आधुनिक समझी जाने वाली बैंकिंग व्यवस्था के पहरेदार हो. आदिम काल से यही एक ऐसा व्यापार रहा है जिसमें कभी घाटा हुआ ही नहीं है.

किंतु ऐसे वातावरण में, जबकि उत्पादन के रास्ते में इतनी कानूनी और गैरकानूनी रूकावटें मौजूद हो, क्या पूंजी पर ब्याज माँगना जायज है? क्या यह शासन का उत्तरदायित्व नहीं है कि जब तक उत्पादन शुरू नहीं होता है या किसी भी बाहरी या अनपेक्षित कारण से स्थगित हो जाता है, तब तक ब्याज का मीटर बंद कर दिया जाए? या तो शासन ने उत्पादन के रास्ते में आने वाली रूकावटें हटाने की नैतिक जिम्मेदारी स्वीकारनी चाहिये या फिर ब्याज माँगने वालों को उत्पादन के स्थगन काल का ब्याज माँगने से रोकने वाले कानून बनाने चाहिये. शासन यदि हमारी आय में हिस्सेदारी माँगने के लिये हम पर कर थोप देता है तो यह भी उसी का फर्ज बनता है कि वह नैतिक मार्गो से होनेवाली आय के रास्तों की रूकावटें भी दूर करें. शासन ने ऐसे कानून बनाने चाहिये कि इस ब्याज की रकम उन लोगों से वसूली जा सके, जो अपनी मानसिक कमजोरियों या वैचारिक रूग्णता की सजा उत्पादक वर्ग को देकर उनके उत्पादन को रोक देते है. यह इस देश का सबसे बढ़ा दुर्भाग्य है कि यहाँ पर जो जितना ज्यादा प्रदूषित या पिछड़ा हुआ है वह उतना महान नायक माना जाता है. कोई उनसे यह नहीं पूछता कि उसने कितने लोगों को काम दिया है और कितने घरों के चूल्हे जलाये है.

ऐसे मुहाने पर ब्याज से संबधित ईस्लामी कानून की नैतिक अवधारणा इस देश को काफी कुछ दे सकती है. चूँकि ब्याज की अवधारणा ही निष्ठुर और अमानवीय है, इसकी मुक्त किंतु पाशविक शक्ति पर तब तक के लिये प्रतिबंध लगाए जाने चाहिये जब तक उत्पादन के बाकी घटकों को उनकी नैसर्गिक आजादी बहाल नहीं हो जाती हैं.

ब्याज के स्थान पर हमने मुनाफेमें हिस्सेदारी वाली योजनाओं को बढ़ावा देना चाहिये. उदाहरण के लिये मान लिजीए, साहूकार या बैंक किसी किसान को या नये उद्योगपति को पैसा दे रहे हैं तो इस कर्ज के मूलधन की वापसी की कालावधी निश्चित कर लिजीए. फिर चढ़ते क्रम से लाभ में हिस्सेदारी लेकर अंत में वह व्यापार संपूर्ण रूप से ऋणमुक्त कर दिजीए. अर्थात, यदि आपने दस साल के लिये पूंजी दी है तो पहले साल नगण्य या शून्य भागेदारी, दूसरे साल थोड़ी ज्यादा, और इस तरह थोड़ा थोड़ा बढाते हुए अपना पैसा ब्याज सहित पूरा निकाल लिजीए. चूँकि यह भागेदारी लाभ की भागेदारी है, उद्योजक भी जोश से काम करेगा और संपत्ति का सृजन भी बड़े पैमाने पर होगा. उत्पादन की प्रक्रिया में पूंजी देनेवाला भी शामिल होगा.

देश के लाखो बेरोजगारों को सही प्रशिक्षण देकर इस मार्ग से राष्ट्रनिर्माण के काम में लगाया जा सकता है. आज देहातों में जो चैतन्यहीनता की स्थिति है, उसे हम एक शक्तिशाली उर्जा में बदल सकते है. तब पूंजी हमारी सहयोगी होगी, रोज घर के सामने धरना देने वाला साहूकार नहीं. तब हम पूंजी पर शासन करेंगे न कि उससे शासित होंगे. इसका सबसे बड़ा फायदा तो यह होगा कि घाटे वाले उद्योग या इरादों का वित्त नहीं मिलेगा. जिससे समाज की कुल बचत अधिक होगी. लोग कर्ज के जाल में फँस कर आत्महत्या नहीं करेंगे. तब वसुंधरा पर पहली बार भौतिकता का नहीं बल्कि मनुष्य क बेमिसाल प्रतिभा का शासन होगा.

ईस्लाम की यह अवधारणा एक नये मुक्त, मानवीय और गरिमापूर्ण समाज का वादा करती है. यह समाज में साझेदारी को बढ़ावा देती है. यह प्रतिभा को पुरस्कृत करती है. यह हमें पशु से उपर उठाकर मनुष्य मात्र के जैसा जीवन जीने की आजादी देती है. यह हमारी स्वतंत्रता का घोषणापत्र है. संविधान के सबसे बड़े लगनेवाले वादे भी इस आश्वासन के सामने काफी तुच्छ लगते है.

**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com

■■

# कृषीविद्यापीठांना अनुदान कशाला हवे?

कृषी विद्यापीठांकडे हजारो एकर जमीन आहे. सिंचनाची व्यवस्था आहे, त्यांनीच गेल्या पन्नास वर्षात केलेल्या संशोधनाची शिदोरी आहे. मग कृषी विद्यापीठांना अनुदानाची गरज का पडावी? आता एकदा सर्व विद्यापीठांचे अनुदान बंद करून यांना सांगण्याची गरज आहे की, बाबा रे, निव्वळ सल्ले देणे खूप झाले, या विद्यापीठाच्या हजारो एकरावर तुमच्याच संशोधनाच्या आधारे आता शेती करून किमान पाच वर्ष तरी जगून दाखवा, प्रपंच चालवून दाखवा आणि शेती करून होणाऱ्या मिळकतीवर विद्यापीठाचे सर्व कारभार अनुदान न घेता चालवून दाखवा.



गंगाधर मुटे

जेव्हा जेव्हा शेतीच्या दुर्दशेचा विषय निघतो, तेव्हा तेव्हा ज्या अनेक उपाययोजना सुचविल्या जातात, त्या अनेक उपाय योजनांपैकी कृषी विद्यापीठे आणि त्यांचे संशोधन हा एक हमखास उपाय सुचविला जातो. या सर्व तज्ज्ञांच्या मते कृषी विद्यापीठाने आजवर फार मोठे चमत्कारिक संशोधन केलेले आहे; पण ते संशोधन शेतकरीवर्गापर्यंत पोचत नाही किंवा पोचले तरी शेतकरी आळशी अज्ञानी वगैरे असल्याने तो ते अंगिकारत नाही म्हणून त्याला शेती परवडत नाही. त्यांच्या मते कृषी विद्यापीठांनी केलेले संशोधन जर शेतीमध्ये वापरले गेले तर या समग्र भारत देशातल्या शेतीत क्रांतिकारी बदल घडून येतील आणि शेती व्यवसायाची प्रचंड भरभराट होईल.

कृषी विद्यापीठातील संशोधक, विषयतज्ज्ञ आणि स्वतः कुलगुरू यांच्याही बोलण्याचा रोख कायमच उपदेशात्मक असतो. जणू काही शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी परमेश्वराने यांना प्रेषित म्हणूनच भूतलावर जन्माला घातले आहे.

दरवर्षी या विद्यापीठांना पोसण्यासाठी शासकीय तिजोरीतून प्रचंड खर्च केला जातो. त्याबदल्यात संशोधन काय केले जाते, याचाही आढावा घेणे गरजेचे आहे, अशी मात्र कोणालाच गरज भासत नाही. ऊस, केळी, ज्वारी, गहू, बाजरी, तूर, सोयाबीन वगैरे मुख्य पिकांसंदर्भात क्रांतिकारी संशोधन करण्यास किंवा त्या त्या पिकाच्या क्रांतिकारी जाती, प्रजाती अथवा संकरित वाणाचे संशोधन करण्यात अजूनही या कृषी विद्यापीठातील संशोधकांना फारसे यश आलेच नाही, याकडेही सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते.

पाऊस गरजेपेक्षा जास्त किंवा कमी पडला तरी तग धरेल, बदलत्या हवामानाचा प्रतिकार करून चांगले उत्पन्न देऊ शकेल, अशा तऱ्हेचे वाण अजूनही संशोधित करण्यात यश आलेले नाही. दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीस पाऊसपाण्याविषयी अनुमान वर्तविण्यात येत असते; पण यांच्या अनुमानात आणि एकंदरीत पाऊस पडण्यात कुठेही ताळमेळ दिसत नाही. याउलट यांनी सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल असे भाकीत वर्तविले की हमखास त्या वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडून कोरडा दुष्काळ पडतो आणि यांनी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असे भाकीत केले की त्यावर्षी अती पाऊस पडून हजारो एकर जमीन पाण्याखाली बुडून ओला दुष्काळ जाहीर करावा लागतो.

सलग दोन-तीन वर्षे पाऊस कमी पडला की, शेतकऱ्यांनी प्रचंड वृक्षतोड केली म्हणून निसर्गाचा समतोल बिघडला असा घासूनपुसून गुळगुळीत झालेला एकमेव निष्कर्ष काढून ही मंडळी मोकळी होतात. त्यापुढे काही यांच्या संशोधनाची मजल जात नाही. मग शासनाच्या कृषी विभागाच्या मदतीने व सरकारी पैशाने वृक्ष लावा, निसर्ग वाचवा पाणी अडवा, पाणी जिरवा यासारख्या प्रचारकी थाटाच्या मोहिमा हाती घेतल्या जातात. अशा मोहिमांवर प्रचंड आर्थिक खर्च केला जातो, पण ही मंडळी (साहेब असल्यामुळे) स्वतः झाडे लावत नाहीत, आणि जनतेचा यांच्या शब्दावर विश्वास नसल्याने जनताही झाडे लावण्याच्या फंदात पडत नाहीत. निदान या मंडळींनी स्वतः काही झाडे लावली असती तर काही उपयोग तरी झाला असता, काही झाडे तरी लावल्या गेल्याचे समाधान मिळाले असते; पण साहेबांनी झाडे थोडी लावायची असतात? साहेबांनी शारीरिक श्रमाची कामे करायचीच नसतात, शारीरिक श्रमाची कामे करण्यासाठी देवाने शेतकरी नावाचा प्राणी जन्माला घातला आहे, त्यानेच खड्डे खोदायचे, झाडे लावायची, असा या मंडळींचा पक्का समज असतो. त्यामुळे ही मंडळी सल्ले द्यायची कामे तेवढी करीत राहतात आणि शेतकरी यांच्याकडे कुतूहलाने बघत असतात आणि यदाकदाचित काही झाडे लावली गेलीच तरी त्या झाडांचे आयुष्य फार तर महिना-दोन महिन्याचेच असते. कारण नंतर त्या झाडांचे संगोपनाचे पालकत्व कुणाकडेच नसते.

एवढी सगळी मोहीम राबवूनही नवीन झाडे काही लागले जात नाहीत. झाडे-झुडपे-जंगल आहे तोच असतो. तेवढ्यातच

नवा पावसाळा सुरू होतो आणि पाऊस धुवांधार कोसळायला लागतो. पाऊस एवढा कोसळतो की, पाऊस पडण्याचे सर्व उच्चांक मोडीत निघतात. प्रचंड वृक्षतोडीमुळे पावसाचा तोल बिघडला या अतीअभ्यासांती काढलेल्या सिद्धांताचे बारा वाजतात.

शेतीच्या औजाराच्या संशोधनाबद्दलही तेच. विद्यापीठांनी शेतीसाठी बहुउपयोगी औजार बनविले आणि ते शेतीसाठी फारच उपयोगी ठरत आहे, असेही फारसे कधी घडत नाही. शेतीसाठी लागणाऱ्या औजारामध्ये दोर-दोरखंड, कुळव-तिफण, कुऱ्हाड-पावडे वगैरे साहित्याचे डिझाइन गावातले कारागीर, ज्यांना अधिकृतपणे अकुशल मानले जातात तेच कारागीर करतात. लोखंडी नांगर, फवारणी यंत्र, मोटारपंप यापासून ते ट्रॅक्टरपर्यंतचे सर्व डिझाइन खाजगी कंपन्या करीत असतात, या क्षेत्रातही कृषी विद्यापीठातील संशोधकांचे योगदान नगण्यच आहे.

संपूर्ण देशातील कृषी विद्यापीठांनी थोडीफार कामगिरी केली असे एकमेव क्षेत्र आहे बियाणे संशोधन. कृषी संशोधकांनी संकरित बियाणात संशोधन करून नवे वाण निर्माण केले; पण अधिक उत्पन्न देणारे संकरित वाण केवळ कापूस, ज्वारी आणि टमाटर या पिकांपुरतेच मर्यादित राहिले. गहू, तूर, हरभरा, सोयाबीन, उडीद, मूग, भात, भुईमूग या पिकामध्ये अजूनपर्यंत तरी भरघोस उत्पन्न देणारे संकरित वाण निर्माण झाले नाही. निवड पद्धतीने सुधारित जाती तयार होण्यापलीकडे अजून तरी बियाणे संशोधकांची झेप गेलेली नाही; पण बियाणे संशोधन विभागातही कृषीविद्यापीठांची मोलाची भूमिका आहे, असे म्हणण्यासारखी स्थिती नाही.

१९७० च्या सुमारास गुजरात विद्यापीठाने कपाशीमध्ये एच-४ नावाचे संकरित वाण तयार केले, त्यानंतर त्यांना दुसरे दर्जेदार संकरित वाण निर्माण करण्यास फारसे यश आले नाही. नाही म्हणायला एच-६, एच-८ संकरित वाण त्यांनी आणले पण ते वाण बदलत्या हवामानात फ़ारकाळ टिकू शकले नाही. त्याचप्रमाणे १९८० च्या सुमारास मराठवाडा कृषीविद्यापीठाने एनएचएच-४४ व पंजाबराव देशमुख कृषीविद्यापीठाने एएचएच-४६८ या दोन कापसाच्या संकरित जाती निर्माण करण्याखेरीज संकरित बियाणे संशोधनात फार काही मौलिक संशोधन केलेले नाही, हे उघड आहे.

पण हे सर्व संशोधन पंधरा-वीस वर्षापूर्वीचे आहे आणि हे सर्व संकरित वाण आता शेतीतून हद्दपार झालेले आहे.

या उलट गेल्या वीस वर्षात खाजगी कंपन्यांनी मात्र बियाणे क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. जवळजवळ सर्वच पिकांमध्ये स्वतः संशोधन करून स्वसंशोधित बियाणे बाजारात आणले आहे आणि त्यालाच शेतकऱ्यांची पसंती मिळाली आहे.

२०१०-११ हा खरीप हंगाम शेतीसाठी प्रतिकूल असूनही केवळ बीटीयुक्त बियाणे शेतीमध्ये पेरले म्हणून कापसाचे बऱ्यापैकी उत्पादन आले आहे आणि कापसाची निर्यात सुरू आहे म्हणून कापसाला विक्रमी भाव मिळत आहे. कापूस उत्पादकांच्या आयुष्यात कदाचित चांगले दिवस येण्याची शक्यता निर्माण होत असेल तर ती बीटी बियाणे संशोधित करणाऱ्या मोन्सॅटो कंपनीची किमया आहे. कापसाला चांगले भाव मिळत असेल तर ती मुक्तअर्थव्यवस्थेची किमया आहे. मग कापूस उत्पादकांच्या आयुष्यात कदाचित चांगले दिवस येण्याची शक्यता निर्माण होत असेल तर यात शासन किंवा कृषीविद्यापीठांचे काय योगदान आहे?

पण हे सत्य कोणी मानायलाच तयार नाही. कृषीविद्यापीठांनी गेल्या पन्नास वर्षात केलेल्या संशोधनाच्या समर्थनार्थ ते गाडाभर कागदपत्रांचा दस्तऐवज सादर करायला नेहमीच उतावीळ असतात. पण कागदोपत्री संशोधनाच्या आधारे पीएच.डी, डी.लिट वगैरे मिळू शकते, पण शेती पिकवायसाठी बियाणे-खते-कीटकनाशके लागतात, कागदपत्री दस्तऐवज हे काही पिकांचे खाद्य नाही. शिवाय या दस्तऐवजांचे सेंद्रिय खतात रूपांतर केले आणि पिकाला खाऊ घातले तर जास्तीत जास्त क्विंटल-दोन क्विंटल अन्नधान्य पिकू शकेल, पिकाच्या भाषेत या दस्तऐवजाला यापेक्षा जास्त काही अर्थ उरत नाही. मुलांची भाषा ज्याला चांगली कळते तोच चांगला पालक. ज्याला विद्यार्थ्यांची भाषा कळत नाही तो शिक्षक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणू शकत नाही, अगदी तसेच, ज्याला पिकांची भाषा कळत नाही तो शेतीमध्ये चांगले संशोधन करूच शकत नाही.

पण दुर्दैवाने विद्यापीठीय शेतीसंशोधक आणि प्रत्यक्ष शेती यांचा अर्थाअर्थी काहीही संबंधच राहिलेला नाही. शेतीचे अर्थशास्त्र यांना कळत नाही कारण शेती किंवा शेतीसंशोधन याऐवजी शासकीय अनुदानावर यांचे प्रपंच चालतात आणि निसर्गाचा लहरीपणा, हवामान, पाऊसपाणी किंवा ओला-कोरडा दुष्काळ यांचेशी शासकीय अनुदानाचा काहीही संबंध नसतो. अनुदान हे हमखास पीक असते.

कृषी विद्यापीठांकडे हजारो एकर जमीन आहे. सिंचनाची व्यवस्था आहे, त्यांनीच गेल्या पन्नास वर्षात केलेल्या संशोधनाची शिदोरी आहे. मग कृषी विद्यापीठांना अनुदानाची गरज का पडावी? आता एकदा सर्व विद्यापीठांचे अनुदान बंद करून यांना सांगण्याची गरज आहे की, बाबा रे, निव्वळ सल्ले देणे खूप झाले, या विद्यापीठाच्या हजारो एकरावर तुमच्याच संशोधनाच्या आधारे आता शेती करून किमान पाच वर्ष तरी जगून दाखवा, प्रपंच चालवून दाखवा आणि शेती करून होणाऱ्या मिळकतीवर विद्यापीठाचे सर्व कारभार अनुदान न घेता चालवून दाखवा.

'आधी केले मग सांगितले' यासारखा दुसरा चांगला मार्ग नाही.

पण ज्या विद्यापीठांना शेतीतील गरिबीचे कारण शेतीत उत्पादित केलेल्या मालास उत्पादन खर्च भरून निघेल एवढाही भाव मिळत नाही, यात दडलेले आहे हेच अजूनपर्यंत कळलेले नाही त्यांच्याकडून फारशा अपेक्षा करणे हेच मूर्खपणाचे आहे.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
मो. ९७३०५८२००४

■■

# मायक्रो फायनान्स- शेतकरी आत्महत्यांसाठी नवा गळफास

**लघुवित्त पुरवठा उद्योजकता वाढविण्याचे साधन बनण्याऐवजी नफेखोरीचे हत्यार बनले आहे. अशा वित्त पुरवठ्याचे जनक मोहम्मद युनूस यांची बांगला देश ग्रामीण बँकेच्या अध्यक्षपदावरून हकालपट्टी करताना तिथल्या पंतप्रधानांनी ग्रामीण बँक ३०% व्याज दर आकारीत असल्याचा केलेला आरोप चुकीचा असेल असे आपल्याकडील परिस्थितीवरून तरी वाटत नाही. यातील आणखी गंभीर बाब म्हणजे नफेखोरीसाठी ग्रामीण महिलांचे बचत गट वेठबिगार म्हणून राबत आहेत. काही ठिकाणी तर बचत गटाच्या महिलांनी कर्जवसुलीसाठी आणलेल्या दबावातून आत्महत्येचे प्रकार घडले आहेत. बचत गटाने महिलांना घराबाहेर पडण्याची संधी दिली. एवढेच नाही तर त्यांना आर्थिक साक्षरही बनविले. पण बँकांचे व्यवहार समजणे म्हणजेच आर्थिक साक्षरता नाही. या आर्थिक व्यवहारात होणारे शोषण व त्याचे परिणाम समजले तरच त्या साक्षरतेला अर्थ आहे.**



**सुधाकर जाधव**

मायक्रोफायनांस म्हणजे लघु वित्त पुरवठा. हा विषय आज अनेक कारणाने चर्चेचा व चिंतेचा बनला आहे. हा प्रकार चर्चेचा बनण्याचे कारण अशा प्रकारच्या वित्त पुरवठा सुरू करण्यात पुढाकार घेतलेल्या नोबेल पारितोषक विजेते मोहंमद युनूस यांची ते संस्थापक असलेल्या बांगलादेश ग्रामीण बँकेच्या अध्यक्षपदावरून तिथल्या सरकारने केलेली हकालपट्टी हे तर आहेच पण त्यापेक्षाही मोठे व महत्त्वाचे कारण म्हणजे अशी छोटी कर्जेही परत करता न आल्याने झालेल्या आत्महत्या आहेत. गरिबी निर्मूलनासाठी गरिबांना विनातारण छोटी कर्जे देण्याचा उपक्रम सर्व प्रथम बांगलादेश मध्ये मोहम्मद युनूस यांच्या कल्पनेतून आणि पुढाकाराने १९७६ साली सुरू झाला. स्वतःच्या खिशातून २७ डॉलर एवढी रक्कम ४२ ग्रामीण महिलांना कर्ज रूपाने वाटून त्यांनी या प्रयोगाला प्रारंभ केला होता. अवघ्या ७ वर्षांत या प्रयोगाने मोठी झेप घेऊन ग्रामीण बँकेची स्थापना झाली. बांगला देश सरकारने विशेष कायदा करून या बँकेचा मार्ग प्रशस्त केला. तेव्हापासून या प्रयोगाकडे सारे जग आकर्षित झाले व अविकसित देशात याच धर्तीवर छोटी-छोटी कर्जे वाटण्याला प्रारंभ झाला. भारतातही अशी कर्जे घेणारी महिला बचत गटांची लाटच आली. महिला बचत गटाच्या रूपाने कर्जाच्या परत फेडीची हमीच मिळाल्याने सर्वच बँकांनी महिला बचत गटाबाबत उदार धोरण अवलंबिले. गरिबी निर्मूलनासाठी अशी छोटी कर्जे देण्यात येत असल्याचा प्रचार झाल्याने सर्व प्रकारच्या स्वयंसेवी संस्थांना या प्रयोगात रस निर्माण होणे स्वाभाविक होते. सर्व स्वयंसेवी संस्था गरिबी निर्मूलनाच्या या नव्या प्रयोगात सामील झाल्या. किंबहुना हेच त्यांचे जीवित कार्य आणि जिवंत राहण्याचे साधन बनले! गरिबी निर्मूलनाच्या गोंडस नावाखाली खाजगी व्यक्ती, संस्था यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर पैसा स्वयंसेवी संस्थांनी उभा केला. एवढेच नव्हे तर असा लघु वित्त पुरवठा करणाऱ्या स्वतंत्र वित्त संस्था उभ्या राहिल्या. दरम्यान ही चळवळ सुरू करणारे मोहम्मद युनूस यांना यासाठी नोबेल पारितोषक मिळाल्याने गरिबांना छोटी कर्जे देण्याच्या कार्याला प्रतिष्ठा व मुबलक पैसा लाभला. यातून गरीबी निर्मूलन हे उद्दिष्ट बाजूला पडून कर्जे देणे व कर्जे वसूल करणे असे स्वरूप या उपक्रमाला आले. तसेही छोट्या कर्जातून गरिबी निर्मूलन हे स्वप्नरंजनच होते. अशा कर्जाची आवश्यकता आणि उपयोगिता या बद्दल दुमत असू शकत नाही. अशा कर्जाच्या आवश्यकतेतुन सावकारशाही निर्माण झाली हे विसरून चालणार नाही. सावकाराच्या कचाट्यातून सुटण्यासाठी धडपडणाऱ्या ग्रामीण क्षेत्राला बुडत्याला काडीचा आधार म्हणतात त्या प्रमाणे हा लघु वित्त पुरवठा आकर्षक वाटला खरा पण प्रत्यक्षात त्यांची अवस्था आगीतून फुफाट्यात पडल्यासारखी झाली. आज लघु वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थाच सावकाराच्या रूपात नवा गळफास घेऊन उभ्या असल्याचे चित्र उभे राहिले आहे.

मुळातच गरिबी निर्मूलनाचे नाव घेऊन हा वित्त पुरवठा सुरू झाल्याने यासाठी काही नियम कायदे असावेत अशी आवश्यकताच सरकार किंवा रिजर्व बँकेसारख्या नियामक संस्थांना वाटली नाही. उठसुट सरकारी हस्तक्षेपाची मागणी करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच यात गुंतलेल्या असल्याने त्यांच्याकडून तशी होणे शक्यच नव्हते. परिणामी लघु वित्त पुरवठा करणारे हे क्षेत्र सर्वार्थाने नियंत्रण मुक्त होते. व्याजदराबाबत कोणातही धरबंद नव्हता. स्वतःचे नियम वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांनी लागू केले. २८ ते ३२ टक्के दराने पहिला हप्ता कर्ज देतानाच कापून आणि दर आठवड्याला व्याज वसुली असे सावकारालाही लाजवेल असे प्रकार या वित्त संस्थांनी सुरू केले. वसुलीची पठाणी पद्धत ही त्यांनी सुरू केली. परिणाम व्हायचा तोच झाला. गरिबी निर्मूलनाच्या गोंडस नावाने सुरू झालेल्या या प्रकराने गरीब माणसाला दारिद्र्याच्या खाईत लोटले आणि कर्जाच्या सापळ्यात अडकविले. यातून

बाहेर पडण्याचा आत्महत्या हा एकच मार्ग गरिबासमोर शिल्लक ठेवला. अर्थात हा गरीब शेतीशी निगडितच आहे. शेतीतच गरिबीचे बम्पर पीक येते हे सत्य सर्वमान्य झाले आहे. बँकांच्या कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा प्रकार नवा राहिला नाही. पण शेतकरी महिलेच्या कर्जापायी आत्महत्यांचा नवा अध्याय सुरू करण्याचे खरे श्रेय कथित मायक्रोफायनांस संस्थानाच द्यावे लागेल.

सरकारी बँकांनी अल्प व्याज दराने तर स्वयंसेवी संस्थांनी ना नफा ना तोटा या तत्त्वावर सुरू केलेला वित्त पुरवठा मायक्रोफायनांस संस्था व कंपन्यांच्या हाती कसा गेला यात तसे गूढ काहीच नाही. व्याज आकारण्यावर निर्बंध नसल्याने व नियामक संस्थांची देखरेख नसल्याने या क्षेत्रातील अमाप नफा स्वयंसेवी संस्थांच्या लक्षात आला आणि अशाच काही संस्थांनी स्वत:चे रूपांतर वित्त संस्थामध्ये केले !

या क्षेत्रातील नफ्याकडे अनेकांचे लक्ष गेले यात आयटी क्षेत्रांतून गडगंज पैसा कमावलेल्या व्यक्ती व संस्थांचा प्रामुख्याने समावेश आहे. शिवाय लघु वित्त पुरवठा करणाऱ्या कंपन्यांना खाजगी क्षेत्रातील बँकांनीसुद्धा पैसा पुरवून नफेखोरी केली आहे. ग्रामीण क्षेत्रात असा वित्त पुरवठा करण्याचे बंधन या बँकांवर आहे. यासाठी रिझर्व बँक या बँकांना अल्प दराने पैसा पुरविते. हाच पैसा या बँका अधिक व्याज दराने या वित्त कंपन्यांना देऊन काहीही न करता नफा कमावित आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांनी लघु वित्त पुरवठा करणाऱ्या कंपन्यांत पैसा ओतल्याने कोणतेही निकष न लावता कर्ज पुरवठा होऊ लागला आणि लोक कर्जाच्या सापळ्यात अडकू लागलेत. शिवाय वसूली बाबतही विधिनिषेध उरला नाही. परिणामी कर्जदारच्या आत्महत्या होत आहेत. अशा आत्महत्या घडू लागल्यावर सरकार, नियामक संस्था व विचारवंत आणि समाज सुधारक जागे होत आहेत. या वित्त संस्थांच्या बेबंदशाहीला लगाम घालण्याची भाषा बोलू लागले आहेत. पण सरकार व रिझर्व बँक यांची कृती बेबंदशाहीऐवजी वित्त संस्थांवर घाव घालणारी असल्याने ग्रामीण क्षेत्रातील वित्त पुरवठा खंडित होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. म्हणूनच नफेखोरीचा धोका लक्षात घेऊनही या क्षेत्रातील ताज्या घडामोडींचे सावध स्वागत केले पाहिजे. ती घटना म्हणजे भांडवल बाजारातून ग्रामीण क्षेत्रासाठी पैसा उभा करण्याचा होत असलेला यशस्वी प्रयत्न. आजवरच्या नॉन बँकिंग मायक्रोफायनांसच्या वाईट अनुभवाच्या पार्श्वभूमीवर हा प्रयोग महत्त्वाचा ठरतो.

भारतात लघु वित्त पुरवठा करण्यात आघाडीवर असलेल्या 'स्वयं कृषी संगम' या स्वयंसेवी संस्थेने या क्षेत्रातील संधी लक्षात घेऊन स्वत:चे रूपांतर वित्त कंपनीत करून भांडवल बाजारातून मोठ्या प्रमाणावर पैसा उभा केला आहे. संस्थेच्या या उपक्रमावर मोहमद युनूससह अनेकांनी टीका केली आहे. यातून सामाजिक बांधिकलकीऐवजी नफेखोरी वाढेल असा त्यांचा आरोप आहे. पण कथित ना नफा ना तोटा या तत्त्वावर काम करणाऱ्या संस्था जर ३० % च्या आसपास व्याज आकारात असतील तर मग याला नफेखोरी नाही तर काय म्हणायचे? गरिबांना वित्त पुरवठा करण्यासाठी बँका किंवा अन्य संस्था यांच्याकडून किमान १० ते १२ % व्याजाने पैसा घ्यावा लागतो व हा पैसा गरजू पर्यंत पोचविण्यासाठी आणखी १० ते १२ % खर्च येत असल्याने २८ ते ३० % दराने वित्त पुरवठा करणे संयुक्तिक असल्याचा दावा या संस्था करीत असतात. याचा अर्थ सरळ आहे. ताळेबंदात नफा न दाखविता प्रशासन खर्च दाखवून नफेखोरी करण्याचा राजमार्ग नफ्याचा विटाळ असणाऱ्या संस्थांनी स्वीकारला आहे. ग्रामीण व शेती क्षेत्रात पैसा यावयाचा असेल तर वाजवी नफ्याला मान्यता देणाची गरज आहे. तशी मान्यता न देता आड मार्गाने नफा कमाविणे ही दांभिकता आहे. या पार्श्वभूमीवर एसकेएस कंपनीचे भांडवल बाजारातून पैसा उभा करण्याच्या कृतीचे स्वागतच केले पाहिजे. भांडवल बाजारातून नफ्याच्या अपेक्षेने बिन व्याजी भांडवल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणार असल्याने ग्रामीण भागातील वित्त पुरवठा वाढण्याची व वाजवी व्याज दरात तो गरजूंना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एसकेएस कंपनीला भांडवल बाजारात मिळत असलेला प्रतिसाद लक्षात घेता लवकरच अन्य कंपन्या भांडवल बाजारात उतरतील व त्यांच्यातील स्पर्धेचा लाभ शेती क्षेत्राला होण्याची शक्यता आहे.

परंतु पैशाचा गरिबी निर्मूलनासाठी उपयोग करायचा असेल तर लघु वित्त पुरवठा या खुळचट कल्पनेलाच सोडचिठ्ठी देण्याची गरज आहे. कारण इतक्या वर्षांचा अनुभव हेच सांगतो की लघु वित्त पुरवठा गरिबांची नड भागवित असला तरी अंतिम परिणाम हा गरिबाला अधिक दरिद्री करण्यातच होतो. जोपर्यंत ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय शेती फायद्याची होत नाही तोपर्यंत शेती आधारित कोणातही जोडधंदा फायद्याचा होवू शकत नाही ही बाब वित्त संस्था समजून घेतील तर ग्रामीण भारताला अधिक कंगाल बनविण्याचा त्यांचा उद्योग बंद होइल.

लघुवित्त पुरवठा उद्योजकता वाढविण्याचे साधन बनण्याऐवजी नफेखोरीचे हत्यार बनले आहे. अशा वित्त पुरवठ्याचे जनक मोहम्मद युनूस यांची बांगला देश ग्रामीण बँकेच्या अध्यक्षपदावरून हकालपट्टी करताना तिथल्या पंतप्रधानांनी ग्रामीण बँक ३०% व्याज दर आकारीत असल्याचा केलेला आरोप चुकीचा असेल असे आपल्याकडील परिस्थितीवरून तरी वाटत नाही. यातील आणखी गंभीर बाब म्हणजे नफेखोरीसाठी ग्रामीण महिलांचे बचत गट वेठबिगार म्हणून राबत आहेत. काही ठिकाणी तर बचत गटाच्या महिलांनी कर्जवसुलीसाठी आणलेल्या दबावातून आत्महत्येचे प्रकार घडले आहेत. बचत गटाने महिलांना घराबाहेर पडण्याची संधी दिली. एवढेच नाही तर त्यांना आर्थिक साक्षरही बनविले. पण बँकांचे व्यवहार समजणे म्हणजेच आर्थिक साक्षरता नाही. या आर्थिक व्यवहारात होणारे शोषण व त्याचे परिणाम समजले तरच त्या साक्षरतेला अर्थ आहे. आजच्या लघु वित्त पुरवठ्याची सगळी मदार आणि आधार महिला बचत गट हेच आहेत. महिला बचत गटांनी आपला आधार काढून घेतला तर लघु वित्त पुरवठा पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळेल.

वित्त कंपन्यांना शिस्त लावण्याची खरी ताकद रिझर्व बँकेपेक्षा व सरकारपेक्षा या बचत गटांत आहे. बचत गटांनी लघु हा शब्द काढण्यासाठी जोर लावून मुबलक भांडवलाचा आग्रह धरला पाहिजे. त्याशिवाय गरिबी निर्मूलन हे निव्वळ स्वप्नरंजन ठरणार आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ
sudhakarjadhav@gmail.com
मो. ९४२२१६८१५८

■■

# बाबूरावांचा भूकंपशोध



**शे.भ.प.** (शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**

**आम्ही बाबूरावांना विचारले, की आपल्या भारताला कोणता धोका आहे? आमच्या प्रश्नावर बाबूरावांनी जे उत्तर दिले ते असे, की संपूर्ण भारतात आता संत रामदेव बाबांच्या शिष्यांनी उच्छाद मांडला आहे, ही शिष्यमंडळी सर्वसामान्य नागरिकांना पहाटेपहाटे उठायला लावते, त्यांच्याकडून योगक्रिया करवून घेते, या योगक्रियेमुळे असंख्य प्रजाननांचे वजन निम्म्यावर आले आहे. या निम्म्यावर आलेल्या वजनामुळे ज्या त्या गावातील पृथ्वीवरचा दाब अर्ध्यावर आला आहे, या कमी दाबामुळे पृथ्वीखालील वायू वर यायला पाहतो आहे, तर पृथ्वीमधील हालचाली सहजपणे होत आहेत. ज्यामुळे संपूर्ण भारतात पुढे ज्वालामुखी फुटण्याची शक्यता वाढते आहे तर राज्याराज्यात भूकंप होण्याची भीती आहे.**

विकृती नामक संवत्सरातील हा अंतिम महिना आहे. कोणत्याही संवत्सरातील अंतिम महिना हा त्या वर्षीच्या अनेक गोष्टींचा शेवट घडवतो की काय कोण जाणे? यावर्षीचा गेला काळ आठवा. मानवांच्या विकृत वर्तनाला पाहून भारतातील सामान्य जनता हादरलेली आहे, तर निसर्गाने आपली शांत वृत्ती सोडून जगाच्या पूर्व भागात अर्थात जपानमध्ये जे तांडव दाखवले ते ऐकून आणि पाहून प्रचंड खळबळ माजली आहे. खरेतर जलप्रलयाची कल्पना जुन्या लोकांनी आपल्यासमोर करून ठेवलेली आहे. खरोखरीचा जलप्रलय केवळ दूरचित्रवाणीवर पाहूनच अनेकजण घराबाहेर झोपत आहे म्हणे. हे साहजिक आहे. जे काही आपण पाहिले ते अतर्क्य आहे. हे अतर्क्य असले तरी संपूर्ण भारत, ज्या दिवशी जपानमध्ये भूकंप आणि त्सुनामी झाली त्या दिवशी वेगळ्याच दु:खात होता. आपले क्रिकेटवीर त्या दिवशी मॅच हरले होते. मृत्यूभयापेक्षा हा पराभव असंख्य हायब्रीडांना शोकाकुल करून गेला होता. हा अतिशहाणपणा आहे असे मत आमचे मित्र बाबूराव यांनी ज्या दिवशी स्वपत्नीजवळ व्यक्त केल्याचेही आम्हाला कळाले आणि आम्ही त्यांना याबाबत नेमके काय ते विचारायला गेलो. बाबूराव आपली पत्नी पंचफुलाबाई यांच्याशी गप्पा मारत बसले होते. आमच्या एन्ट्रीने पंचफुलाबाईंनी नजरेनेच रोष व्यक्त केला आणि मनातच त्या म्हणाल्या 'आलं चिकटं, आता दोन तास काही हलत नाही, आपल्या शेंगुळ्यानं चहा टाक म्हणून सांगितलं, तर दूध संपलय म्हणूनच सांगते या मेल्यांना!' आम्हाला पंचफुलाबाईंचं मन वाचायची कायम सवय आहे. आम्ही कोणत्याही परस्त्रीच्या मनात डोकावण्याच्या प्रयत्नातच असतो. ही भारताची नवी संस्कृती आहे. ही विकृती नाही हेसुद्धा आम्ही आधीच नमूद करून टाकतो. बाबूराव आणि आम्ही एकमेकांकडे पाहिलं, हास्याचं आदानप्रदान केलं, बाबूराव म्हणाले, 'या महाराज, आज काही नवा डाटा हवा आहे काय?' आम्ही म्हणालो, 'जपानमध्ये हाहाकार उडालाय, एवढा चांगला देश आणि बघा, कसा त्यांचा पसारा झालाय!' बाबूराव यावर आमच्याशी त्यांच्या मनातले बोलले, की जपानी मंडळी ही मुळात छोट्या चुकीची आणि तुरूतुरू जगून गतीने आपली प्रगती करून घेणारी आहेत. ही मंडळी म्हणजे मानवजातीत गिनीपिगप्रमाणे गिनीमॅन आहेत. आज जगातल्या प्रत्येक प्रयोगशाळेत कोणताही प्रयोग, त्याचा उद्देश सिद्ध व्हावा म्हणून त्यासाठी ज्या चाचण्या घेतल्या जातात त्या गिनीपीगवर होतात. हे गिनीपिग छोटोछोटे पांढरेशुभ्र उंदीर असतात. यांचे गुलाबी डोळे मिचमिचे असतात. या उंदरांना प्रयोगादरम्यान मृत्यू आला तरी तो शास्त्रज्ञ हळहळत नाही. तसेच या जपान्यांबाबत आहे. साक्षात देवानेच यांना गिनीमॅन केलेय की काय याची आम्हाला शंका आहे. जपान्यांवर दर शतकात एक आपत्ती येतेच. मोठे भूकंप तेथेच होतात, ज्वालामुखी तेथेच फुटतात, त्सुनामी तेथेच आदळतात. एवढेच काय तर अणुबॉम्बचा स्फोटसुद्धा त्यांच्यावरच घडवला गेलेला आहे. हे जरी असले तरी यावेळी भूकंपाचे खरे कारण वेगळेच आहे. बाबूराव यांच्या या सविस्तर मौखिक परिच्छेदानंतर आम्हाला ते खरे कारण जाणून घेण्याची अपार इच्छा दाटून आली तेव्हा आम्ही त्यांना म्हणालो, 'बाबूराव ते खरे कारण तत्काळ सांगा म्हणजे आम्हाला ते आम्हीच शोधले आहे हे सिद्ध करता येईल. आमच्या कुतूहलावर बाबूरावांनी जे विवेचन केले ते अद्भुत होते. ते म्हणाले, की या पृथ्वीखाली जो पाताळलोक आहे त्या पाताळलोकाचा स्वामी अहिरावण हा आहे. हा अहिरावण युगानुयुगे आपली अंधेरी दुनिया आबाद ठेवतो. या पाताळलोकी तोसुद्धा आपला शांत झोपलेला असतो. त्याच्या मस्तकावर नेहमीच भूगर्भातील तेलरूपी झरे, जलरूपी स्त्रोते आपापल्या धारा सोडून ठेवतात जेणेकरून तो झोपून राहावा आणि घोरत असावा. अलीकडे मात्र झाले काय की पाण्याच्या अफाट



बोंबललो की हे तर खरेच आहे. आता रामदेव बाबा पडले आमच्यापेक्षा जास्त लोकप्रिय बाबा. मग यांच्याविरुद्ध तातडीने कोणीतरी महान आणि थोरांनी बोलायला हवे, हे आम्हाला निकडीने जाणवले. पुढे यांच्याविरुद्ध खास आघाडी कोणी उघडेल काय याचा मार्ग शोधताना आम्हाला राष्ट्रपुरुष लालोबा योग्य वाटले. त्यांची योग्यता त्यांनी आपल्या बोलण्यातून सिद्ध करून संपूर्ण बिहारात पूर्वी यादवी माजवलीच होती आणि त्यांच्यासह दुसरी अधिकारी व्यक्ती आम्हाला सापडली ती राजे दिग्विजयसिंग, हे राजे वारकरी कम धारकरी संप्रदायातले असल्याने क्षत्रिय, यादव युती या बाबासाठी संभाव्य भूकंपनिरोधक म्हणून पुढे करण्याचे आता आमच्या मनात आले आहे. यापैकी लालोबा यांनी काढलेल्या

उपशामुळे पृथ्वीचा गाभा कोरडा पडला आहे तर खनिज तेलेसुद्धा आटताहेत. त्यामुळे त्या अहिरावणाच्या मस्तकावरील केस कोरडे, रुक्ष होऊन त्याच्या डोक्यात कोंडा झाला आहे. या कोंड्यामुळे त्याला खाज सुटल्यासारखे फिलिंग येत आहे आणि तो झोपेत आपल्या अजस्र हाताने जेव्हा डोके खाजवतो तेव्हा पृथ्वीखाली जी हालचाल होते त्याला भूकंप म्हणतात. यावेळी त्याने जरा खसाखसा आपले डोके चोळले तर जपानला त्याचा त्रास झाला. जपानकडेच का झाला तर तिकडे यावेळी थंडी आहे आणि अहिरावणाचे डोके कूस बदलून नेमके तिकडेच होते. बाबूरावाचे हे संदर्भासहित स्पष्टीकरण नक्कीच पैकीच्या पैकी मार्काचे होते. हे ऐकून आम्ही बाबूरावांना या भूकंपावर एखादा जपानी उपाय सांगा अशी विनंती त्यांना केली तेव्हा ते म्हणाले, की अहिरावणानेच आपल्या प्रॉब्लेमवर सोल्युशन काढून ते इंप्लीमेंट केले आहे. त्याने जपानच्या शहराला सरळसरळ उलटेपालटे करून त्या शहरातील जे काही आहे ते सारे समुद्रात मिसळून घेतले आणि त्या साऱ्याला शांपू समजून आपले मस्तक धुवून घेतले आहे. त्यामुळे आता जे भूकंपानंतरचे आफ्टरशॉक येत आहेत ते केस वाळवताना झटकण्यामुळे आहेत. हे जपानचे सोडा महाराज; परंतु आपल्या भारतापुढचा संभाव्य धोका काय आहे, याचा विचार केला आहे काय? त्यांच्या या प्रश्नाला आम्ही काहीच बोलू शकलो नाही, कारण आम्हाला भारतापुढचा नेमका प्रश्न कोणता याचेच ज्ञान त्यासमयी नव्हते. आम्हीच उलटपक्षी बाबूरावांना विचारले, की आपल्या भारताला कोणता धोका आहे? आमच्या प्रश्नावर बाबूरावांनी जे उत्तर दिले ते असे, की संपूर्ण भारतात आता संत रामदेव बाबांच्या शिष्यांनी उच्छाद मांडला आहे, ही शिष्यमंडळी सर्वसामान्य नागरिकांना पहाटेपहाटे उठायला लावते, त्यांच्याकडून योगक्रिया करवून घेते, या योगक्रियेमुळे असंख्य प्रजाननांचे वजन निम्म्यावर आले आहे. या निम्म्यावर आलेल्या वजनामुळे ज्या त्या गावातील पृथ्वीवरचा दाब अर्ध्यावर आला आहे, या कमी दाबामुळे पृथ्वीखालील वायू वर यायला पाहतो आहे, तर पृथ्वीमधील हालचाली सहजपणे होत आहेत. ज्यामुळे संपूर्ण भारतात पुढे ज्वालामुखी फुटण्याची शक्यता वाढते आहे तर राज्याराज्यात भूकंप होण्याची भीती आहे. बाबूरावांनी आपले हे ठोकताळे ऐकवले आणि आम्ही भर फाल्गुन मासात मनातल्या मनात

शोधाप्रमाणे रामदेवबाबा हे आपल्या औषधात हाडे मिसळतात असे त्यांचे परिणाम आहेत म्हणे. याचाच अर्थ रामदेवबाबा हे हिमालयाचल असल्याने त्यांना त्या दधिची ऋषींच्या हाडांच्या उपयोगाची कथा माहिती असावी. ती जरी माहिती अचूक माहिती नसली तरी दधिचींना अमर होण्यासाठीचा उपाय माहीत होता. रामदेवबाबा सर्वसामान्यांना त्याच अमरत्वाला संकेतार्थाने दीर्घायुकडे नेत असून हलकेफुलके वृद्ध नागरिक पुढे वाढणार आहेत. जसा आज जपान वृद्धांचा देश म्हणून प्रसिद्ध आहे तसा उद्या भारत अतिवृद्धांचा देश म्हणून प्रसिद्ध झाला तर लालोबासारख्यांना बहुअपत्यनिर्मितीसाठी एकांत मिळणार नाही, म्हणून जागते वृद्ध बनवण्यापेक्षा, झोपलेले युवक बरे.

भारत व्हावा उद्ध्वस्त, हेच भविष्य ठरो खरे! ही भूमिका घेऊन राजे दिग्विजय यांनी आरोप करावेत आणि एका सुसंस्कृत बाबापेक्षा असंख्य विकृत बेब्या गावोगाव फिरोत, भूकंप येवोत, ज्वालामुखी फुटोत आणि सुखदनिधनाच्या वार्ता येवोत हीच मावळत्या वर्षाची श्रद्धांजली होय!

**केल्या प्रगतीचा । किती आणो आव ।**
**मानवा न भाव । निसर्गापुढे ।।**
**भूकंप पाऊस । सुनामीच्या लाटा ।**
**पाठीमध्ये सोटा । माणसाच्या ।।**
**गर्वाने फुगल्या । मानवाची आज ।**
**काढीली ही लाज । निसर्गाने ।।**
**थंडा सांगतसे । नम्र व्हावे थोडे ।**
**काढावेत जोडे । मंदिराबाहेर ।।**

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com

■■



## मुन्शी प्रेमचंद

**अनुवादक - अनंत उमरीकर**

# गोदान

### भाग अकरा

भारतीय साहित्यात मुन्शी प्रेमचंद यांचे योगदान अतिशय मोलाचे आहे. 'गोदान' या कादंबरीतून त्यांनी भारतीय शेतकऱ्याची परिस्थिती विदारकपणे चित्रित केली. प्रेमचंद यांच्या या गाजलेल्या कादंबरीचे संक्षीप्त रुपांतर 'संघटक'च्या वाचकांसाठी क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.

पण एवढ्यानं दातादीन हार मानणारे नव्हते. ते तर या गावचे नारद होते. लावालावी करणे हा तर त्यांचा छंद होता. ते स्वतः चोरी नाही करायचे; पण चोरी प्रकरणात हात जरूर मारायचे. जमीनदाराला तर ते कधी एक पैसाही कर द्यायचे नाहीत. मात्र जप्तीसाठी आलं, की विहिरीत उडी मारून जीव द्यायची धमकी द्यायचे. नोखेरामला मात्र हे काही जमत नव्हतं; पण त्याचा व्याज बट्ट्याचा धंदा मात्र चालायचा. कुणा स्त्रीला दागिना करायचा झाला तर दातादीन तत्परता दाखवायचा. लग्न जुळवण्यात पुढे असायचा. त्यात त्यांना दक्षिणाही मिळायची. आजारीपणात औषध पाणीही करायचे पेशंटची इच्छा असली तर अंगारे धुपारेही करायचे आणि बोलण्यात तर असे अस्ताद, की लहानात लहान तर मोठ्यात मोठे होऊनंच राहायचे. चोराचेही साथीदार आणि सावाचेही तेच साथीदार. गावात त्यांच्यावर कुणीही विश्वास ठेवत नव्हता; पण वाणी एवढी मिठास, की हे सारं माहीत असूनही लोक धोका खायचेच आणि परत परत त्यांच्याकडेच यायचे.

डोकं हलवित ते म्हणाले, ''तुझं म्हणणं तसं बरोबरंच आहे धनिया. धर्मात्मासाठी माणूसही हाच मोठा धर्म आहे. हे खरं आहे; पण लोकरीतीसाठी काही गोष्टींचं पालन करावं लागतं.''

असंच एके दिवशी त्याला पटेश्वरीनं होरीला छेडलं, ते तर 'पुण्यात्मा' म्हणून प्रसिद्ध होते. पौर्णिमेला नेहमी सत्यनारायणाची पूजा करायचे. पटवारी होते म्हणून शेत मात्र वेठ बिगारीत करून घ्यायचे. सोबतंच आसाम्यामध्ये भांडण लावून द्यायचे आणि दोनही भांडणाऱ्या आसाम्याकडून पैसे खायचे. सगळा गाव त्यांच्या नावानं कापायचा. गोर गरिबांना पाच पाच दहा दहा रुपये देऊन हजारो रुपयांची संपत्ती त्यांनी गोळा केली. शेतात पिकणारा माल कोर्ट कचेरी आणि पोलिसात पोहोचवायचे. त्यामुळे साऱ्या विभागात त्यांचा धाक होता; पण त्यांच्या चपेटमध्ये आजपर्यंत कुणी आलं नसेल तर तो म्हणजे ठाणेदार गंडा सिंह! ते तर नुकतेच या भागात आले होते, ते



होते परमार्थी. आजारी माणसांना क्विनाईनच्या गोळ्या फुकट वाटायचे. लग्नकार्यात पालखी गालिचा अशा वस्तू वापरायला द्यायचे. पैसे घ्यायचे; पण कामही चोख करायचे.

होरीला लाला म्हणाले, ''ही काय बला ठेवून घेतली घरात?''

होरी मागे वळून म्हणाला, ''लाला तुम्ही काय म्हणालात मला ऐकू नाही आलं.''

त्याच्याकडे भरभर चालत येत लाला म्हणाले, ''अरे धनियाबरोबर तुझी अक्कल गेली कुठे? झुनियाला तिच्या बापाच्या घरी का नाही पाठवून देत? विनाकारण तुझं हसं करून घ्यायला लागलास! कुणाचं पोर पोटात आहे माहीत नाही आणि त्याला घरात घेऊन बसलास? तुझ्या दोन दोन मुली लग्नाच्या आहेत याचाही विचार नाही केलास? कसं होणार रे तुझं?''

अशी टीका टिप्पणी ऐकून होरी उद्विग्न झाला होता. ही टीका ऐकून म्हणाला, ''हे सगळं मला सुद्धा कळतंय लाला; पण तुम्हीच सांगा मी काय करू शकतो? मी झुनियाला काढून दिलं तर भोला तिला घरात घेईल का? तो तयार झाला तर तुम्ही त्याला तयार केलं तर मी जन्मभर तुमचे उपकार विसरणार नाही; पण तिथे तर त्याची दोन पोरं तिचा खून करायला तयार बसलेत. अशा परिस्थितीत मी तिला कसं काय काढून देऊ? एक तर माझा पोरगा नालायक निघाला, तिचा हात धरून तिला सोडून पळून गेला. मी तिला काढून दिलं तर अशा अवस्थेत ती तर मजुरीसुद्धा करून पोट भरू शकणार नाही. अशावेळी तिनं जीव दिला तर अपराध कुणाच्या माथ्यावर येईल? राहता राहिला माझ्या पोरीच्या लग्नाचा प्रश्न. तर त्यासाठी देव वर आहेच. पाहूया काय होईल ते. त्यांच्या लग्नाची वेळ येईल तेव्हा काही ना काही मार्ग निघेलंच. आमच्या भावकीत कधी कुणी मुलगी बिन लग्नाची राहिली नाही; पण तरिही त्या भीतीनं जीव घेण्याचं पाप तर करता येणार नाही!''

होरी तसा नम्र स्वभावी माणूस होता. नेहमी मान खाली घालून चालायचा. हिरा सोडला तर गावात कुणीही त्याचं वाईट चिंतणारा माणूस नव्हता; पण हा असा अनर्थ समाज कसा काय सहन करणार? आणि या होरीनं तर सारं काही समजूनही डोळ्यावर कातडं ओढलेलं. असं वाटत होतं, की होरी आणि धनिया हे दोघेही समाजालाच आव्हान द्यायला लागले आहेत, पाहू तर खरं काय करतो समाज ते! आणि समाजही सज्ज झाला होता त्याची मर्यादा ओलांडणाऱ्याची अवस्था काय होते ते दाखवून द्यायला.

त्याच रात्री या प्रश्नावर चर्चा करायला गाव प्रमुखांची एक बैठक झाली. त्यावेळी दातादीन म्हणाले, ''कुणाची निंदा करायची मला सवय नाही. संसारात अनेक कुकर्म होतंच असतात. त्याच्याशी आपल्याला काही घेणं देणं नसतं; पण ती सटवी, धनिया माझ्याशी भांडायला लागली. भावांच्या हिश्शातले चार पैसे हातात काय आले, आता तर ती शेर झाली. ज्या ठिकाणी अन्न खाल्लं त्याच ठिकाणी लाथ मारायची ही तर तिच्या जातीची सवयंच! म्हणून तर शास्त्रात म्हणलंय, नीच जाती, लाथा मारती!''

लाला पटेश्वरी म्हणाले, ''या लोकात हीच तर खोड आहे. चार पैसे दिसले, की त्यांच्या डोक्यात नशा चढते. आज तर होरीनं असा हेकटपणा दाखवला, की मला तर गप्पच बसावं लागलं. स्वतःला तो समजतो तरी काय? या अनिनीचा गावावर काय परिणाम होईल याचा तरी विचार करायला नको? झुनियाचं हे असं करणं पाहून इतर विधवांचं मन जळेल, की नाही? आज भोलाच्या घरात ही घटना घडली उद्या तुमच्या माझ्या घरातही ही घटना घडेल. समाज चालतो तो कुठल्या ना कुठल्या भीतीच्या आधारावर. आज समाजाचा हा अंकुश गेला तर उद्या समाजाची काय अवस्था होईल हे पाहातच राहा.''

झिंगुरीसिंग दोन पत्नीचे पती होते. पहिली पत्नी पाच अपत्ये सोडून मरण पावली, तेव्हा ते पंचेचाळीसचे होते म्हणून त्यांनी दुसरं लग्न केलं; पण तिला मूल झालं नाही म्हणून त्यांनी तिसरं लग्न केलं. त्यांचं वय आता पन्नाशीत होतं आणि घरात दोन तरुण बायका होत्या. त्या दोघांच्या बाबतीत गावात अनेक अफवा होत्या; पण ठाकूरच्या भीतीनं कुणी काही बोलत नव्हतं. शिवाय बोलायची संधी तर मिळायला पाहिजे ना, दोघींचा नवरा जिवंत होता, तेव्हा त्याच्या नावाखाली सारं सपादून जात होतं; पण ज्यांना कुणाला अशी पाठराखण नसते अशांची अडचण होते. ठाकूर साहेब फार कडक शिस्तीचे होते. ते गर्वाने सांगायचे, की त्यांच्या पत्नीच्या घुंगटकडेसुद्धा पाहण्याची कुणाची हिंमत नाही; पण त्या घुंगटच्यामागे काय चालतं याची त्यांना कुठे खबर होती.

ते म्हणाले, ''अशा स्त्रीचं तर डोकंच उडवायला पाहिजे. होरीनं अशा स्त्रीला घरात ठेवून घेऊन समाजात विष कालवलं आहे. अशा माणसाला गावात राहू देणं म्हणजे सारा गावंच भ्रष्ट करणं आहे. रायसाहेबांना याची सूचना द्यायला पाहिजे. त्यांना साफसाफ सांगून टाकाया पाहिजे, की गावात ही असली अनीती चालू दिली तर गावाची आबरू शिल्लक राहणार नाही.''

पंडित नोखेराम एक कुलीन ब्राह्मण होते. त्यांचे आजोबा कुणा राजाचे दिवाण होते; पण आपली सारी संपत्ती परमेश्वरचरणी अर्पण करून ते साधू संन्याशी झाले होते. नोखेरामच्या वडिलांनीही रामनामाचा जप करीतंच देह ठेवला होता. तिच परंपरा नोखेरामला वारशात मिळाली होती. सकाळी पूजा करून दहा वाजेपर्यंत रामनाम लिहीत बसायचे; पण देवासमोरून उठता क्षणीच त्यांची मानवता, मन, वचन आणि कर्म विषानं भरलेली असायची. रायसाहेबांना विचारायचा प्रस्ताव म्हणजे त्यांच्या अधिकाराचा अधिक्षेपच. डोळे मोठे करत ते म्हणाले, ''यात रायसाहेबांना काय विचारायचं? मला जे वाटतं ते आपण करू शकतो. त्याच्यावर दोनशे रुपये दंड लावावा. स्वतःहून गाव सोडून पळून जाईल. सोबतंच बे-दखलीचा दावा लावावा!''

पटेश्वरी म्हणाला, ''कर तर देऊन टाकला आहे त्यानं.''

झिंगुरा सिंग म्हणाला, ''हो, त्यासाठी तर माझ्याकडून त्यानं तीस रुपये घेतले.''

नोखेराम म्हणाला, ''पण पावती तर नाही घेतली त्यानं. मग पुरावा काय आहे. कर दिल्याबद्दल?'' सर्वसंमतीनं त्याच्यावर शंभर रुपये दंड लावावा असं ठरलं. मात्र त्यासाठी गावची संमती घेतल्याचं दाखवावं लागेल आणि त्यासाठी पाच सहा दिवस वेळही लागू शकतो; पण त्याच रात्री झुनियाला मुलगा झाला आणि दुसऱ्याच दिवशी पंचायत बसली. होरी आणि धनिया या दोघांनाही शिक्षा ऐकायला बोलावण्यात आलं. पंचायतसाठी एवढी गर्दी जमली, की पाय ठेवायलाही जागा राहिली नाही. पंचायत निर्णय जाहीर केला, की होरीनं शंभर रुपये आणि तीस मण धान्य द्यावं.

भर सभेत भरल्या आवाजात धनिया म्हणाली, ''पंचांनो, गरिबांना त्रास देऊन तुम्हाला सुख मिळणार नाही. आम्ही तर बरबाद होऊ. या गावात राहू किंवा न राहू; पण माझा शाप तुम्हाला जरूर लागेल. मी माझ्या सुनेला घरात ठेवलं म्हणून एवढा दंड लावला, तिला घराबाहेर काढून भिकारीण केलं नाही, याला न्याय म्हणतात का?''

पटेश्वरी लाला म्हणाला, ''ती तुझी सून नाही, कुलटा आहे.''

होरी धनियाला रागावून म्हणाला, ''तू का बोलतेस धनिया? पंच

म्हणजे परमेश्वर असतात. त्यांचा न्याय आपल्याला मान्य असतो. आपण गाव सोडून जावं अशी गावाची इच्छा असेल तर ठीक आहे. पंचांनो, आमच्या घरात धान्याचा एक कणही नाही. घरात जे किडुक मिडुक आहे ते घेऊन टाका. कमी पडलं तर आमचे दोन बैलंही घेऊन जा.''

धनिया दात ओठ खात म्हणाली, ''मी धान्याचा एक कण देणार नाही. ज्याच्यात हिंमत असेल त्यानं घेऊन दाखवावं. वारे न्याय! तुम्हाला वाटत असेल या निमित्ताने आमच्या जमीन जुमला घेऊन टाकावा आणि दुसऱ्या कुणाला देऊन टाकावा. शेत, जमीन विकून मस्त मजा करावी. माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत मी हे होऊ देणार नाही. आम्हाला नको ही अशी भावकी. नाही तरी भावकीत राहूनही संकटातून आमची मुक्तता होत नाहीच. आम्ही आमच्या कष्टाचंच खातो. यापुढेही कष्टाचंच खाऊ.''

तिच्या पुढे हात जोडून होरी म्हणाला, ''तुझ्या पाया पडतो गप्प बैस. आपण सारे भावकीला बांधलेलो आहोत. भावकीच्या बाहेर जाऊ शकत नाही. ते जे दंड लावतात तो मुकाट्यानं कबूल कर. बहिष्कृत होऊन राहण्यापेक्षा गळ्याला फास लावून मेलेलं बरं! आज मेलो तर भावकीचं दहनाला येईल. भावकीनं तारलं तरच तरणार आहोत. पंचांनो, माझ्या मुलाचं तोंड पाहण माझ्या नशिबात नसेल, माझ्या घरात एक दाणाही खायला नसेल तरिही मी भावकीशी धोका करणार नाही. पंचांना माझ्या पोराबाळांची दया आली तर त्यांनी माझ्या पोरांची देखभाल करावी. काही झालं तरी मला पंचांच्या आज्ञेचं पालन करायचं आहे.''

धनिया रागारागानं निघून गेली. इकडे होरी खळ्यातलं धान्य भर भरून झिंगुरी सिंगच्या बैठकीत ठेवू लागला. यापुढे त्याला एकट्याला त्याच्या स्वतःच्या आणि हिराच्या कुटुंबाचं पालन पोषण करायचं होतं. जे काही झालं ते सारं धनियाच्या पुरुषार्थामुळे! झुनिया घरातलं काम पाहत होती आणि धनिया आपल्या दोन मुलीसह शेती कामात गुंतली होती. त्यांना वाटत होतं या पिकातून कर तरी चुकवता येईल आणि थोडसं धान्यही शिल्लक राहील. पाच, सहा महिने असे तसे कटतील आणि मग नवीन धान्याचे दिवस येतील. ती सारी आशा पंचांच्या या कारवाईमुळे धुळीस मिळाली. धान्य तर गेलंच गेलं आणि वर दंडाचं ओझं पडलं ते वेगळंच. खायची सोय नाही राहिली, वर गोबरची चिंता लागली ती वेगळीच. कुठे आणि कसा आहे? त्याची तर काहीच खबर नाही. एवढ्या कच्च्या दिलाचा होता तर भानगड करायचीच कशाला? पण काही झालं तरी नियतीला कोण रोखणार? भावकीचं तर विचारूच नका. बिचारा होरी एकटाच धान्य वाहत होता. जणू स्वतःची चिंता स्वतः रचत होता. त्याच्या मदतीला कुणीसुद्धा नव्हतं. उद्या पोराबाळांना काय खाऊ घालायचं याची चिंता त्याचं काळीज जाळत होतं; पण त्यावेळी भावकीच्या भीतीचा सैतान डोईवर सवार होता. भावकीपासून तुटून पडण्याची कल्पना तर तो करूच शकत नव्हता! लग्नादी विधी, जन्म मरणाचे विधी सगळं सगळं भावकीच्या हातात असतं. एखाद्या विशाल वृक्षाची मुळं जशी खोलवर रुजलेली असतात तसंच भावकीच्या कल्पना त्याच्या नसा नसात भिनल्या होत्या. बिरादरीपासून तुटलो तर आपलं आयुष्यंच नष्ट भ्रष्ट होईल असं त्याला वाटत होतं.

खळ्यात दीड दोन मण धान्य उरलं तेव्हा धनिया धावत धावत आली आणि त्याचा हात धरून म्हणाली, ''आता राहू द्या. भावकीसाठी तर खूप लाज वाहून नेली आता पोराबाळासाठी काही शिल्लक ठेवणार, की सारं काही बिरादरीच्या बोडख्यात घालणार? मी तुमच्यापुढे हरले. माझंच दुर्भाग्य, मी तुमचा हात धरला!''

तिचा हात झटकून होरी म्हणाला, ''माझ्याकडून असं होणार नाही. पंचापासून लपवून मी एक दाणाही घेणार नाही. मी सगळं धान्य तिथे नेऊन ठेवतो आणि मग पंचांना काही दया माया आली तर ते देतील ते मी घेईन. नाही तर मर्जी देवाची!''

धनिया अत्यंत तळमळीनं म्हणाली, ''हे पंच नाहीत, राक्षस आहेत राक्षस. हे लोक आपली सगळी जागा जमीन घ्यायला टपून बसले आहेत. दंड तर केवळ एक निमित्त आहे. मला हे सारं कळतंय; पण तुमचेच डोळे उघडत नाहीत. तुम्हाला वाटतंय, हे राक्षस काही दया माया दाखवतील, दहा पाच मण धान्य काढून देतील?''

होरीनं तिचं काही एक ऐकलं नाही. तेव्हा तिनं आपल्या दोनही हातांनी तिचे दोनही हात पकडले. ''मी तुम्हाला आता हे काही नेऊ देणार नाही. मग माझे प्राण गेले तरी बेहत्तर! मरमर केली आम्ही, रात्र रात्र भिजवण केली आणि आम्ही हे जे काही कमावलं ते यासाठीच का, की पंच लोकांनी मिशावर ताव मारत फिरावं आणि आपली आमची पोरबाळ एका एका दाण्यासाठी तडफडावीत? तुम्हीच एकट्यानं सारे कष्ट केले असं काही नाही. मी सुद्धा माझ्या मुलीसगट कष्ट केले आहेत. मुकाट्यानं टोपलं खाली टाकून द्या. नाही तर आपलं नातं नेहमीसाठी संपलं असं समजा.''

आता होरी विचारात पडला. धनियाचं म्हणणं खरंच होतं. आपल्या पोराबाळांची कमाई हिरावून घेऊन दंडाची भरती करण्याचा त्याला काय अधिकार आहे? तो घरचा स्वामी आहे तो यासाठी, की त्याला घरच्या सर्वांचं त्याला पालन पोषण करता यावं. त्यांच्या तोंडचा घास हिरावून घेऊन भावकीच्या नजरेत मोठा इमानदार म्हणून मिरवता यावं यासाठी नाही. त्याच्या हातून टोपलं आपोआप गळून पडलं. तो हलक्या आवाजात धनियाला म्हणाली, ''धनिया तू योग्य बोलते आहेस. दुसऱ्यांच्या हिश्शावर मला काही हक्क नाही. जे काय उरलंय ते घेऊन जा. मी पंचांना सांगतो!''

धनिया धान्याचं टोपलं घेऊ घरी आली आणि टोपलं तिनं खाली ठेवलं. आपल्या दोन मुलीसह ती गळा फाड फाडून बाळाच्या जन्मप्रसंगीची गाणी गाऊ लागली. साऱ्या गावात ऐकावं हाच त्या मागे तिचा हेतू होता. तिच्या दुर्दैवानं अशा मंगल प्रसंगी भावकीतलं कुणी नाही अशी ही पहिलीच वेळ होती. झुनियानं सांगितलं होतं, की गाणी गायची काही आवश्यकता नाही; पण धनिया थोडी ऐकते? भावकीला तिची पर्वा नव्हती. तर तिला तरी कुठे भावकीची पर्वा होती?

तिकडे त्याचवेळी होरीनं झिंगुरी सिंगकडे आपलं घर ऐंशी रुपयात गहाण ठेवलं होतं. दंडाचे रुपये उभे करायला याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. वीस रुपये तर बाकी धान्यातून त्यानं दिले होते. नोखेरामची तर इच्छा होती, की त्याला बैलच विकायला लावावं; पण पटेश्वरी आणि दातादीन या दोघांनीही त्याला विरोध केला. बैलाला विकलं तर त्यानं शेती कशी करावी? भावकीनं त्याच्याकडून पैसे जरूर वसूल करावेत; पण त्याला गाव सोडावं लागेल असं तर काही करता येणार नव्हतं. म्हणून त्याचे बैल वाचले.

गहाण खत करून होरी परतला तेव्हा रात्र झाली होती. धनियानं विचारलं, ''एवढा वेळ कुठे होता?''

सारा राग यावेळी काढत तो म्हणाला, ''काय करणार? या पोट्ट्याची करणी भोगत होतो. हलकटानं आग तर लावली; पण विझवायचं काम मात्र मला करावं लागत आहे. ऐंशी रुपयात घर गहाण ठेवावं लागलं. कार करणार? आता बिरादरीन मला परत स्वीकारलंय. हुक्कापाणी परत सुरु झालंय.''

ओठ दाबत धनिया म्हणाली, ''हुक्कापाणी सुरू झालं नसतं तर आपलं काय बिघडलं असतं? चारपाच महिने हुक्का ओढला नसता

तर काय आभाळ कोसळलं असतं, की काय? मला कळत नाही, तुम्ही एवढे भोंदू का आहात? माझ्या समोर तर मोठ्या डोक्याच्या गोष्टी करता; पण बाहेर पडताच तुमचं तोंड का बंद होतं? येऊन जाऊन आपल्या वाडवडिलांची एकंच निशाणी उरली होती. आज तर तुम्ही त्याचीही वाट लावलीत. आता ही तीनचार बिघे जमीन उरली आहे, उद्या चालून तुम्ही तिचीही वाट लावाल आणि मग आपल्याला गल्लोगल्ली भीक मागत फिरावं लागल. मी म्हणते तुम्ही त्या पंचांना का नाही विचारलत, तुम्ही कुठे धर्मात्मा आहात, आम्हाला दंड ठोकायला? त्यांचं तर तोंड पाहणं पाप आहे.''

होरीनं तिला दरडावलं, ''चूप बस उगाच जास्त बोलू नकोस. भावकीच्या चक्रात आणखी आली नाहीस. नसता अशा गोष्टी तोंडातून काढल्या नसत्या!''

धनिया उत्तेजित स्वरात बोलली, ''असं कोणतं पाप केंलंय आपण म्हणून या बिरादरीला घाबरायचं? कुणाची चोरी केली, की कुणाचा माल लुटला. स्त्रीला घरी ठेवून घेण्यात काय पाप आहे हो? हां, मात्र तिला वाऱ्यावर सोडणं मोठं पाप ठरलं असतं. माणसानं फार चांगलं असनंही पापंच आहे. त्याच्या सरळपणाचं फळ म्हणून तिकडे कुत्रही त्याचं तोंड चाटतं! आज तुम्ही बिरादरीची मर्यादा सांभाळली म्हणून तिकडे तुमची वाहवाही होत असेल. माझंच मेलीचं नशीब फुटकं म्हणून तुमच्याशी माझा संबंध आला. कधी सुखाचा घास नाही मिळाला.''

''मी तुझ्या बापाच्या पाया पडायला आलो होतो का? त्यांनीच तर तुला माझ्या गळ्यात बांधलं.''

''त्यांच्या डोक्यात शेण भरलं होतं त्यावेळी, आणखी काय म्हणू? असं काय पाहिलं त्यांनी तुमच्यात, की तुमच्यावर लट्टू झाले. तुम्ही तर तसं काही विशेष सुंदरही नव्हता दिसायला!''

भांडणाची जागा आता थट्टा मस्करीनं घेतली. ''ऐंशी रुपये गेले तर गेले; लाख मोलाचं मूल तर मिळालं! त्याला तर कुणी हिरावून घेणार नाही ना? गोबर परत आल्यावर धनिया वेगळ्या जागेतही आनंदानं राहिल.''

होरीनं विचारलं, ''पोरगा कुणावर गेलाय?''

''अगदी गोबरवर गेलाय.'' धनिया प्रसन्न मुखानं उत्तर दिली.

''चांगला धष्ट पुष्ट आहे?''

''हो तर आहे, की!''

रात्री गोबर झुनियासोबत घराकडे येऊ लागला तेव्हा थरथर कापत होता. झुनियाला पाहून गावात किती हंगामा होईल, धनिया किती शिव्या देईल याची कल्पना करूनंच त्याचे पाय कापत होते. होरीची मात्र त्याला भीती वाटत नव्हती. तो फक्त एकदाच काय बोलायचं ते बोलेल रागारागात आणि मग शांत होईल. भीती होती ती धनियाची विष घेते का घराला आग लावते काही सांगता येत नव्हतं. नको, यावेळी झुनिया बरोबर घरी जाणेच नको.

पण धनियानं तिला घरात नाही घेतलं आणि झाडू घेऊन तिला मारायला लागली तर बिचारी धनिया जाईल तरी कुठे? आपल्या घरी तर जाऊच शकत नव्हती. मग कुठे विहिरीत जीव दिला नाही तर फाशी घेतली तर कसं होईल? कुठे आसरा मिळेल?

पण आई एवढी निर्दयीतर नक्कीच नाही, की झुनियाला मारायला धावेल. रागारागात काही शिव्या देईल; पण झुनियानं तिचे पाय धरून रडायला सुरुवात केली, की तिला नक्की दया येईल. तोपर्यंत तो स्वतः कुठे तरी लपून राहिल. सारं काही शांत झालं, की तो परतेल आणि आईची मन धरणी करील. अशा त्याला कुठे नोकरी मिळाली आणि काही रुपये त्याने धनियाला दिले, की धनियाचं तोंड बंद होईल.

झुनिया म्हणाली, ''माझी छाती धडधडते आहे. मला काय माहीत तुम्ही माझ्या गळ्यात ही बला टाकाल म्हणून. कुठल्या क्षणी तुम्हाला पाहिलं काय माहीत. ना तुम्ही गाय न्यायला येता ना पुढंच काही घडतं. तुम्ही पुढे जाऊन जे बोलायचं ऐकायचं ते करून या, मी मागे मागे येते.''

गोबर म्हणाला, ''नाही, तू पुढे जा आणि म्हण, मी बाजारातून येत होते, पण आता रात्र झाली घरी कशी जाऊ? तोपर्यंत मी येतोच.''

झुनिया चिंताग्रस्त आवाजात म्हणाली, 'तुमची आई फार रागीट आहे. माझं तर काळीजंच धसधस करतंय. ती मला मारू लागली तर मी काय करू?''

तिला धीर देत गोबर म्हणाला, ''आईला तशी सवय नाही. आम्हाला तर तिनं कधी थापड सुद्धा मारली नाही, तुला काय मारणार ती? तिला जे काय बोलायचंय ते ती मला बोलेल. तुला बोलणार नाही. गाव जवळ आलं तेव्हा गोबर म्हणाला, तू पुढे जा आता.''

झुनिया त्याला म्हणाली, ''तुम्ही उशीर करू नका.''

''नाही, नाही. तुझ्या मागे लगेच येतो. तू हो पुढे.''

''मला कसं तरी वाटतंय हो. तुमचा तर मला रागंच यायलाय!''

''तुला एवढं भ्यायला काय झालं? मी तर लगेच यायला लागलोय!''

''यापेक्षा कुठेतरी पळून गेलो असतो तर बरं झालं असतं.''

''पण आपलं स्वतःचं घर असताना पळून का जायचं? तू विनाकारण भ्यायला लागलीस.''

''लवकर याल ना?''

''हो, हो लवकरंच येतो.''

''मला दगा तर देणार नाही ना? पुढे पाठवून तुम्ही पळून तर जाणार नाही ना?''

''एवढा नीच नाही मी. हात पकडलाय तर आयुष्यभर निभावून नेईन!''

**क्रमशः**

**- अनंत उमरीकर**

नानल पेठ, परभणी -४३१४०१. मो. ९८९०३९६६५७

■■

# स्वतंत्र भारत पक्षाची राज्य कार्यकारिणीची बैठक




स्वतंत्र भारत पक्षाच्या राज्य कार्यकारिणीची बैठक १३-१४ मार्च दरम्यान चिखलदरा येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत स्वतंत्र भारत पक्षाच्या संघटनात्मक बांधणीविषयी तसेच आगामी निवडणुकांविषयी चर्चा झाली. स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष श्री. वामनराव चटप यांनी प्रास्ताविक केले. 'सत्तरीतल्या आणबाणी दरम्यान किंवा १९८९ मधील बोफोर्स घोटाळा उघडा पडल्यावर देशात जशी परिवर्तनाला अनुकूल परिस्थिती होती तशीच आज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. सगळे राजकीय पक्ष एकमेकांच्या भानगडी उकरून कढण्यात मग्न असून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विचार करण्यास कोणीच तयार नसल्याचे विदारक चित्र समोर दिसत असल्याचे त्यांनी सांगितले. अशावेळी देशाला विनाशाच्या काठावरून परत आणण्यासाठी स्वतंत्र भारत पक्षाची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. प्रकृतीच्या कारणाने शरद जोशी साहेब येथे उपस्थित राहू शकले नाहीत याचे शल्य मनात असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर संघटनेचे अध्यक्ष श्री. रवि देवांग यांनी मार्गदर्शन केले. अनुभवी म्हात्रेसरांनी पक्ष चालवण्याच्या तांत्रिक बार्बीची योग्य ती काळाजी घेण्यात यावी असेही ध्यानात आणून दिले.

त्यानंतर अनिल घनवट, समाधान कणखर, श्रीकांत पुसदेकर, विजय निवल, स्वप्नील गिरधर, ललित बहाळे, श्रीकृष्ण उमरीकर, परमेश्वर तळेकर, डॉ. अप्पासाहेब कदम, ज्ञानेश्वर गादे, चंद्रकांत देशमुख, गुणवंत पा. हंगरगेकर, राजेंद्र आगरकर, राजेंद्रसिंह ठाकूर, नितीन देशमुख, दिलीप भोयर, विजय वेल्हेकर, जगदिश बोंडे, सरोजताई काशीकर आणि दिनेश शर्मा यांनी आपले विचार मांडले. तोवर बराच उशीर झाल्यामुळे बैठकिचे कामकाज थांबविण्यात आले.

सोमवार, १४/३/२०११ रोजी पुन्हा सकाळीच चर्चा सुरू झाली. शैलाताई देशपांडे यांनी सत्राची सुरुवात केली. स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहीरनाम्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. निवडणुकांसंबंधात करावयाच्या मोर्चेबांधणीबद्दल सखोल चर्चा झाली आणि म्हात्रेसरांनी स्वतंत्र भारत पक्षाची नवी कार्यकारिणी जाहिर केली.

सर्वात शेवटी वामनराव चटप यांनी कृती कार्यक्रमाची रुपरेखा स्पष्ट केली. ज्यात खालील बाबींचा समावेश आहे. गाव तिथे संघटक, गाव तिथे संघटनेचा आणि स्व.भा.प. तथा महिल-युवा आघाडीचा फलक, प्रत्येक जिल्ह्यात पक्षाची कार्यकारिणी, प्रत्येक सर्कलमध्ये कार्यकारिणी, प्रत्येक बुथ सांभाळायला एका कार्यकर्त्याची नेमणूक, पक्षाची सभासद नोंदणी, स्थानिक प्रश्नांचा सखोल अभ्यास, दारु बंदी इ. इ.

या बैठकीच्या दरम्यान अमरावतीचे हाजी नझीर शेख आणि स्वप्नील नागपुरे, यवतमाळ यांनी शेतकरी संघटनेत प्रवेश केला. दोघेही उच्च विद्याविभुषीत असून यशस्वी उद्योजक आहेत. शेतकरी संघटनेत त्यांचे स्वागत आहे.

## स्वतंत्र भारत पक्ष

### महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी १३ मार्च २०११ पासून

| क्र. नाव | पद |
|---|---|
| १. ॲड्. वामनराव चटप | अध्यक्ष (महाराष्ट्र) |
| २. सौ. सरोज काशीकर | अध्यक्ष, स्वभाप महिला आघाडी |
| ३. ॲड्. दिनेश शर्मा | अध्यक्ष, स्वभाप युवा आघाडी |
| ४. सौ. शैलजा देशपांडे | प्रचारप्रमुख |
| ५. सौ. अंजली पातुरकर | प्रचारप्रमुख |
| ५. श्री. गुणवंत पा. हंगरगेकर | सरचिटणीस |
| ६. श्री. संजय कोले | सचिव |
| ७. श्री. विजय निवळ | सचिव |
| ८. श्री. ज्ञानेश्वर शेलार | सचिव |
| ९. श्री. गोविंद जोशी | उपाध्यक्ष |
| १०. श्री. वामनराव जाधव | उपाध्यक्ष |
| ११. डॉ. अप्पासाहेब कदम | उपाध्यक्ष |
| १२. श्री. देवीदास पवार | उपाध्यक्ष |
| १३. श्री. श्रीकृष्ण उमरीकर | प्रसिद्धीप्रमुख |
| १४. श्री. राजेंद्रसिंह ठाकूर | सदस्य |
| १५. श्री. समाधान कणखर | सदस्य |
| १६. श्री. अजित नरदे | सदस्य |
| १७. श्री. उत्तमराव वाबळे | सदस्य |
| १८. श्री. अरुण केदार | सदस्य |
| १९. श्री. श्रीकांत पा. पुसदेकर | सदस्य |
| २०. श्री. सम्राट डोंगरदिवे | सदस्य |
| २१. श्री. सिराज शेख | सदस्य |
| २२. श्री. शांतूभाई पटेल | सदस्य |

भविष्यात आवश्यक वाटल्यास या कार्यकारिणीत आणखी काही सदस्य स्वीकृत करण्याचे अधिकार ठरावाने देण्यात आले. तसेच, नव्या कार्यकारिणीने मावळत्या कार्यकारिणीतील सर्व पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा आणि नव्या कार्यकारिणीला त्यांच्याकडून सहकार्य व मार्गदर्शन मिळावे अशी अशी अपेक्षा व्यक्त करणारा ठराव एकमताने संमत केला.

**शेतकरी**

# संघटक

**स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक**










## २७ वा वर्धापन दिन

सस्नेह निमंत्रण

**शेतकरी संघटक** या पाक्षिकाला २७ वर्षे पूर्ण झाली आहेत.
६ एप्रिल २०११ रोजी २८ व्या वर्षातील पहिला अंक प्रकाशित होतो आहे.
या वर्धापन दिनाचा सोहळ्यास

**प्रमुख अतिथी -** निशीकांत भालेराव (ज्येष्ठ पत्रकार युनिक फिचर्स, पुणे)
**परिसंवाद :** मराठी साप्ताहिके व पाक्षिकांची सद्य:स्थिती
**वक्ते :** विनोद शिरसाठ (कार्यकारी संपादक - साप्ताहीक साधना, पुणे)
राम जगताप (उपसंपादक - दैनिक प्रहार, मुंबई)
आदी मान्यवर उपस्थित राहत आहेत.
**अगत्याने येण्याचे करावे ही विनंती.**

**विनित**
**शेतकरी संघटक परिवार**

**बुधवार, दि. ६ एप्रिल २०११**
**सायं. ६.३० वाजता**
**स्थळ :** कलश मंगल कार्यालय, उस्मानपुरा, औरंगाबाद.

■



**मा.सौ. सरोजताई काशीकर**

## शेतकरी संघटक स्थिर निधी

शेतकरी संघटना नेत्या माजी आमदार सौ. सरोजताई काशीकर यांनी शेतकरी संघटक स्थिर निधीसाठी रु. १००० रोख दिले. यामुळे आता शेतकरी संघटक स्थिर निधीची एकूण रक्कम रुपये बत्तीस हजार इतकी झाली आहे.

आतापर्यंत श्री. विनय हर्डीकर (रु. २५,०००), राजीव बसर्गेकर (रु. १०००), ॲड. अनंत उमरीकर (रु. १०००), श्रीमती निर्मला मोहन गुंजाळ (रु. १०००), श्री. अभिजीत श्रीकुमार वानखेडे (रु. १०००), डॉ. बाबूराव गणपतराव नरोटे (रु. १०००), बाबूराव मगदूम (रु. १०००) इतका निधी जमा झाला.

सर्व देणगीदारांचे मन:पूर्वक आभार.

स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**-कार्यकारी संपादक**